# आम्हाला स्वच्छ कारभार हवा

आम्हाला स्वच्छ कारभार हवा



## नाईकविरोधी गोटाची भूमिका

# माणूस

शनिवार
१३ एप्रिल १९७४
एक रुपया

# गुजराथ

## राजकारणाचे साचलेले पाणी आता वाहू लागले आहे....

छाया दातार

गुजराथ पेटला, गुजराथ भडकत राहिला आणि घराचा डोलारा कोसळूनच शांत झाला. सतत अडीच महिने गुजराथच्या रस्त्या-रस्त्यावर युद्ध चालू होते. ९ फे. ला चिमणभाई मंत्रीमंडळ गडगडले, एक गड सर झाला. आंदोलन थांबतंय की काय असं वाटता वाटताच पुन्हा हिंसेच्या ज्वाळा सरसर चढत गेल्या. स्वतःच्या कर्तृत्वाचे फुरफुरणारे भान सळसळत्या तरुण रक्ताला स्वस्थ बसू देईल हे शक्य नव्हते. प्रथम एकसंघ वाटणारी नवनिर्माण युवक समिती तिच्यातील अनेक विचारांचे प्रवाह हळुहळू स्पष्ट होत होते. तरीसुद्धा शेवट पर्यंत त्यांनी आपली एकी कायम ठेवली. त्यांच्या एकजुटीचे कौतुकच करायला हवं. अनेक बाजूंनी अनेक दबाव येत होते. आणि ते स्वाभाविकही होते. कांग्रेसमध्ये फाटाफूट पडली होतीच. एवढंच काय पुढे चिमणभाई मंत्रीमंडळातील दुफळी तीव्र होऊन डॉ. अमूल देसाई आणि तीन सहकारी बाहेर पडले. या लोकांना चिमणभाईंना हाणून पाडण्यात रस होताच. उमाशंकर जोशी हे पूर्वीचे गुजराथ विद्यापीठाचे उपकुलगुरु. त्यांचे व चिमणभाईंचे वाकडे होतेच. त्यांनाही सूड उगवायचा होताच. संघटना कांग्रेसला पुन्हा एकदा लोकांकडे जायला कारण हवे होते. जनसंघासारख्या विरोधीपक्षाचे आपल्या अस्तित्त्वाची जाणीव करून देणे कर्तव्यच ठरते. समाजवादी पक्ष, साम्यवादी पक्ष यांना जनआंदोलन ही लोकशिक्षणाची पर्वणीच वाटते. तेव्हा सर्वांची कारणे आणि हितसंबंध वेगवेगळे असले तरी नजिकचे उद्दिष्ट एकच होते. सर्वांनीच विद्यार्थी वर्गाची पेटती मशाल हाती धरायचा प्रयत्न केला. जनता आणि विद्यार्थी रस्त्यात उतरले होते. गुजराथ कांग्रेसचे जेठाभाई दोरजी आणि इतर श्रेष्ठ मंडळी प्रेक्षकांच्या गॅलरीमध्ये बसून चीअर अप करत होते.

मी २ फे. ला मुंबईला परतले त्यावेळी अहमदाबाद व बडोदा यथे लष्कर ठाण मांडून बसले होते. ओढून ताणून आणलेली शांतता चमत्कारिक भासत होती. त्याच सुमारास प्राध्यापक मंडळीनीही जोर धरला होता. आणि विद्यार्थ्यांच्या बरोबरीने गुआराने, प्राध्यापकांच्या संघटनेने लढ्यात भाग घ्यायला सुरुवात केली होती. गुजराथच्या लढ्याचे हे वैशिष्टच होते. प्राध्यापकांच्या जिवंतपणाची ती निशाणी होती. बडोद्यातील शिक्षकांनी संपावर जायचा निर्णय घेतला होता. जाळपोळ लुटालूट, संचारबंदी हे उद्रेक चालूच राहिले. चळवळीचा नवीन कार्यक्रम होता कांग्रेसी आमदारांना राजीनामा देण्यास भाग पाडणे. एवढं रक्त सांडूनही केंद्रसरकार बधत नव्हतं. जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे आमदार दारं बंद करून घरात बसले होते. त्यांना घेराओ घालायचा. एकेकाला टिपून काढायचं आणि राजीनामा मागायचा. ९ फेब्रुवारीला कोर्टाकडून निर्णय जाहीर झाला. पोलीस संचारबंदी मोडणारांसाठी 'शूट अॅट साईट', दिसल्या जागी गोळी घाला हा हुकूम कायद्याचा भंग करणारा आहे. संचारबंदीचा हुकूम मोडणारावर खटला भरता येतो पण त्याचा जीव घेणे अवैध आहे. जनतेचा हा एक विजय होता. केंद्रीय कायदेमंत्री एच. आर. गोखले या सुमारास खास पहाणीसाठी आले. आल्या आल्या त्यांनी अंतर्गत सुरक्षा कायद्याखाली पकडण्यात आलेल्या ८७ विद्यार्थी व प्राध्यापकांना सोडून देण्याचा सल्ला दिला. चिमणभाईंच्या हातून सत्ता गळून जात होती. जनतेची शक्ती हळुहळू वाढत होती. आणि ९ फे. ला दिल्लीहून घोषणा झाली. चिमणभाई सरकार उखडून टाकले गेले. जनता यशाने बेभान झाली. तिने आनंदाने जल्लोश केला.

१० फेब्रुवारीला १०,००० विद्यार्थी आणि इतर सहानुभुतीदार यांची जंगी मिरवणुक काढून नवनिर्माण युवक समितीने पुन्हा एकदा आपल्या शक्तीची चाचपणी केली. लढ्याची पुढची पायरी. नुसतीच राष्ट्रपती राजवट त्यांना नको होती. आंध्रच्या चळवळीचे उदाहरण ताजे होते. विधानसभा स्थगित ठेवून तीच पुन्हा जिवंत करता येते. रोश नुसत्या चिमणभाईंवर नव्हता. चिमणभाईंना निवडून देण्यासाठी ज्या आमदारांनी पैसे खाल्ले त्या सर्वांवर होता. एकूण राजकारणातील आणि व्यापारातील भ्रष्टाचारावर होता. तेव्हा थांबणे शक्यच नव्हते. संघटना कांग्रेसने जनतेची चाल ओळखली. ताबडतोब आपल्या १६ आमदारांना राजीनामा देण्याचे आदेश दिले. आम्ही जनतेचा कौल मानतो. जनसंघही मागे राहायला तयार नव्हता. तीनही सदस्य विधानसभेतून बाहेर पडले. नगरपालिकातूनही जन-

मलपृष्ठ १ वर

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : तेरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १३ एप्रिल | अंक : सेहेचाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


'सोल्झेनित्सिन' हा श्री. वा. दा. रानडे यांचा लेख 'माणूस'च्या २३ फेब्रुवारी १९७४ च्या अंकात प्रसिद्ध झाला. त्यासंबंधी इगोर तोगोयेव, माहिती अधिकारी, सोव्हिएट कौन्सुलेट जनरलची माहिती शाखा, मुंबई यांच्याकडून 'माणूस'ला दहा पानी प्रदीर्घ पत्र आले. जागे अभावी ते संबंध छापणे शक्य नाही व त्यातील बऱ्याचशा भागाचा श्री. रानडे यांच्या लेखाशी काही संबंध नाही. पण लेखातील काही चुकांसंबंधी पत्रात जे म्हटले आहे त्यातील महत्त्वाचा भाग संक्षेपाने येथे देत आहोत. सोबत श्री. रानडे यांचे उत्तरही प्रसिद्ध करीत आहोत. —संपादक

श्री. संपादक,
साप्ताहिक 'माणूस' यास,
स. न. वि. वि.

आपल्या साप्ताहिकात अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या एका लेखामुळे (सोल्झेनित्सिन' वा. दा. रानडे, २३ फेब्रुवारी १९७४) आमच्या देशाची विपर्यस्त प्रतिमा निर्माण होण्याचा संभव आहे म्हणून कृपया मला उत्तराची संधी द्यावी. केवळ काही मोठ्या महत्त्वाच्या चुका तेवढ्याच निदर्शनास आणू इच्छितो. (बहुतेक चुका सोल्झेनित्सिन यांच्या मूळ ग्रंथातल्याच आहेत.)

श्री. वा. दा. रानडे म्हणतात त्याप्रमाणे 'सेकंड शॉक आर्मी'ने ७ जानेवारी, १९४२ ला लेनिनग्राद नाकेबंदी फोडून 'बाहेर निसटण्याचा' प्रयत्न' केला नाही. वस्तुस्थिती येणे प्रमाणे :

दुसऱ्या शॉक आर्मीने लेनिनग्रादचा वेढा 'बाहेरून फोडून' लेनिनग्रादपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. लेनिनग्रादच्या कोंडीतून बाहेर निसटण्याचा प्रयत्न केला नाही. दुसरी गोष्ट म्हणजे ७ जानेवारी ते १५ एप्रिल १९४२ या काळात या सेनेचे प्रमुख होते क्लिअकोव; रानडे म्हणतात त्याप्रमाणे व्लासोव नव्हते (माणूसमध्ये 'लासोव' असा उल्लेख आहे.) सेकंड शॉक आर्मीला आपले उद्दिष्ट साध्य करता आले नाही ही गोष्ट खरी. वेढा घालणारी जर्मन फौज संख्येने फारच भारी होती म्हणून हे अपयश आले. परंतु गुलाग आर्चिपेलागोमध्ये सोल्झेनित्सिन यांनी म्हटल्याप्रमाणे या रशियन फौजेला तोंडघशी पाडण्यात आले ही गोष्ट मात्र साफ खोटी आहे. मुसंडी मारून घुसलेल्या रशियन फौजेला चिंचोळ्या पट्टीतून रसद सतत पुरविण्यात आली. ही रसद तोडण्याचा जर्मनांनी वारंवार प्रयत्न केला पण प्रत्येक वेळी जर्मन फौजांना हटवून काही दिवसांच्या अवधीतच रसद पुन्हा चालू करण्यात आली. हा प्रकार वारंवार घडला. वरून जर्मन विमानांची सतत बॉम्बफेक चालू असतानाही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या चिंचोळ्या पट्टीमध्ये काही अंतरापर्यंत एक नॅरोगेज रेल्वेलाईनही टाकण्यात आली ! १ जुलैपर्यंत २०,००० फौज अशाप्रकारे यशस्वीरित्या माघारी काढून घेण्यात आली. यामध्ये कित्येक जखमी सैनिकही होते. व्लासोवला जर्मन कैद करू शकले याचे कारण म्हणजे तोपर्यंत व्लासोवने मनात वेगळेच बेत निश्चित करून टाकले होते. १५ एप्रिल रोजी क्लिअकोव गंभीर दुखण्याने आजारी पडले तेव्हा सेकंड शॉक आर्मीचे प्रमुख म्हणून व्लासोवची नेमणूक झाली. २१ जून रोजी व्लासोवला रेडिओवरून कळविण्यात आले की, त्याला व त्याच्याबरोबरच्या वरिष्ठ स्टाफला सुखरूप परत आणण्यासाठी एक तुकडी पाठविण्यात येत आहे. जखमींनाही सुखरूप परत आणण्यास ही तुकडी समर्थ असल्याचे त्याला सांगण्यात आले. पण व्लासोवची प्रतिक्रिया काय असावी ? २३ जून रोजी त्याने असा हुकूम दिला की, बिनतारी दळणवळणाची सारी साधने नष्ट करून टाका ! या साधनांबरोबरच सुखरूप परतण्याची आशाही व्यवहारतः नष्ट झाली.

जर्मनांना शरण गेल्यापासून ते त्याने केलेल्या प्राग नगरीच्या तथाकथित विमोचनापर्यंत व्लासोवने केलेल्या कारवायांची हकिकत रानडे यांच्या लेखात दुर्दैवाने सापडत नाही. या काळात तो कैदेत होता असे उपरोक्त लेखात म्हटले आहे ते साफ चुकीचे आहे. तो मुक्त होता, एवढेच नव्हे तर या काळात त्याने अनेक क्रूर व घृणास्पद कृत्ये केली.

चेकिया प्रदेशात, मुख्यतः प्रागमध्ये ५ मे १९४५ रोजी चेक राष्ट्रीय मंडळाच्या नेतृत्वाखाली उठाव झाला. परंतु त्यांच्याविरुद्ध जर्मनांनी तोफखान्याचा प्रचंड प्रमाणावर वापर केला आणि ८ मे पर्यंत चेक राष्ट्रप्रेमी शक्तींची भयंकर पिछेहाट झालेली होती. या देशप्रेमी शक्तींनी सोविएत सेनेकडे सहाय्याची मागणी केली आणि बर्लिनच्या लढाईत विजय मिळवून क्षणभर दम घेणाऱ्या सोविएत सेनादलांनी त्या थकल्या असताना सुद्धा ६ मे रोजी तात्काळ दक्षिणेकडे कूच केले. त्याचवेळी दुसऱ्या एका सेनाविभागाने व्हिएन्नाहून उत्तरेकडे कूच केले. जनरल एल्. स्वोबोदा (आता चेकोस्लोवाकियाचे राष्ट्राध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखाली रशियन आघाडीवर फार पूर्वीच चेक सेनादलाची स्थापना करण्यात आली होती. त्यांच्या तुकड्यांनी सोविएत सेनांच्या समवेत चेकोस्लोवाकियात प्रवेश केला. तिसऱ्या सोविएत रणगाडादलाच्या तुकड्यांनी प्रागमध्ये ९ मे रोजी प्रवेश केला आणि त्या शहराला कत्तलीपासून वाचवले.

पृष्ठ ४० वर

# महाराष्ट्र मंत्रिमंडळातील असंतोष

माहितगार

महाराष्ट्रातील सरकार स्थिर आहे; पण या स्थिर सरकारात वादळ नाही असं मानण्याचं कारण नाही. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या आसनाला सुरुंग लागले आहेत याची जाणीव पुरेपूर आहे म्हणूनच त्यांच्या चेहऱ्यावरचं हास्य मावळून गेलं आहे! नाईकांच्या कारभारावर काँग्रेसच्या आमदारांचाही विश्वास राहिलेला नाही. भ्रष्ट कारभाराला मोकळीक मिळत आहे असं आमदार उघडपणे बोलत आहेत. विधानसभेत हजर रहावं असं नाइकांनाच वाटत नाही, तर मग आम्ही का म्हणून हजर रहावं, असंही बरेच आमदार विचारीत असतात. दोन महिन्यांच्या विधानसभा सत्रात नाईक कधी पाच मिनिटे कधी दोन मिनिटे हजर होते. त्यांची गोळावेरीज केली तरी मुख्यमंत्री या नात्याने त्यांची दोन दिवसांची हजेरीही भरणार नाही, असा हिशोब लावला जात आहे. 'मित्रांवर कृपेची बरसात' ही विरोधी पक्षांचीच तक्रार नाही. गलथान कारभाराची परिसीमा, दिशाहीन धोरण कार्यक्रमाला गौण स्थान हे नाईकांच्या कारभाराचं वैशिष्टच असल्याचं काँग्रेस आमदार सांगतात, त्याची चर्चा करण्यासाठी खास बैठकीची मागणी करतात आणि ही बैठक झाली असल्याचं पत्रक काढलं असताही २ एप्रिलला रात्री बैठक बोलवावी लागते. या घटना काँग्रेसमधील असंतोषाची कल्पना देतात.

या असंतोषाचे परिणाम सुरू आहेत. मुख्यमंत्र्यांना बदलावे अशी मागणी आता पुढे केली नाही; पण ती जाहीररीत्या किंवा स्पष्ट या शब्दात केलेली नाही एवढाच याचा अर्थ! मुख्यमंत्र्यांना बदलावे ही जाहीर मागणी न करता आमदारांच्या गटाचे तसे प्रयत्न चालू झाले आहेत. काही आमदार नुकतेच पंतप्रधानांनाही भेटून आले आणि त्यांच्याजवळ त्यांनी मुख्यमंत्री बदला एवढीच मागणी केली आहे.

वसंतराव नाईक डावपेचात कुशल आहेत. त्यांच्याविरोधी कारवाया चालल्या आहेत. त्याला मंत्र्यांच्या—आपल्या सहकाऱ्यांच्या—एक गटाचा पाठिंबा आहे हे लक्षात येताच नाइकांनी आपले पवित्रे टाकण्यास सुरुवात केली. जातीयवादाचा आश्रय घेतला जाऊ लागला. मराठा जातीच्या नेत्यांनी बंद खोलीत बसून 'मुख्यमंत्रिपदाचा वाद सोडवला पाहिजे' या शालिनीबाई पाटील यांच्या विधानाचा आधारे सध्याचा असंतोष मराठा जातीच्या राजकारणाचा परिपाक असल्याचं सांगण्यात येऊ लागलं. पंतप्रधानांनी असंतुष्ट बंडखोर आमदारांना मराठा जातीचा मुख्यमंत्री हवा म्हणून हे चाललं काय, असंही विचारलं. परंतु आम्हाला जातीशी कर्तव्य नाही. कार्यक्रमासंबंधी आमची ठाम भूमिका असल्याचं पंतप्रधानांना सांगण्यात आलं आणि आता पंतप्रधानांनाही महाराष्ट्रातील बंडाचं वारं हे जातीच्या राजकारणासाठी नाही याची जाणीव झाली आहे. वसंतरावदादा पाटील यांनी एका गरमागरम चर्चेच्या वेळी तर मधुकर चौधरी यांना 'तुम्ही आम्हाला जातीची आठवण करून दिली' असल्याचं सांगितलं होतं. यावरून जातीचं राजकारण कसं पेटवलं जात आहे ते स्पष्ट होते.!

जातीच्या राजकारणाबाबत पंतप्रधानांची भूमिका लक्षात घेऊन मराठा विरुद्ध अल्पसंख्यांक असं राजकारण खेळण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यासाठी मुस्लीम, लेवा पाटील व विदर्भातील नवागत मंत्री यांचा गट बांधला गेला. सध्याचा असंतोष मराठा जातीसाठी आहे, हे सांगण सोपं होतं. पण त्याच्या पुराव्यासाठी ठोस उदाहरणे नव्हती. उलट बाजूनं याचा फायदा घेतला गेला. बाळासाहेब खेर, मोरारजीभाई देसाई, कन्नमवार व आता नाईक हे चार मुख्यमंत्री मराठा नव्हते; पण ते महाराष्ट्राने स्वीकारले आहेत. यशवंतराव चव्हाण यांचा अपवाद वगळता महाराष्ट्राला मराठा मुख्यमंत्री लाभलेला नाही, असं नाईकविरोधी गटानं पंतप्रधानांना सांगितलं. त्याचबरोबर मंत्रिमंडळातून अनेक मराठा मंत्र्यांना वगळलं तरी त्याविरुद्ध कोणी आवाज उठवला नाही असा युक्तिवाद केला गेला. त्यामुळे नाईकविरोधी गटाचे राजकारण जातीचं नाही याची खात्री होऊ लागली. हे सांगत असतानाच महाराष्ट्रातील आजच्या मराठा नेत्यांनी 'मराठा जाती'साठी राजकारण केलेलं नाही. तरीही त्यांच्याविरुद्ध जातीय राजकारणाचा आरोप केला जात आहे याचा परिणाम मराठा समाजावर उलटा होऊन त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटेल व मराठा तरुणांत जातीयवादाची भावना जोराने

फैलावेल. ही भावना फैलावली की, आज जातीचे राजकारण करणारे नेतृत्व हा तरुण व समाज प्रस्थापित करील. मग मात्र कडवा जातीयवाद महाराष्ट्राच्या भूमीत फोफावेल, असं नाईकविरोधी गटानं दिल्लीत सांगितलं आहे, त्याचा त्यांच्या दृष्टीनं अनुकूल परिणाम झाला आहे आणि आता पंतप्रधानांनाही मराठा व्यक्तीकडे मुख्यमंत्रीपद गेलं पाहिजे हे पटू लागलं आहे.

या परिस्थितीमुळं नाईक व त्यांच्या पाठीराख्यांनी आता अल्पसंख्याकांचे राजकारण करण्याचा पवित्रा सोडून दिला असून त्यांनी बाळासाहेब देसाई व राजारामबापू पाटील यांना जवळ करण्यास सुरुवात केली आहे. नाईकांचे मित्र नाशिकराव तिरपुडे यांचे विधान परिषदेसाठी नाव सुचवणाऱ्यामध्ये बाळासाहेब देसाई आघाडीवर होते. हेही लक्षणीच आहे ! खुजगावच्या निमित्तानं दादाविरुद्ध उभे केलेले राजारामबापू या परिस्थितीत मुख्यमंत्र्यांबरोबर न जाते तरच नवल ! दिल्लीत मराठा जातीचा मुख्यमंत्री करण्याला विरोध नाही असे दिसताच नाईकांनी त्या दिशेनं आपलं शीड फिरवलं आहे.

आपल्यानंतर मुख्यमंत्रीपदी मधुकरराव चौधरी यांना आणण्याचा मुख्यमंत्र्यांचा आटोकाट प्रयत्न आहे. तो यशस्वी झाला नाहीतर पर्याय म्हणून ते राजारामबापूंसाठी हालचाली करीत आहेत. आपल्या विरुद्धचे वादळ थोपवण्यासाठी नाईकांनी या आधी जी राजकारण मीमांसा केली ती एकवेळ समर्थनीय ठरावी ! पण आता त्यांची चाल यशवंतराव चव्हाण यांना आव्हान देणारी ठरत आहे. अजूनही महाराष्ट्राचे राजकारण यशवंतराव चव्हाण यांच्या सल्ल्याने चालले आहे. वसंतराव नाईकानंतर कोण हा प्रश्न सोडविण्यासाठी साहजिकच यशवंतराव चव्हाण यांच्याशी पंतप्रधान विचारविनीमय करणार. परंतु महाराष्ट्राचा नवा नेता आपण ठरवू तो व्हावा यासाठी नाईकांचे प्रयत्न आहेत. यासाठी ते चौधरी वा राजारामबापू पाटील यांच्या करता खटपट करत आहेत. याचा अर्थच नाईकांनी ठरवलेली व्यक्ती मुख्यमंत्री होणार असेल तर यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाला ते आव्हान ठरणार आहे. काँग्रेस आमदारांना याचीही जाणीव झालेली असल्याने ते यशवंतराव चव्हाण यांच्या कारकीर्दीत महाराष्ट्राची पुरोगामी प्रतिमा झाली होती पण नाईकांच्या काळात ती प्रतिमा डागाळली असल्याचे म्हणत आहेत.

महाराष्ट्र काँग्रेसमधील असंतोष हा मुख्यमंत्रीपदी नाईकच राहावेत वा ते त्या पदावरून जाऊन आपल्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ पडावी या मर्यादित राजकारणापुरता राहिलेला नाही. या निमित्तानं महाराष्ट्राचं नेतृत्व यापुढे कोणाकडे ? यशवंतराव चव्हाण की वसंतराव नाईक यांच्याकडे या वादाची बीजे पेरली जात आहेत. नेतृत्वाचं राजकारण खेळायचं तर सत्तेच्या रिंगणात राहिलेच पाहिजे म्हणून नाईक आता मुख्यमंत्रीपदावरून जाण्यापूर्वी केंद्रीय मंत्रिमंडळात जाण्याच्या प्रयत्नात आहेत. नुसताच सत्तात्याग हा आपल्यावर एकप्रकारचा ठपका ठरणार ही नाईकांची भीती आहे. १९७२ मध्ये मुख्यमंत्रीपदी नाईकांची निवड झाली तेव्हा त्यांनी दोन वर्षांची मुदत पंतप्रधानाजवळ स्वतः कबूल केली होती. गेल्या काही दिवसापासून पंतप्रधानही नाईकांना ही मुदत संपली आहे एवढाच निरोप पाठवीत आहेत. पुढचे काहीच बोलत नाहीत. त्यामुळे नाईकांचं हास्य मावळून चितेचं जाळं त्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे तेही साहजिकच आहे !

आजच्या वादावादीत यशवंतराव चव्हाणांनी प्रत्यक्षात भाग घेतलेला नाही. पंतप्रधानांचा काय कल आहे ते श्री. चव्हाण अजमावून शेवटी शेवटी आपले मत व्यक्त करतील. तोपर्यंत शरद पवार, शिवाजीराव पाटील यांच्या सारख्यांच्या मार्फत ते हालचालीत करतील ! नाईकांच्या विरोधी चाललेल्या हालचालीत ही मंडळी सामील झाली नसती !

नाईकांच्या मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी विरोधी गेले आहेत. शंकरराव चव्हाणांनी उत्तरप्रदेशच्या निवडणुकांपूर्वी पंतप्रधानांना आपल्याला मंत्रिमंडळात राहणं अवघड झाल्याचं सांगितले होतं त्यावेळी पंतप्रधानांनी त्यांना 'वेट फॉर सम टाईम' एवढंच आश्वासन दिलं होतं. संशयी, डावपेचांना ऊत आणणारं राजकारण चाललेलं असतानाच श्री. शंकरराव चव्हाण पुनः पंतप्रधानांना भेटले आहेत. मध्यंतरी चंद्रजीत यादव 'एअर डॅश'ने आले व चौकशी करून निघून गेले होते.

आताच्या घडामोडीमुळे वसंतराव नाईक येत्या काही महिन्यात जाणार हे उघड होत आहे. त्यांच्यानंतर कोण येणार या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. परंतु येणारा मुख्यमंत्री मराठा असणार हे मात्र नक्की झालं आहे. आज नाईकांच्या विरोधी असणाऱ्या आमदारांत व मंत्र्यांत एकमत झालेले दिसते. या लोकांची भूमिका आज एवढीच आहे. आम्हाला स्वच्छ कारभार हवा. पक्षाने स्वीकारलेल्या कार्यक्रमानुसार धोरण स्वीकारणारे सरकार हवे ! शंकरराव चव्हाण यांनी आपल्या खात्यात स्वच्छ कारभाराचे उदाहरण दाखवून दिले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून स्वच्छ कारभार मिळेल असे हे लोक सांगत आहेत. आज जरी हे काही मंत्री शंकरराव चव्हाण यांना अनुकूलता दाखवीत असले तरी माळ गळ्यात पडण्याची प्रत्यक्ष वेळ येईल तेव्हा ते याच मताचे राहतील का हा प्रश्नच आहे. नाईकांच्या दृष्टीने हे चांगले आहे. आपल्यानंतर कोण हा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत आपलं मुख्यमंत्रीपद सुटत नाही हे त्यांचे गणित ! नंतर कोण या प्रश्नाचे उत्तर मिळाल्याशिवाय नाईक जात नाहीत म्हणून उरलेल्या तीन वर्षांकरता शंकरराव चव्हाणांना पाठिंबा द्यावा व १९७७ नंतर आपले घोडे पुढे दामटावे या पवित्र्यात बाकीचे इच्छुक आहेत !

आजचे वादळ थोपवण्यासाठी अनेक उपाय धुंडाळले जातील. त्यात स्वतंत्र विदर्भाचे राजकारण पुढे आणले जाणारच नाही का ? हा प्रश्नही दृष्टीआड करून चालणार नाही. तसेच श्री. नाईक मंत्रिमंडळ वाढीचा शेवटचा प्रयत्न करून पाहतील का ? मंत्रिमंडळाची वाढ केल्याने काही जणांना ते जसे खूश करतील तसेच त्यामुळे अनेकजण नाखूशही होतील. नाखुशांची संख्या वाढवण्याचा धोका ते पत्करतील का ? ज्यांची वर्णी लागली नाही ते विरोधी गटात सामील होतील हे उघड आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ वाढीचा प्रयोग श्री. नाईक करणार नाहीत आणि केलाच तर तो प्रयोग त्यांच्या विरोधीच जाईल.

□ □

समुद्रात वसत असलेली

# आणखी एक नवी मुंबई

सु. ल. सोमण

जुळ्या मुंबईला असलेला सर्व तऱ्हेचा विरोध मोडीत काढून आज त्या शहराची उभारणी वाशी गावापासून सुरू झालेली आहे. शेतकऱ्यांच्या, सर्व सामान्य जनतेच्या विरोधाला, त्याच्या आंदोलनाला सरकारने काहीच भीक घातली नाही. आजही तिथे, जुळ्या मुंबईला विरोध चालूच आहे, तथापी, 'सिडको'ने प्रयत्नपूर्वक हा विरोध बोथट केला आहे यात वाद नाही. दुर्दैवाने जे प्रामाणिक दृष्टिकोन सिडकोने बाळगले होते व त्यातून प्रशासनाची महत्त्वाची कार्यालये जुळ्या मुंबईत हलवली जातील असा आशावाद बाळगला होता, तो मात्र सध्यातरी खोटा ठरला आहे. सरकारनेच या बाबतीत 'सिडको'ला दगा दिला आहे, आणि सरकारची नवनवीन कार्यालये फोर्टातच उभारण्याचा खटाटोप आरंभला आहे. बहुसंख्य शासकीय कार्यालये फोर्टातच उभी असल्याने, अगदी साध्या तार्किक दृष्टिकोनातून, मोठमोठ्या कंपन्यांची अद्ययावत कार्यालये देखील, फोर्ट वा सचिवालयाच्या आसपासच्या परिसरात उभी राहात आहेत. सरकार दरबारी असलेली कामे झटपट उरकण्याच्या दृष्टीने ते सोयीचे ठरते. साहाजिकच या कारणामुळे जुळ्या मुंबईचे स्वरूपही फारसे स्वयंभू न ठरता, मुंबईचेच एक प्रचंड उपनगर (आज जसे ठाण्याचे स्वरूप आहे तसे!) असेच स्वरूप राहायची शक्यता आजतरी वाढलेली आहे. सिडकोच्या ठाणे ते दादर ह्याया नवी मुंबई अशा बसेस धावतात. वाशी वगैरे भागातून मुंबईकडे जाणारा प्रवासीवर्ग जर ह्या बसेसमधून न्याहाळला तर माझ्या वरील म्हणण्याचा प्रत्यय येऊ शकेल.

ह्याच जुळ्या मुंबईचे अपेक्षित हेतू पार उधळून लावणारी आणखी एक नवी मुंबई महाराष्ट्र शासन सध्याच्या 'फोर्ट' परिसरालगतच उभी करीत आहे. भर समुद्रात! बॅक बे रिक्लेमेशन हे ह्या पाण्यातल्या नव्या मुंबईचे सध्याचे नाव! जुळ्या मुंबईपेक्षाही फार मोठा विरोध ह्या योजनेला आज होतो आहे. सरकारच्या अनेक समित्यांनी देखील बॅक बे विरोधी कौल दिलेला आहे. (अपवाद फक्त बर्वे समितीचा!) अनेक मान्यवर तंत्रज्ञांनी या योजनेवर टीकेची झोड उठविली आहे. विरोधी पक्षांनी तर ही योजना होऊ न देण्याचा विडा उचलला आहेच, पण खुद्द मुंबई प्रदेश कॉंग्रेसचाही ह्या योजनेला कडाडून विरोध आहे. एवढेच नाही तर ज्या मुंबई महापालिकेचा या योजनेशी अतिशय जवळचा संबंध येतो (कारण बॅक बे योजना ही मुंबई विकास योजनाच आहे व क्षेत्रही मुंबई महापालिकेच्या हद्दीतलेच आहे!) तिनेही अगदी एकसुरात या योजनेला विरोध केला आहे. पण एवढे सारे असूनही, महाराष्ट्र शासन ही योजना आज राबवीत आहे. अगदी अलीकडेच, मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक ह्या योजनेसंबंधात विधान सभेत विरोधकांवर तुटून पडले. महापालिकेच्या सर्वसंमत ठरावाविषयी बोलतांना त्यांनी विधान सभेत सांगितले की :—

'मुंबई कॉर्पोरेशन असो की आणखी कुणी, त्यांच्या तंत्राने हे सरकार चालणार नाही. जे योग्य आहे, न्याय्य आहे ते हे सरकार जरूर करील आणि सरकारचे तेच काम आहे असे मला वाटते... महापालिकेने आपले काम करावे. सरकारला सरकारचे काम करू द्यावे...'

मुख्यमंत्र्यांच्या या विधान सभेतल्या भाषणाचे पडसाद सर्वत्र

उठले. महापालिकेनेही ठासून नंतर ठराव केले की, 'बॅक बे'मधील नवीन बांधकामांना महापालिकेने परवाने देऊ नयेत, रस्ते, पाणी, वीज, वाहतूक आदी सोयी उपलब्ध करून देऊ नयेत वगैरे वगैरे. बॅक बे योजनेमुळे सरकारला प्रचंड उत्पन्न मिळेल (असे सरकारचे म्हणणे आहे!) पण रस्ते, पाणी, वीज, वाहतूक वगैरेसाठी प्रचंड खर्च करावे लागतील ते मात्र महापालिकेला. बॅक बे योजना पूर्ण झाल्यावर जे असंख्य प्रश्न निर्माण होतील त्यांना तोंड द्यावे लागेल, महापालिकेला, दोन्ही रेल्वेजना. त्याच्यावरचा प्रचंड खर्चही ह्याच संस्थांना सोसावा लागेल. त्यामुळे महाराष्ट्र सरकारचा आर्थिक फायदा, पण इतर सर्व संस्थांचा तोटा असला हा प्रकार आहे असे निदान महापालिकेला तरी वाटते. सरकारी अनुदान मिळाले तरी येणारी तूट प्रचंड राहील, व तो बोजा येन केन प्रकारेण नेहमीप्रमाणेच सामान्य जनतेवरच लादला जाईल. त्यात शिवाय इतर अनेक अडचणींना, प्रश्नांनाही त्याला तोंड द्यावे लागेल ते निराळेच...

विरोधी पक्ष, निरनिराळे तंत्रज्ञ, महापालिका, सिडको, रेल्वे, बेस्ट सर्व आपापल्या परीने ह्या योजनेला विरोध करीत आहेत. सर्व सामान्य माणूस या योजनेमुळे अधिकच भरडला जाईल असे त्यांना वाटते. त्याच्या प्रवासाच्या वेळेत वाढ होईल, प्रवास खर्चात वाढ होईल, प्रवासात त्याची चेंगराचेंगरी होईल, समुद्रावरील नव्या मुंबईत राहाणे त्याला परवडणार नाही; तिथे त्याला पाणीही मुबलक मिळणार नाही, कोळ्यांना त्यांचा धंदा बॅकबेमुळे तिथल्या पाण्यात करता येणार नाही वगैरे. ह्या अनेक समस्या सामान्य माणसाला ह्या नव्या मुंबईमुळे भेडसावतील असाही प्रचार केला जातो. पण असे असले तरी प्रत्यक्ष सामान्य माणसाशी बोलतांना मात्र ह्या व्ही. टी. किंवा चर्चगेट ह्या दोन स्थानकातून फोर्टात ओसंडणाऱ्या प्रचंड प्रवाहातल्या काहींशी मी बोललो. सर्व सामान्यपणे, ऑफिसातून जाणारे कारकून, शिपाई मी हेरले. मला एकंदर ऐकू आलेली प्रतिक्रिया काहीशी निराशाजनक होती. बॅक बे विषयीची त्यांची माहिती म्हणजे, सचिवालयाजवळ जमिनीत भर घालून निर्माण केली जात असलेली नगरी, तिथल्या गगनचुंबी इमारती, त्या इमारतीमधली 'पॉश' ऑफिसे, काही पॉश हॉटेल्स, तिथल्या व एकूण परिसरात हिंडणाऱ्या पॉश मोटारी-पॉश मंडळी आणि पॉश पोरीसुद्धा! कुलाब्यापर्यंत रेल्वे जाऊन भिडणार ही त्यांना सुखद वाटणारी कल्पना. तर सरकत्या पुलावरून आपण अलगद 'ट्यूब रेल्वे'च्या स्टेशनावर उतरणार, जमिनीखालून, रेल्वेतून, अगदी गोऱ्या साहेबाप्रमाणे प्रवास करणार हे त्याचे 'रोमँटीक' स्वप्न! पण ह्यापलीकडे जाऊन, 'इथे येतांना तुमचा जास्त वेळ खर्च होणार नाही का?' ... जादा गर्दीमुळे तुम्हाला त्रास होणार नाही का? इथे राहायला येणे तुम्हाला परवडेल का? एकूणच योजनेवर तुमची मते काय आहेत?...' ह्या माझ्या प्रश्नांना मिळालेली उत्तरे साधारणतः पुढीलप्रमाणे होती.

'सध्याच आमचा प्रवास तास दीड तासाचा होतो. दोन्ही वेळा मिळून अडीच तीन तासांचा. त्यात आणखी अर्ध्याएक तासाची भर पडली तर फारसं काही बिघडेल असं मला वाटत नाही. आणि काही वाटूनही फायदा नाही. कारण हा प्रवास टाळता येईल हे कधीच शक्य वाटत नाही. हा प्रवास आता आमच्या पाचवीलाच पुजला आहे. इथे आधी राहायच्या जागा आहेत हेच मला माहीत नाही. आणि असल्यातरी कानावर आलेले हजार दीड हजार रुपये फुटाचे दर कुठल्या कारकुनाला परवडणारे आहेत? तेव्हा प्रवास टाळून इथे राह्यला यायचे स्वप्नातच कदाचित शक्य होईल, किंवा फार तर मायबाप सरकारने मेहरबानी केली तर एखादी झोपडपट्टी उभारून इथे रहायला येणे शक्य होईल. अर्थात ही शक्यता देखील आम्हा पांढरपेशांच्या बाबतीत कमीच. तेव्हा दूरवर डोंबिवली, कल्याण उल्हासनगर इथे राहायचे, कामासाठी तिथून रोज दोन तीन तासांचा प्रवास करायचा हे टाळता येण्यासारखं नाही असेच मला वाटते. हे टाळता येण्यासारखे नसले तर प्रवासातल्या गर्दीचा उगाच धसका घेऊन आम्हाला चालणार नाही. पोट जाळायचे तर हे सव्यापसव्य कसेही करून केलेच पाहिजे. सध्याच तिघांसाठी असलेल्या बाकड्यावर आम्ही चौघे बसतो. थोडेसे दाटीवाटीने. उद्या आम्ही आणखी थोडे आकुंचन पावू. चौघांऐवजी पाच बसू. गर्दीची सवय आहेच. चेंगराचेंगरीची लावून घेऊ...'

माझ्या, मुंबईत धावणाऱ्या सामान्य माणसाबरोबरच्या बोलण्यात मला साधारणतः वरील सूरच आढळला. बॅक बे रद्द करण्यासाठी मोठ्या आंदोलनाची आवश्यकता–फार मोठी चीड असूनही–त्यांच्या मनात निर्माण झालेली नाही असेच मला तरी जाणवले. 'बॅक बे' होणारच, त्यातून येणाऱ्या प्रसंगांना तोंड देणे भाग आहे, हेच जणू त्याने गृहीत धरलेले आहे. एकूण योजनेविषयी सविस्तर माहिती त्याला धड नाही, व त्यामुळे येऊ घातलेल्या समस्यांच्या गंभीर स्वरूपाचीही त्याला धड जाणीव नाही...

बॅक बे रिक्लेमेशन योजनेवर आज जोरात चर्चा सुरू असली तरी ती योजना तशी फार जुनी आहे. ब्रिटीश शासनाचा वारसा सांगणारी ही योजना, प्रथम पुढे आली ती १८८४ मध्ये! 'नेटिव्ह' श्रीमंतांच्या दृष्टीने जागा उपलब्ध करून देण्यासाठी, कुलाबा आणि इतर पश्चिम किनाऱ्यावर भिंत बांधून, समुद्रात भर घालून जागा उपलब्ध करण्याची ही योजना. त्याचबरोबर, दादर, शीव, वडाळा, शिवडी वगैरे उथळ भागातून समुद्र मागे हटवून गरीब नेटिव्हांसाठी जागा उपलब्ध करण्याचीही त्यात तरतूद होती! इ. स. १६६४ मध्ये पोर्तुगीजांकडून मुंबई बेट इस्ट इंडिया कंपनीला मिळाल्यावर फोर्टात गोऱ्यांसाठी वसाहती निर्माण करून, आणि श्रमिकजनतेला दूरवर गिरगावच्या पलीकडे पाठवून ब्रिटिशांनी उच्चभ्रू लोकांची एक व कष्टकरी मध्यमवर्गियांची दुसरी, अशी मुंबईची विभागणी प्रथम केली. १८८४ च्या रिक्लेमेशन योजनेतही ह्याच पद्धतीवर मुंबईची जडणघडण करण्याच्या दृष्टीने पावले टाकली गेली. १९१७ मध्ये डेव्हिड ससून, शापुरजी भरुचा, फाझलभाई करीमभाई, लल्लुभाई सामळदास आणि टाटा यांच्या एका सिंडीकेटने कंपनी स्थापून तिच्याद्वारे समुद्र मागे हटविण्याची योजना राबवायच्या दृष्टीने आराखडे तयार केले. पण त्यावेळच्या ब्रिटीश शासनाने या कंपनीची डाळ शिजू दिली नाही व स्वतःच १९२० मध्ये ही योजना हातात घेतली. पारशी जिमखान्यापासून कुलाब्यापर्यंत ११४४ एकर जमीन समुद्र मागे हटवून औद्योगिक, रहायच्या वसाहतीसाठी उपलब्ध करण्याची ही योजना होती. एकूण ८ भागात ह्या योजनेची विभागणी झाली

पृष्ठ ३४ वर

शतपावली

# कवी यशवंत ७५

रवींद्र पिंगे

कवी एक सांगतो. त्याची कविता दुसरंच सांगते. कवी काय सांगतो, काय बतावण्या करतो, कशी वेळ मारून नेतो, कसा गुंगारा देतो, ह्यापेक्षा कवीची कविता काय सांगते, ती पुन्हा पुन्हा कशी खुणावते, डोंगराच्या पिछाडीला पडलेल्या चंद्रोदयाच्या मोत्याळ चांदण्यासारखी शब्दांच्या माळेच्या पलीकडले कुठले अन्वय ती सांगते, हेच महत्त्वाचं आहे. कवी काय वाटेल ते सांगेल नि गप्प बसेल. किवा, आळी मिळी गूप चिळी टेवील. कवी पवित्रा घेऊ शकतो. कवितेचे तसं नाही. ती पवित्रा घेऊ शकत नाही. समुद्राच्या घोंगावणाऱ्या गाजेसारखी ती टाहो फोडते. प्रत्येक सत्कवितेला टाहो फोडता येतो. सत्कवीने जादा वटवट करायचं कारण नसतं. प्रत्येक कविता जन्म घेते ती आपली स्वयंसिद्ध वाचाळ मातृभाषा घेऊन.

वगैरे. वगैरे.

कवी एक सांगतो नि त्याची कविता वेगळंच काहीतरी सांगते, सूचित करते, असं वारंवार घडतं. मग सलामीलाच आपला विरस होतो. यशवंतांनी ह्या आपत्तीतून रसिकांना वाचवलेलं आहे. खुद्द ते अधूनमधून सांगतात ते आणि त्यांची कविता सलगपणे सांगत आली आहे ते, ह्याचा तोंडवळा हुबेहूब जमतो. आपल्या कवितेच्या सभोवार घोटाळणाऱ्या प्रियजनांना पेचात न टाकल्याबद्दल आणि आपल्या कवितेला तिच्याच मातृभाषेत यथेच्छ बोलू दिल्याबद्दल कविवर्यांच्या ओंजळीत प्रथम ही संतोषाची दोन फुलं ठेवतो.

कवी समोर उभे आहेत. वय वर्षे पंच्याहत्तर. निःसंशय म्हातारे दिसताहेत. जरामुक्त कोणीही नाही. मग यशवंत कवी ह्याला अपवाद कसे असतील ? पण कवीचा बांधा थोराड आहे. त्यामुळे चाफ्यासारखे वाळलेले वाटत नाहीत. गेली पंचवीस वर्षं ह्या ना त्या निमित्ताने मी यशवंतांना पहात आलो आहे. प्रत्येक वेळी त्यांचं आडवं हाड डोळयात भरत आलेलं आहे. खरं म्हणजे त्यांच्या रूपातही फारसा फरक पडलेला दिसत नाही. वीस वर्षांपूर्वी त्यांच्याशी माझी पहिली बैठक झाली होती. त्यावेळी त्यांनी आपल्या प्रकृतीच्या ढीगभर कागाळया सांगितलया होत्या. नंतर पत्रापत्री झाली. त्यातही तब्बेतीची गाऱ्हाणी होतीच. कधी पावलं दुबळी होत होती, कधी मांडी दुखत होती, कधी डोकं दुखत होतं, कधी नजर नीट काम देत नव्हती. ह्या सगळ्या रिपरिपी अजूनही चालूच आहेत. रक्तदाब आहे, मधुमेह आहे, वगैरे. पण प्रथम दर्शनी तसं वाटत नाही. चांगला तगडा माणूस यथाकाल थकावा, तसे यशवंतराव वाटतात. विकलांग वाटत नाहीत. झाडावरचं हिरवं पान झाडावरच पिकावं तसा प्रकार आहे. आकार तोच. फक्त तकाकी लुप्त आणि रंगात बदल. मात्र, झाडावरच्या पिकलेल्या पानाला पायतळी पडलेल्या पाचोळयाची अवकळा आलेली नाही. झाडावर असतं तोपर्यंत पिकलेलं पानही जिवंत असतं.

बघता बघता यशवंत म्हातारे झाले· आनंद आहे. सफल वृद्धापकाळ. हे नियतीने अंगाखांद्यावर शिंपडलेले गुलाबपाणी असतं. यशवंतांच्या दिलखुलास व्यक्तिमत्त्वाला तो सुगंध लाभलेला आहे. मराठी साहित्याच्या औटक्या जगात मराठी साहित्यसेवकाला जी जी भलाई लाभायची असते ती सारी त्यांना पोटभर मिळालेली आहे. कशात काही उणं नाही. मराठी काव्यकुंजात त्यांनी आपली स्वतंत्र पायवाट रेखलेली आहे. असं दिगंतराचं भाग्य कितीजणांना लाभतं ? शे-दोनशे कवी जेव्हा जिवाचा आटापिटा करतात, तेव्हा एखाद्याच्याच भाळी नियती तो भाग्यतिलक कोरते. तांबे–सावरकर–गोविंद–गोविंदाग्रजांनंतर थेट यशवंत. मधली पानं कोरी आहेत. यशवंतांबरोबर माधवज्यूलियन. नंतर अनिल, कुसुमाग्रज, मर्ढेकर. सध्या पु. शि. रेगे आणि नव्या व्याकुळ अवतारातले पाडगावकर. ह्या सर्वांच्या स्वतंत्र पायवाटा आहेत. उरलेले नुसते वहिवाटदार. यशवंतांचं अकलंकित भाग्य असं की त्यांच्या कवितेला स्वतःचे असे निराळे जग लाभले आहे. स्वधर्म आहे.

इथे यशवंतांनी कवी म्हणून जिंकलं.

कवींनी मुक्कामाला पोहोचेपर्यंत खा–खा खस्ता खाल्ल्या ह्याचं कौतुक आता आपण करण्याचं प्रयोजन नाही. आधी मुळात ह्या रस्त्यात दिडक्या होत्याच कुणाकडे ? असल्याच तर सावकारांकडे होत्या. त्याही आजच्या गबर बागाईतदाराकडे असतात अशा गोणी भरभरून तर खासच नव्हत्या. मॅट्रीकच्या मांडवाखालून गेलेला कुठलाही उमेदवार जसा कानाला बोरू लावून डेस्कामागे बसायचा, तसेच यशवंतही बसले. पोटापाण्याचा तो आजच्यासारखाच तेव्हाही सन्मान्य मार्ग होता. तेव्हा यशवंत तसे राजमार्गीच. त्या राजमार्गावरूनच ते पेन्शनीत गेले. तिथं थोडासा गुंता झाला. उदाहरणार्थ, बडोदा संस्थानचे राजकवी म्हणून त्यांना नेमून दिलेला दरमहा शंभर रुपयांचा तनखा, संस्थानच्या तनखेबंदीच्या धामधुमीत सपशेल बंद पडला. मग केंद्र सरकारातून आणि नंतर राज्य सरकाराकडून काही रक्कम वाङ्मयसेवा करीत करीत म्हातारपण गाठल्याबद्दल मानधनाच्या रूपात सुरू झाली. नंतर यथावकाश संयुक्त महाराष्ट्राचे तोरण लागलं. त्यानंतर कराडच्या करंबेळकर वकिलांनी 'महाराष्ट्र-कवी' हे नवं पद महाराष्ट्र सरकारने सुरू करावं असा विनंती अर्ज त्या वेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांजकडे केला. त्याच्यावर शिक्षण खात्यात टीका–टिपणी करण्याचे हुकूम झाले. कर्मधर्मसंयोगाने ते कागदपत्र अ पासून ज्ञ पर्यंत मी स्वतः हाताळले. कारण मी त्यावेळी सचिवालयातल्या शिक्षण विभागात चाकरमान्या होतो. स्वा. वीर सावरकरांसकट दहा-पंधरा कवींची नावं तेव्हा विचाराधीन होती. पैकी, वीर सावरकरांचं नाव डुबणार हे गृहीतच धरलं होतं. तरीही रेटलं. कुसुमाग्रजांचंही नाव होतं. पण त्या नावाला आजच्यासारखा भाग्यशाली संदर्भ अजून प्राप्त झालेला नव्हता. बाकीचे फुसके भुईनळे होते. निवड यशवंतांची झाली, तीच अपेक्षा

सोळा आणे होती. ती सफल झाली. 'महाराष्ट्र-कवि' ह्या मानाच्या महावस्त्राला मासिक मानधनाचा सोनेरी काठही होता. त्यामुळे कवीच्या मागची अर्थार्जनाची झिगझीगही संपली. निवांतपणे काव्यलेखन करण्याला कविराज मोकळे झाले ह्यातला संतोष मोठा होता.

यशवंतराव सर्वांच्या डोळ्यांसमोर मोठे झाले. आम्ही शाळकरी पोरं होतो तेव्हा त्यांची सणासुदीला झडणारी काव्यगायनं माना उंचावून आम्ही यथेच्छ ऐकली. आम्हाला आणि आमच्या सोबत्यांना त्यातलं काय कळलं नि काय न उमगलं हरि जाणे! पण 'आई', 'पाणपोई', वगैरे कवितांनी आम्ही घायाळ झालो होतो हे सत्य आहे. पुढे मनु पालटला. आमचं बाळपण संपायला आणि वाटवे नावाचा एक तरुण भावगीतवाला पुढे सरसावायला एक गाठ पडली. त्याने आल्या-आल्या सर्व थोराड कवींच्या कविता वाचनावर भल्या मोठ्या फुल्या मारल्या. वाटवे कुठे पोहचले नाहीत? अगदी फुलबाजारापासून हळदीच्या मार्केटयार्डापर्यंत त्यांची पालखी मोटच्या ऐटीत फिरली. 'फांद्यावरी बांधियले मुलींनी हिंदोळे, पंचमीचा सण आला डोळे माझे ओले' हे वाटव्यांचं गाणं भान हरपून गुणगुणत ऐकलं नाही अशी ऐंकही तरुणी तेव्हा अलम् महाराष्ट्रात नव्हती. आणि आखडू वाटव्यांचा पोटभर मत्सर केला नव्हता असा भांग पाडणारा एकही तरुण कुठे आसमंतात आढळला नसता. अहो, आमचं सोडा, वडावरल्या वटवाघुळांनीही त्यांच्या भावगीतगायनाला माना डोलावल्या, असं वाटव्यांचं अमोघ कर्तृत्व! त्याला तोड नाही. जिथे वाटव्यांचा व्याकुळ सूर नवोढा मुली, आणि जिथे उमेदवार मुलींची यप्पी तिथे आम्ही लेंगे घालून 'पासिंग शो' फुंकीत घोळक्यांनी उभे, असा पायंडाच होता ना. ह्या वाटव्यांनी रेकणाऱ्या कवींच्यासाठी महाराष्ट्रात एक मोठा खड्डा खणला. एका बाजूने त्यांनी कविता कमालीची लोकप्रिय केली नि दुसऱ्या बाजूने कवींना त्यांनी गाडून टाकलं. ग्रह फिरले म्हणा, काळ पालटला म्हणा, किंवा रुची बदलली म्हणा, रविकिरणवाल्या कवींच्या सद्दीवर वाटव्यांच्या काळीजकापू गायनाने संक्रांत आणली हे त्रिवार सत्य आहे. त्या गदेखाली यशवंतरावही आले. भली गोष्ट अशी की तरीही यशवंत आपल्या अंगाने कविता लिहीतच राहिले. कवितालेखनातलं सातत्य, होय, हे सातत्यच यशवंतांना आजवर पावत आलं. ज्याचा हात लिहिता, त्याचा झेंडा फडकता, हेच साहित्यातलं सत्य आहे.

सदाशिव पेठ. पेरू गेटाचा परिसर.

यशवंतांचं पुण्यातलं अगदी शांत वस्तीतलं घर. गडबड-गोंधळ काही नाही. सगळी जुनी ब्राह्मणी बाळबोध वस्ती. उन्हं उतरत आहेत. कवींना निवांत आहे. म्हणून गप्पा मारायला मी त्यांच्याकडे आलो आहे.

अनायासे कविवर्यही मोकळे आहेत. समोर एक बैठं कपाट आहे. त्याच्यावर औषधाच्या भरपूर बाटल्या आहेत.

'यशवंतराव, ही इतकी औषधं कुणासाठी?'

'माझीच! लहानपणापासूनच माझी प्रकृती कधीही धड नव्हती. कुठल्या ना कुठल्या व्याधीने माझा पाठपुरावा हा अगदी सतत केलेला आहे. तरुणपणी मला मायग्रेन नावाचं दुखणं जडलं होतं. त्याने खूप छळलं. मायग्रेन म्हणजे डोक्याचा मागचा भाग अकारण दुखू लागतो. नंतर पायदुखी झाली. माझी मांडी फार दुःखे. वर्षन् वर्षं दुखे. आता पावलं दुवळी झाली आहेत. रक्तदाबाचा विकार आहेच. मधुमेहासाठी रोज इंजेक्शन घेतो. त्यामुळे, निरामय आरोग्य कधी माझ्या वाट्याला आलेच नाही. पण ते असो. एकूण सर्व ठीक आहे.'

'तुमच्या कुटुंबात तुमच्या अगोदर कुणी काव्यरचना वगैरे केलेली होती का?'

'छे. आमचा नि कवितेचा संबंध फक्त समर्थ रामदासांपुरताच. आम्ही सातारा जिल्ह्यातल्या चाफळचे. चाफळचं राममंदिर प्रसिद्धच आहे. तिथल्या रामाच्या मूर्ती खुद्द रामदासस्वामींनीच बसविल्या आणि मंदिराच्या आवारातच आपला मठ मांडला. अशा त्या चाफळचा मी. माझे वडील प्राथमिक शिक्षक होते. त्यांची नोकरी बदलीची होती. घरी 'मनोरंजन' यायचे. बाकी कवितेचा नि आमचा संबंध काहीही नाही. कविता कशी असते, कशी करतात, केशवसुत कोण, वगैरे काहीही मला माहीत नव्हतं. लहानपणी मी कधी चार ओळीही लिहिलेल्या नाहीत. आमच्या घराण्यातही कुणी लिहिलेल्या ऐकीवात नाही.'

'तुमच्यावर पहिले-वहिले वाङ्मयीन संस्कार कुणाचे आहेत?'

'कवी साधुदासांचे. चाफळला माझं प्राथमिक शिक्षण झालं. मग इंग्रजी शिकायला मी प्रथम कराडला नि नंतर चौदा साली सांगलीला गेलो. खांडेकरही सांगलीचेच. पण मला वाटतं मी सांगलीला जाण्याच्या अगोदरच ते तिथून बाहेर पडले होते. आमची गाठभेट त्यावेळी झालेली नाही. सांगली हायस्कूलात गोपाळ गोविंद मुजुमदार नावाचे तरबेज शिक्षक होते. ते 'साधुदास' ह्या टोपण नावाने कविता लिहीत. त्यांनी रामायणावर खंडकाव्य लिहिलं आहे. 'रणविहार', 'वनविहार', 'गृहविहार' आणि 'निर्माल्य'—भाग एक आणि दोन, अशी त्यांची कविता प्रसिद्ध आहे त्यांनी मला काव्याची गोडी लावली. 'नवनीत' वाचायला लावलं. मात्र तत्कालीन कविता मी अजिबात वाचलेली नव्हती. गोविंदाग्रज वगैरे कवी माहीत नव्हते शालेय जीवनात कवितालेखन केलेलं आठवत नाही.

'सांगलीतून तुम्ही बाहेर केव्हा पडलात?'

'मी मॅट्रिक झालेला नाही. त्यावेळी शिक्षणखात्याची मॅट्रीकच्याच तोडीची युनिव्हर्सीटी स्कूल फायनल परीक्षा असे. ती परीक्षा मी सांगलीला उत्तीर्ण झालो आणि नोकरीला म्हणून पुण्याला आलो. शिक्षणखात्याकडे अर्ज टाकला. त्यात यश आलं आणि माझी पहिली नेमणूक अलिबागला डेप्यूटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या ऑफिसात क्लार्क म्हणून झाली. १९२० साली मी एक वर्ष अलिबागला काम केलं. पण मला तिथे मलेरियाने छळलं. अलिबागचा समुद्रकिनारा फार सुंदर आहे. पण मी तिथेही एखादीच कविता केली असेल नसेल. एक-दोन केल्या त्या 'यशवंती'मध्ये संग्रहीत केल्या. मी बदली मागितली. त्यात यश आलं आणि १९२१ साली माझी बदली क्लार्क म्हणून पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजात झाली. तेव्हापासून आजपर्यंत म्हणजे अर्धशतकावर काळ मी पुण्यातच आहे. पुण्यात आल्यावर मात्र मी कविता लेखन सातत्याने करू लागलो.'

'तुमच्या पहिल्या कवितालेखनाबद्दल थोडी कल्पना द्या.'

'पुण्यात १९२१ साली आलो खरा. पण

त्याच्या अगोदर १९१९साली 'मित्रप्रेमरहस्य' ही माझी कवितेची पुस्तिका प्रसिद्ध झाली होती. चाफळचे स्वामी वारले. त्यांच्यावर ती लिहिली आणि त्यांच्या वर्षश्राद्धाला त्या मंडळींनीच ती प्रसिद्ध केली. ती कविता मी कशी केली देव जाणे. कारण काव्यरचनेचं काही शास्त्र असतं हे मला माहीतच नव्हतं. नंतर अलिबागला एक-दोन कविता केल्या. नंतर 'काळाचा घाला' ही कविता 'विविध ज्ञान विस्तारा'त १९२० साली लिहिली. हरिभाऊ आपटे, गडकरी, हरिभाऊ लिमये वगैरे कर्ती मंडळी कालवश झाली, त्याला उद्देशून ती कविता होती. 'विस्तारा'तली ती कविता अनेकांच्या वाचनात आली. त्यावेळी गजाननराव माडखोलकर 'नवयुग' या मासिकाच्या संपादनाची बाजू बघत. तिथे माझी 'शारदावंदन' ही कविता आली. तीही अनेकांनी वाचली. ह्या ठळक अशा वाङ्मयीन नियतकालीकांतून मी कविता प्रसिद्ध करू लागल्यामुळे माझं नाव रसिकांसमोर आलं. कवी अनंततनय, म्हणजेच दत्तात्रय अनंत आपटे, हे त्या काळचं एक मोठं प्रस्थ होतं. ते, श्री. नि. चाफेकर वगैरे मंडळी त्यावेळी पुण्यात 'शारदा मंदिर' नावाची वाङ्मयीन संस्था चालवीत असत. अनंततनय माझा पत्ता मिळवून मला हुडकीत आले. आमचा परिचय झाला. त्यांच्या विनंतीवरून त्यांच्या 'शारदा मंदिरा'ची कचेरी माझ्या बिऱ्हाडी आली. सदाशिव पेठेत भोपटकरांच्या वाड्याजवळ राम मंदिर आहे. तिथल्याच जवळच्या माडीवर एका भागात 'शारदा मंदिर' नि एका भागात माझी वसती, असा प्रकार होता. पुढे माडखोलकर तिथे आले. ह्या 'शारदा मंदिरा'मुळे साहित्यसेवकांशी ओळखी वाढत गेल्या. मी लिहीत गेलो.'

'तुमचं पहिलं जाहीर कविता वाचन कुठे झालं?'

'अगदी काटेकोरपणे सांगायचं तर कोल्हापूरला जोशी नावाचे कुणी जे. पी. गृहस्थ होते. मला वाटतं, ते 'विस्तारा'त लिहायचे. त्यांनी 'भारत कवी संमेलन' नावाचं एक पहिलं कविसंमेलन कोल्हापूरला बोलावलं १९२१ साली. कोल्हापूरच्या बाहेरचे असे फक्त मी आणि कवी काव्यविहारी असे दोघेजण होतो. बाकी सगळे स्थानिक कवीच होते. ते कदाचित पहिलं जाहीर वाचन असेल. पण सर्व दृष्टीने ठळक असं पहिलं वाचन बडोद्याच्या साहित्य संमेलनात १९२१ साली झालं. तात्यासाहेब केळकर त्याचे अध्यक्ष होते. मी बडोद्याला जाणारच नव्हतो. परंतु सगळेजण गेल्यानंतर मी पैसे उसने काढून मागाहून एकटाच गेलो. तिथे मी 'देहाचा पूल' ही कविता म्हटली. रसिकांनी तिची खूपच वाखाणणी केली. आम्हाला राजवाड्यावरून खास बोलावणं आलं. मला वाटतं, दत्तोपंत पोतदार, कवी सुमंत म्हणजे मुरतुले, आनंदराव टेकाडे, मी, अशी निवडक मंडळी होतो. राजघराण्यातल्या मंडळींसमोर आम्ही आमचे विचार, कविता, वगैरे ऐकवाव्यात असा एकूण प्रस्ताव होता. दत्तोपंत रामदासांबद्दल बोलल्याचं आठवतं. मी कविता गाऊन दाखवल्या. आम्हाला प्रत्येकी पाऊणशे रुपये बिदागी मिळाली असावी. बडोद्यात लौकीक झाल्यावर मग मायदेवांनी हिंगणघाला बोलावलं. त्याचवेळी माझा 'यशवंती' हा पहिला कविता संग्रह मी प्रसिद्ध केला होता. दोन-तीनशे रुपये खर्च झाला. पण प्रसिद्धी चांगली लाभली. तेव्हापासून मी काव्यगायनाचा परिपाठ ठवला. हे सगळं कवितेच्या प्रेमापोटीच झालं. द्रव्यलाभ होत नसे. फक्त भाडेखर्चापोटी मी काव्यवाचन करायचा. कविता वाचनाची म्हणून वेगळी बिदागी नसे. मात्र नाव होत गेलं. यश लाभत गेलं.'

'रविकिरण मंडळाबद्दल थोडी माहिती सांगा.'

'अनंततनय, श्री. नि. चाफेकर, कवी अज्ञातवासी वगैरे मंडळींनी शारदा मंदिर नावाची वाङ्मयीन संस्था चालवली होती हे सांगितलंच. ही मंडळी निःस्सीम साहित्यभक्त होती, पण जुन्या मताची होती. ह्यातून नव्या मतांच्या तरुण मंडळींना नवा फाटा निघाला. तेच रविकिरण मंडळ. रविकिरण मंडळ हा शारदा मंदिराचाच एक कोंब आहे. त्यावेळी श्री. बा. रानडे आणि कवी गिरिश हे दोघे कुटुंबवत्सल कवी पुण्यात रहात. ते नवमतवादी होते आणि त्यांची काव्यरचना नव्या धाटणीची होती. आम्ही नव्या मताची तरुण कविमंडळी रानड्यांकडे आणि गिरिशांकडे उठबस करू लागलो. आमच्यात माधवराव पटवर्धनही होते. द. ल. गोखले होते. नाटचछटाकार दिवाकरही होते. माडखोलकरही होते. सुरुवातीला आमचा कौटुंबिक पातळीवर Sunday Tea Club होता. त्यातला Sun उरला. त्यातून रविकिरण मंडळ जन्मलं १९२३ साली. रानडे हे त्याचे शिल्पकार. मी त्यांना गुरू मानतो. गिरीश यजमान. पुढे अनंततनयांनी कठोर टीका केली म्हणून दिवाकर दूर झाले. त्यांच्या जागी विठ्ठलराव घाटे आले. असं हे आमचं रविकिरण मंडळ. आता त्यातलं कोण उरलंय? वृद्ध झालेले रानडे नातीकडे नागपूरला आहेत. माडखोलकरही नागपूरलाच. गिरीश, मनोरमाबाई रानडे आणि माधवराव गेले. घाटे इथे पुण्यालाच वृद्धापकाळ कंठीत आहेत. द. ल. गोखले कल्याणला त्यांच्या चिरंजीवांकडे असतात. मी हा असा. आमच्या मंडळाची घटना, अध्यक्ष वगैरे भानगडी केव्हाच नव्हत्या. पण आम्ही आतून एकमेकांना बांधलेले होतो. इच्छा एकच होती की, आम्ही प्रत्येकाने आपापल्या प्रकाशनावर 'रविकिरण मंडळा'चे प्रकाशन असे छापावे. पण फक्त मीच तेवढा तसं कटाक्षाने करीत आलो. रानड्यांनी फारसं लिहिलंच नाही. मात्र त्यांच्या नातीचा बालगीतांचा संग्रह प्रसिद्ध झाला, त्यांच्यावरही त्यांनी 'रविकिरण मंडळा'चे प्रकाशन असा उल्लेख केला आहे! आमची वाङ्मयसेवा तुमच्यासमोर आहेच. आम्ही मंडळींनी काव्यगायनं मात्र धूमधडाक्याने केली. विशेषतः मी केली. आम्हाला फक्त प्रवासखर्च मिळे. पण आम्ही अडून बसलो नाही. गेलो. त्यामुळे नव्या कवितेचा लोकांना लळा लागला.'

'तुम्ही बडोद्याचे राजकवी कसे काय झालात?'

'बडोद्याचे पहिले राजकवी चंद्रशेखर. ते वारल्यानंतर ते पद रिकामंच होतं. त्यानंतर बडोद्याचे राजपुत्र प्रतापसिंह यांचा राज्यारोहण सोहोळा झाला. ही चाळीस सालची गोष्ट आहे. त्याच वेळी माझी प्रकृती ढासळली होती आणि मी शिक्षणखात्यातून invalid निवृत्ती स्वीकारली होती, कारण कचेरीचं काम करणं मला अशक्यप्राय झालं होतं. ह्याच वेळी बडोद्यातले लेखक त्रि. पां. दांडेकर ह्यांचं मला खाजगी पत्र आलं की, प्रतापसिंहांच्या आठ दिवस चाललेल्या राज्यारोहण समारंभाचं वाङ्मयीन स्मारक

करण्याचं राजघराण्यातल्या मंडळींच्या मनात आहे तेव्हा तुम्ही त्याबद्दल खंडकाव्य लिहा. मी म्हटलं, हे कसं शक्य आहे ? कारण मी तर तो सोहाळा पाहिलेलाच नव्हता. त्यावर ते म्हणाले की, बडोदेकरांनी त्या सोहाळ्यावर एक चित्रपट घेतला आहे तो तुम्ही पहा नि लिहा. मी फिल्म पाहिली. वीस पंचवीस हजार फूट फिल्म आहे ती. तरी नेमकं काय लिहावं ते मला सुचेना. वेळ वाया जाऊ लागला. मग त्यांनी गुजराती कवींनी त्या समारंभावर लिहिलेल्या कविता माझ्याकडे नमुना म्हणून पाठवल्या. त्या कुचकामी होत्या. कविता नव्हत्याच. नुसती शब्दजुळणी होती. त्यातून प्रेरणा मिळेना. शेवटी एकदा कृष्णा नदी ओलांडीत असताना अचानक ओळी मनात जमू लागल्या. बडोद्याची विश्वामित्री नदी कृष्णेला सोहाळ्याला येण्याचं आमंत्रण करते आहे असा प्रसंग सुचला. मग मात्र मी भराभर रचना करीत गेलो. कुठेही आडलो नाही. मग महाराजांना सलग दोन हजार ओळी वाचून दाखवल्या. त्या त्यांनी तल्लीनतेने ऐकल्या. 'काव्य-किरिट' हेच ते पुस्तक. पुढे मला महाराजांच्या हुजूर ऑफीसचं पत्र आलं आणि 'राजकवी' ह्या पदावर माझी मासिक पन्नास रुपयांवर नेमणूक झाली असल्याचं कळवलं. पुढे पन्नासाचे शंभर झाले. अटी मात्र काहीही नव्हत्या. भाटगिरी करावी अशीही अपेक्षा नव्हती. म्हणून मी ते पद स्वीकारलं. पुढे संस्थानं आणि त्यांचे तनखे खालसा झाले. त्यात माझं राजकवीपद आणि माझा शंभर रुपयांचा तनखाही निकालात निघाला !'

'तुम्ही गद्य लेखन किती करता ?'

'जमेल तसं करीतच असतो. माझ्या वडिलांवर मी 'हापीसर' नावाचं पुस्तक बासष्ट साली लिहिलं आहे. तुम्ही ते जरूर वाचा. समर्थ रामदासांवरही माझा ग्रंथ आहे. स्टीफन झ्वाईगच्या 'फेलींग हार्ट' ह्या कादंबरीकेचा अनुवाद 'घायाळ' म्हणून केलेला आहे. तो देशमुखांनी प्रसिद्ध केला. झ्वाईग हा फारच मोठा लेखक आहे. मला वाचनाचा आणि चिंतनाचा ध्यास आहे. त्यातूनही काही लेखन झालं आहे. 'वनवास' हे अमेरिकन कादंबरीचं रूपांतर मीच केलंय. 'प्रापंचीक पत्रे', 'कातणीचे घर' वगैरे पुस्तके आहेत. बालवाङ्मयाची पाचसहा पुस्तकंही मी लिहिली आहेत. शिवाय प्रसंगोपात्त दिवाळी अंकातून वगैरे गद्य लेखन बरंच केलं आहे.'

'तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांवर महाकाव्य लिहिलंत. त्याचा काय काय परिणाम झाला ?'

'माझी एक खंत आहे की माझ्या त्या काव्याकडे रसिकांनी आणि विद्वान टीकाकारांनी दुर्लक्ष केलं. त्या काव्यग्रंथाची निष्कारण उपेक्षा झाली. तो निव्वळ इतिहास नाही. मी त्यात खूप काही नव्याने निर्माण केलंय. पण लोक वाचतील तर ना !'

'सध्या तुमचं कसं काय चाललंय ?'

'एक नादुरुस्त प्रकृती सोडली, तर सर्व समाधान आहे. कीर्ती भरपूर मिळाली. 'महाराष्ट्र-कवी' तर आहेच. पद्मभूषणही आहे. मला तीन मुलगे नि दोन मुली. सर्व स्थिरस्थावर आहे. थोरला मुलगा अमेरिकेहून शिकून आला आहे. तो गणकयंत्रांचा तज्ज्ञ आहे. मुंबईत असतो. दुसरा वास्तुरचनाशास्त्रज्ञ आहे. तो इथेच असतो. तिसराही इथेच असतो. तो यंत्रविशारद आहे. दोन्ही मुलींचे संसार मुंबईला सुखात चालले आहेत. म्हणजे सर्व काही ठीक आहे.'

'आता तुम्ही पाऊणशे वर्षांचे झालांत. आता संकल्प काय आहेत ? आत्मचरित्र लिहिणार काय ?'

'माझ्यापाशी अनेक वर्षांच्या डायऱ्या आहेत. त्यात नोंदी आहेत. पण आत्मचरित्र लिहिण्याची प्रेरणा होत नाही. मात्र 'मराठ्यांचे महाभारत' हे महाकाव्य लिहिण्याची गेली कित्येक वर्षे उमेद आहे. मुळात ऐतिहासिक कवितेवर माझा जीव आहेच. आता ह्या महाकाव्यात मालोजीरावापासून तो थेट झाशीच्या राणीपर्यंतचा अडीचशे तीनशे वर्षांचा कालखंड यायचा आहे. छत्रपतींबद्दल प्रसिद्ध झालेला 'शिवराज' हा ग्रंथ ह्याच संकल्पित महाकाव्याचा एक सर्ग होता. सध्या झाशीच्या राणीच्या पराक्रमावर तीन-चारशे कडवी लिहून तयार आहेत. पण ठिणगी पडल्याशिवाय काव्यलेखन होत नाही. टिपणं काढीत असतो. पण सध्या न्यूराईटीस पेनने मी बेचैन आहे. माझ्या पायांची आग होत असते. चालवत नाही. लोक मोठ्या प्रेमाने दूर दूर बोलावतात. पण मी हा असा दुखणाईत. कसं जायचं एकट्याने ? असा प्रकार आहे.'

खरंच, प्रकार हा असा आहे. कलावंत कवीचं पिकलं पान झालं तरी त्याच्या धमणीत फेसाळणारं चैतन्यतत्त्व रतिमात्र आटत नाही, ह्याचं कवी यशवंत हे हाताजवळचं उदाहरण आहे. रसिकांनी आणि ज्यांच्या बाबतीत वार्धक्य अपवाद करणार नाही अशा लेखक मंडळींनी त्यांची आस्थापूर्वक चौकशी केली पाहिजे. एके काळी त्यांनी लोकांना झुलवलं आहे, हे कसं विसरायचं ?

कविला विसरायचं नसतं. कविता विसरताही येत नाही. म्हणून पुन्हा एकदा थोर कवीच्या ओंजळीत मनोमन संतोषाची ही दोन फुलं.

□ □


महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिक मिळवणारे
आमचे एक विशेष प्रकाशन

डॉ. सुधीर फडके

**कोठे आणि कधीतरी**

किमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

# तेलसमस्या आणि भारतीय अर्थकारण

डॉ. प्रभाकर जोशी

## तेलमहात्म्य : एक चित्र

दैवाने खैरात केली. मध्यपूर्वेत भरपूर तेलसाठे उपलब्ध करून दिले. गेली तीस वर्षे तेलाने हात दिला. आणखी तीस वर्षे तरी ददात नाही. तेल नसते तर काय दैना होती ! आर्थिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, भक्कम पायावर उभे रहाता येईल असे मध्यपूर्वेतील अरब राष्ट्रांपाशी काहीच नाही. बराचसा प्रदेश वाळवंटाने व्यापलेला म्हणजेच शेतीला निरुपयोगी. शेतीला पाणीपुरवठाही बेताचाच पडतो म्हणता येईल इतकाच पाच–दहा इंच पाऊस. उद्योगवाढीस लागणारी उद्योगशीलताही या लोकांपाशी नाही. तेल हेच एकमेव उपजीविकेचे साधन.

१९३० च्या सुमारास मध्यपूर्वेत तेलाचा शोध लागला. १९४० च्या सुमारास तेलउत्पादनाचा व्यवसाय सुरू झाला. फारसे परिश्रम न करता, गेल्या तीस वर्षांच्या काळात अरब राष्ट्रांची भरभराट झाली. गंमत अशी की, तेलउत्पादनाकरिता लागणारी यंत्रसामग्री, भांडवल व तंत्रज्ञ सर्व काही परकीय. बहुतेक तेलाची निर्यात होते. आणि अगदी माफक किंमत मिळाली तरी भरपूर पैसा हाती येतो. दरडोई उत्पन्न पाहिल्यास, कुवेतचा सर्व जगात पहिला क्रमांक लागतो. तेथील दरडोई उत्पन्नाचे प्रमाण सुमारे ४००० डॉलर्स म्हणजे अंदाजे रुपये ३०,०००. भारतात हेच प्रमाण जेमतेम ६०० रुपये एवढे आहे. खास नमूद करण्याजोगा तपशील म्हणजे अमेरिका, जर्मनी, जपान इत्यादी उद्योगशील व संपन्न देशांच्याही वर कुवेतचा क्रमांक लागतो.

या अरब मंडळींना स्वतःलाही पूर्ण कल्पना नसेल इतके तेल हे जबरदस्त वरदान ठरले आहे. विशेष करून, १९७३ च्या दुसऱ्या सहामाहीपासून. कदाचित हे अरब लोक इस्रायलला मनातल्या मनात दुवाही देत असतील. तेल हे संपत्तीचे साधनच काय, ते राजकीय शस्त्र म्हणूनही वापरता येते, हा ताजा इतिहास. अरबांनी यापूर्वीच हे शस्त्र का वापरले नसावे ? हे शस्त्र इतके प्रभावी ठरले की, पश्चिम युरोपिय राष्ट्रे व जपान यांसारख्या मातब्बर देशांनी अरबांना आपला निःसंदिग्ध राजकीय पाठिंबा जाहीर केला. इतकेच काय, इस्रायलबरोबरचे राजकीय संबंध जपान तोडणार की काय अशी भाषा बोलली जाऊ लागली आणि खुद्द अमेरिकेनेही नमते घेतले असे म्हणण्यास वाव आहे.

तेलकंपन्या परकीयांकडून आपल्या ताब्यात कशा येतील ही अरब राष्ट्रांची कालपरवापर्यंतची विवंचना होती. चुटकीसरशी ही परिस्थिती पालटली आणि राजकीयच काय, आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आर्थिक नाड्या त्यांच्या ताब्यात आल्या. तेलाची किंमत वाढल्याने तेलउत्पन्नात अमाप वाढ झाली. एक अदमास असा की, प्रतिवर्षी सुमारे ६५०० कोटी डॉलर्स जास्त उत्पन्न मिळू लागेल. ( हे उत्पन्न भारताच्या पाचव्या आकांक्षी योजनेच्या आकाराएवढे–म्हणजे सुमारे ५०,००० कोटी रुपये–आहे.) दैवी न्याय असा की, एवढ्या संपत्तीचे करायचे काय असा यक्षप्रश्न अरबांपुढे उभा राहिला आहे. भारतासारख्या अप्रगत राष्ट्राचेच काय, जपान, जर्मनी, फ्रान्स यांसारखी अतिप्रगत राष्ट्रेदेखील व्यापारातील तूट भरून काढण्याकरिता या अरब मंडळींकडून किती पैसे कर्जाऊ मिळतील याचा अंदाज बांधीत आहेत.

## तेलमहात्म्य : दुसरे चित्र

या पार्श्वभूमीवर आपण भारताचा विचार करू या. इतर अनेक बाबींप्रमाणेच याही बाबतीत आपण दुर्दैवी आहोत. आपली आर्थिक यंत्रणा तशी बेताचीच व मागास. इतरांशी तुलना करता, आपण अगदी थोडेसेच म्हणजे प्रतिवर्षी २४० लाख टन तेल वापरतो. जगातील वापर प्रतिवर्षी सुमारे २६,००० लाख टन. म्हणजे आपला वापर १ टक्क्याहूनही कमी आणि निसर्गाने आपणास एवढेही तेल देऊ नये ! या २४० लाख टनांपैकी जेमतेम ७५ लाख टन एवढेच आपले स्थानिक उत्पादन. बाकी १६५ लाख टन आयात करावे लागते.

तेल आयात करण्याकरिता पैशाची तशी फारशी अडचण इतके दिवस भासत नव्हती. वर्षाकाठी सुमारे २०० कोटी रुपये खर्च केले की, आयात शक्य होई. पण यापुढे मात्र तेलाची किंमत वाढल्याने (एका बॅरलला तीस रुपयांपासून ऐंशी रुपयांपर्यंत) मोठी पंचाईत होऊन बसली आहे. या किंमतीला १६५ लाख टन तेल खरेदी करायचे झाल्यास सरकारी अंदाजानुसार दरवर्षी १२०० कोटी

रुपयांपेक्षा जास्त खर्च येईल. आपली एकूण निर्यात १८०० कोटी रुपयांची. आयातीचा प्रपंच या १८०० कोटी रुपयातच बेतला पाहिजे आणि तेलावरच १२०० कोटी रुपये खर्च केले तर इतर आयात कशी शक्य होणार? त्यात कपात करूनही चालण्यासारखे नाही.

बरे, निर्यात वाढवावी असे म्हटले तरी परिस्थिती बेताबाताचीच. निर्यातीकरिता पहिली बाब म्हणजे आपल्या गरजांपेक्षा अधिक उत्पादन करणे. ते आपण साधू शकत नाही. कारण वाढत्या लोकसंख्येचा दैनंदिन निर्वाह कसा करायचा याच पेचातून आपण आजपावेतो बाहेर पडलेलो नाही. जरी काटकसर करायचे म्हटले तरी त्याने सगळा प्रश्न सुटत नाही. कारण आपल्या मालाला परकीय बाजारपेठेत फारसा उठाव नाही. मालाचा दर्जा कमी व किंमत जास्त म्हणून इतर राष्ट्रांबरोबर आपण स्पर्धा करू शकत नाही.

याबाबतीत आपले परराष्ट्रीय धोरणही आपल्या सहाय्यास फारसे आलेले नाही. गेली २५ वर्षे भारत सरकारने सतत अरबांना आपला निःसंदिग्ध पाठिंबा दिला आहे. एवढेच काय, इस्रायल राष्ट्रनिर्मितीलाही आपण आक्षेप घेतला होता. परवाच्या युद्धात तर, युद्धाच्या दुसऱ्या दिवशीच भारतीय प्रवक्त्याने एक दणदणीत पत्रक काढून अरबांची भूमिका न्याय्य आहे असे प्रतिपादन केले. आंतरराष्ट्रीय व्यवहारात पाठिंबा देताना मोबदल्यात काही तरी पदरात पाडून घेण्याची प्रथा आढळते. तेही आपण केले नाही. याचे फलित म्हणजे तेलकिंमतीत सूट सोडाच, पण तेलकपातीतूनही अरबांनी आपणास वगळले नाही. नंतर मग मिनतवारीने तेलकपात भारतास लागू नाही, असे आश्वासन मिळाले आणि त्याच वेळेला तेल लिलाव पद्धतीने विकावयाची अरबांनी टूम काढली. या लिलावात आपणच लिलावात निघण्याची शक्यता निर्माण होऊन बसली आहे.

परराष्ट्रीय धोरणाची ही गत तर आर्थिक धोरणांची त्याहूनही अजब. महत्त्वाच्या प्रश्नांवर त्वरीत निर्णय घ्यावयाचे, तावडतोबीच्या व दीर्घकालीन उपाययोजना आखावयाच्या आणि त्यांची काटेकोर अंमलबजावणी करावयाची इत्यादी मूलभूत बाबींकडे काणाडोळा करून दुय्यम प्रश्नावर लक्ष केंद्रीत करावयाचे हा आजवरचा अनुभव. आजतागायत भारत सरकारने सुसंगत असे तेल धोरण आखलेले नाही. अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्राला तेल टंचाईची झळ पोचलेली नाही. कारण केवळ १० टक्के तेल ते अरबांकडून घेतात. तरीपण अमेरिकेच्या राष्ट्रपतींनी राष्ट्रास उद्देशून भाषण करून अमलात आणावयाच्या उपाययोजनांची माहिती दिली. बारीकसारीक सूचना केल्या व युद्धपातळीवर विचार करून हा प्रश्न निकालात काढला. दिल्ली मात्र अजून शांत आहे. दूरवरचे उपाय बाजूलाच राहिले. सरकारी क्षेत्रात होणाऱ्या पेट्रोलच्या वापरावरही नियंत्रण घातलेले नाही, साधे नियम नाहीत, दंडक नाहीत.

या सर्व शिथिलतेचा परिणाम आपणास भोगावा लागत आहे. पाचवी पंचवार्षिक योजना लांबणीवर टाकली गेली आहे. तेलाअभावी अनेक कारखाने बंद पडले आहेत. काही बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. मोटार-उद्योगावर अतिशय अनिष्ट परिणाम होतो आहे. स्वतःचे उत्पादन, वीज-निर्मिती, सामान्य माणसास अतिशय निकडीच्या अशा इंधनाचे-केरोसिनचे उत्पादन सर्व काही घटले आहे. खत उत्पादनातील कपातीचा शेतीवर झालेला अनिष्ट परिणाम आपणास दिसतो आहे. या रब्बी हंगामातील धान्योत्पादनातील तूट बव्हंशी खत पुरवठा कमी पडल्यामुळे झाली, हे आपण जाणतोच. आपल्या एकूण भवितव्याविषयीच आपण आज साशंक झालो आहोत.

## भारतीय तेल उद्योग

या संदर्भात भारतीय, तसेच जागतिक तेलव्यवसायाचा थोडा विचार प्रस्तुत ठरेल. १९७२ साली जगातील एकूण तेलउत्पादन २६००० लाख टन झाले. हे वर आलेच. यापैकी जवळजवळ ३५ टक्के उत्पादन (९००० लाख टन) मध्यपूर्वेत होते. अमेरिका (५३०० लाख टन), कॅनडा (९०० लाख टन), पूर्व युरोप व चीन (४४५० लाख टन: पैकी रशिया ३९५० लाख टन), आफ्रिका (२७३० लाख टन) या विभागाचे त्याखालोखाल क्रमांक लागतात. त्यामानाने अतिपूर्वेकडील देश (९२० लाख टन: पैकी भारत– ७५ लाख टन, जपान– ५ लाख टन...) व पश्चिम युरोप (१६० लाख टन) या विभागातील उत्पादन नगण्य म्हणावे लागेल. या आकडेवारीवरून हे सहज ध्यानात येईल की रशिया, अमेरिका ही राष्ट्रे तेलाबाबत बरीचशी स्वयंपूर्ण आहेत, तर जपान व पश्चिम युरोपीय राष्ट्रे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर मध्यपूर्वेवर अवलंबून आहेत.

भारतीय तेलव्यवसायाचा तपशीलवार विचार केल्यास आपल्या असे दृष्टोत्पत्तीस येते की तेलउत्पादन प्रामुख्याने गेल्या दहा वर्षांत वाढले आहे. १९६०–६१ च्या सुमारास क्रूड तेलाचे उत्पादन जेमतेम ५ लाख टन होई व आयातीवर ८० ते ९० कोटी रुपये खर्च होत. दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनांच्या काळात भारत सरकारने तेल संशोधन, तेल-विहिरी खोदणे इ. कार्यक्रम हाती घेऊन धडाक्याने पार पाडले. त्याचे फलित आसाम व गुजराथ या राज्यांत दिसून येते. गौहत्ती, बरौनी, हल्दिया, व जवाहरनगर इत्यादी ठिकाणी तेल-शुद्धीकरण कारखाने सुरू झाले आहेत. अगदी अलीकडेच मुंबई व आसाम येथे तेल शोधाच्या प्रयत्नास यश लाभले आहे. तेथेही लवकरच तेलउत्पादन सुरू होईल अशी आशा बाळगायला हरकत नाही. गेल्या १०–१२ वर्षांतील या विकासामुळे तेलउत्पादनात आपण बरीच मजल मारली. आजमितीस आपण ७५ लाख टन एवढे क्रूड तेलाचे उत्पादन करू शकतो. असे असले तरी, औद्योगीकरणामुळे तेलाची मागणीही गेल्या काही वर्षांत वाढत गेली व परिणामतः तेलाची आयातही वाढली. १९७२ साली तेल आयातीवर भारताने २०० कोटी रुपये खर्च केले.

क्रूड तेलाच्या शुद्धीकरणापासून अनेक पेट्रोलियम पदार्थ आज भारतात बनविले जातात. १९७२ साली झालेले उत्पादन खालीलप्रमाणे आहे.

| पदार्थ | लाख टन |
|---|---|
| पेट्रोल व नापता | २९ |
| केरोसीन | २८ |
| डिझेल तेल (हाय स्पीड) | ४६ |
| डिझेल तेल (लाइट) | १० |
| इंधन तेल | ३७ |
| इतर पदार्थ | ३२ |
| एकूण | १८२ |

पुष्ठ ३२ वर



# डॉ. आंबेडकर व रिपब्लिकन पक्ष

## भ्रमावर आधारलेल्या चळवळी फार काळ टिकत नसतात

प्रा. रावसाहेब कसबे, संगमनेर महाविद्यालय

रिपब्लिकन पक्ष हा भारतीय पातळीवरील काँग्रेस, जनसंघ, स्वतंत्र किंवा कम्युनिस्ट पक्षासारखा विपुल अनुयायी असणारा राजकीय पक्ष नाही. त्याची दखल भारतीय राजकारणात घेतली नाही तरी कुणाचा तोटा होईल अशी परिस्थिती राहिली नाही. रिपब्लिकन पक्षाच्या निवडणूक करारांना सत्तेच्या दृष्टीने फारसे महत्त्व नाही हे आतापर्यंत झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांवरून काँग्रेस, समाजवादी व कम्युनिस्ट इत्यादी प्रमुख पक्षांच्या ध्यानात आले आहे. रिपब्लिकन पक्ष संघटितपणे महाराष्ट्राच्या राजकारणात पुनरागमन करीत आहे म्हणून त्याची दखल घ्यावी असेही नाही. परंतु या पक्षाचा जन्म बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात झालेला असला तरी तो आंबेडकरी चळवळीचा एक भाग आहे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय अस्पृश्यांच्या मुक्तीच्या संग्रामातील एकमेव सेनानी आहेत. भारतात अस्पृश्यांची संख्या आठ कोटींच्या जवळपास आहे. या अस्पृश्यांचे काही समान-सामाजिक प्रश्न आहेत आणि स्वातंत्र्योत्तर काळातील सत्तेच्या राजकारणाची प्रेरणा जातीय जाणिवेत असल्यामुळे व भारतीय ‘अस्पृश्यतेचा प्रश्न’ हा ‘राष्ट्रीय प्रश्न’ आहे अशी अस्पृश्यांची व निवडक अस्पृश्येतरांची धारणा असल्यामुळे आणि रिपब्लिकन पक्ष वेळोवेळी आपले भारतीय अस्पृश्यांशी व नवबौद्धांशी नाते सांगत असल्यामुळे एका वेगळ्या संदर्भात या पक्षाची दखल घेणे आवश्यक वाटते.

बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ ही मानवी मुक्तीच्या चळवळीचा एक महत्त्वपूर्ण भाग होता. या चळवळीत बाबासाहेबांच्या पाठीमागे सामाजिक पिळवणुकीने ग्रासलेली जनता खंबीरपणे उभी होती. परंतु ती अल्पसंख्य होती. फक्त सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या जमातीच बाबासाहेबांच्या पाठीमागे उभ्या होत्या. तरीही निवडणुकांच्या राजकारणात जातीयवादी राजकारणाला आंबेडकरांचा सुरुवातीच्या काळात स्पष्ट विरोध होता. ‘अस्पृश्यता निवारण्याच्या बाबतीत अस्पृश्य श्रमजीवी जनतेचे हितसंबंध स्पृश्य श्रमजीवी जनतेच्या हितसंबंधाहून वेगळे किंवा परस्पर विरोधी आहेत.’ याबद्दल कुणाचेही मतभेद असण्याचे कारण नाही. १९२७ च्या महाडच्या चवदार सत्याग्रहापासून आंबेडकराचे सामाजिक जीवन सुरू झाले. ते १९३७ सालच्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीपर्यंत. त्या दृष्टीने त्यांनी बहिष्कृत हितकारीणी सभेमार्फत प्रयत्न केले. परंतु जेव्हा निवडणुकांचे राजकारण समोर ठाकले तेव्हा आंबेडकरांनी आपल्या धोरणात बदल केला आणि ‘श्रमजीविकांचा आपला लढा यशस्वी रीतीने लढावयाचा असेल तर जात, पात, धर्म, देश इत्यादी भेद मनात न आणता मजूर तेवढे सारे एक ही वर्गभावना मनात ठसवून घेऊन त्यांनी आपली अभेद्य संघटना केली पाहिजे.’ (जनता २२-८-३६) ही मार्क्सवादी व्यापक भूमिका आंबेडकरांनी स्वीकारली व स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना १९३७

साली केली. त्यानंतर आंबेडकर थोड्याच दिवसांनी व्हाइसरॉयच्या सल्लागार मंडळात गेले. आणि स्वतंत्र मजूर पक्ष संपला. मार्क्सवादी विचारांच्या पोषणासाठी ही भूमी योग्य नाही, इथे आर्थिक दृष्टीने पिळले गेलेले सर्व जनसमूह वर्गीय पातळीवर येणे अवश्य आहे, याची स्पष्ट जाणीव आंबेडकरांना झाली. म्हणून आपल्या चळवळीसाठी १९३६ साली घेतलेली व्यापक भूमिका सोडून त्यांना १९४२ साली नागपूरला दलित फेडरेशनची स्थापना करून जातीयवादी भूमिकेचा आश्रय घ्यावा लागला. ही भूमिका त्यांनी स्वीकारली असली तरी एका अर्थाने त्यांनी दलितांच्या इच्छित ध्येयासाठी रिस्थितीशी ती केलेली तडजोड होती. आपल्या कोणत्याही चळवळीचा पाया जातीय असू नये ही त्यांची मनीषा होती. आणि म्हणूनच त्यांनी आपल्या अनुयायांना फेडरेशन बरखास्त करून रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचा सल्ला दिला.

आंबेडकरांच्या व्यापक भूमिकेच्या मनीषेचे प्रतिबिंब त्या पक्षात दृश्यमान झाले नाही आणि रिपब्लिकन पक्ष दलित फेडरेशनच राहिला. तो तसा का राहिला या प्रश्नाचे उत्तर अतिशय जटिल आहे. रिपब्लिकन पक्षाच्या नेतृत्वाला आंबेडकरी चळवळीचा इतिहास एकवार सांगितला पाहिजे. रिपब्लिकन पक्षात या पक्षाला व्यापक भूमिका देणारा समर्थ नेता नव्हता. बाबासाहेबांचा सहवास आणि आंबेडकरी चळवळीशी नाते हेच त्यांचे भांडवल. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय किंवा राज्यपातळीवरील विविध समस्येवर लक्षवेधी बोलणारा, लिहिणारा नेता तिथे निपजलाच नाही. इतकेच नव्हे तर समग्र आंबेडकरी चळवळ समजलेले नेतृत्वही दुर्मिळच होते. याचा परिणाम म्हणून रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीसंबंधी काही भ्रामक समजुती उराशी बाळगून ही मंडळी काम करीत होती. त्यातील सगळ्यात महत्त्वाचा भ्रम म्हणजे 'रिपब्लिकन पक्ष भारतीय राजकारणातील 'संतुलित शक्ती' (Balancing power) आहे हा ठामून मांडला जाणारा सिद्धांत होय. रिपब्लिकन नेत्यातील हा भ्रम वेळीच काढून टाकणारे दूरदर्शी नेतृत्व या पक्षाला लाभले असते तर रिपब्लिकन पक्षाची ही दुर्दशा टळली असती. भ्रमावर आधारलेल्या चळवळी फार काळ टिकत नसतात. कोणत्या राजकीय पक्षाच्या हातात सत्तेच्या चाव्या द्यायच्या हे ठरविणारे आपणच आहोत या विचाराच्या पोटीच 'आपणच सत्तेवर का जाऊ नये' या विचाराचा जन्म झाला. रिपब्लिकन पक्ष किंवा आंबेडकरी चळवळ भारतीय राजकारणातील संतुलित शक्ती कधीच होऊ शकली नाही. खुद्द बाबासाहेब १९५२ साली समाजवाद्यांबरोबर होते. १९५७ ला रिपब्लिकन पक्षाचे प्रेसिडियम संयुक्त महाराष्ट्र समितीबरोबर होते. १९६२ साली गायकवाड गट समितीबरोबर आणि कांबळे गट समाजवाद्यांबरोबर होता. १९६७ व १९७१ च्या निवडणुकात हा पक्ष दोलायमान अवस्थेत असल्यामुळे व पुढाऱ्यागणिक अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष झाल्यामुळे त्याचे राजकीय अस्तित्व संपले होते. तरीही सत्ता काँग्रेसच्याच हातात होती. हा पक्ष भविष्यकाळात संतुलित शक्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतातील सर्व अस्पृश्यांचे आणि नवबौद्धांचे प्रश्न घेऊन हा पक्ष काही काळ काम करीत राहिला तर हे शक्य आहे. १९६१ सालच्या शिरगणतीनुसार ६·४५ कोटी अस्पृश्य, २·९८ कोटी आदिवासी आणि ०·३३ कोटी बौद्ध असूनही या पक्षास १९६२ च्या निवडणुकीत महाराष्ट्रात ६·९९, उ. प्र. ४ पंजाब ३ टक्के तर आंध्र, मद्रास, गुजरात आणि म्हैसूर या राज्यात फक्त १ ते १॥ टक्का मतदान झाले. याचा विचार भारतीय अस्पृश्यांशी नाते सांगणाऱ्या चळवळीने करू नये काय?

रिपब्लिकन पक्षाच्या वाताहातीची जी अनेक कारणे आहेत त्यात 'सत्तेची लालसा' एक प्रमुख बाब होती. मग त्यासाठी बाबासाहेबांच्या वचनांची बरसात पुढाऱ्यांकडून सभा संम्मेलनात होऊ लागली. 'तुम्ही शासनकर्ती जमात बना' हे बाबासाहेबांचे वचन उद्धृत केले की सत्तेच्या वेडापायी आपल्या मूळ उद्दिष्टांचे भान हरपून आपल्या शत्रूंशीही केलेल्या निवडणूक कराराचे पाप बाबासाहेबांच्या माथी मारून रिपब्लिकन पुढाऱ्यांना राजकारण धुरंधर म्हणून मिरविण्याची सोय झाली. या सत्तेच्या वेडाने शेवटी या मंडळींना काँग्रेसच्या अंगणात नेले. 'आमची ताकद खूप मोठी आहे परंतु विघटन हेच आमच्या पराभवाचे कारण आहे' हे मानणाऱ्याना खुद्द बाबासाहेब आंबेडकरांना निवडणुकीत पराभव पत्करावे लागले, हा इतिहास इतक्या लवकर विसरून कसे चालेल?

या सर्व विवेचनाचा हेतू हा आहे की बाबासाहेबांच्या नावाचा, चळवळीचा वारसा ज्या रिपब्लिकन पक्षाला सुदैवाने मिळाला आहे ती चळवळ समजावून घेण्यातच रिपब्लिकन पक्षातील पुढाऱ्यांची कुठेतरी गफलत होते आहे. बाबासाहेबांच्या दृष्टीने त्यांची चळवळ ही मूलतः 'सामाजिक' चळवळ होती आणि राजकारण व धम्म ही सामाजिक चळवळ समतेच्या ध्येयाकडे गतीमान करण्याची साधने होती.' हा विचारच बाबासाहेबांच्या पश्चात लोप पावला ही अतिशय चिंतनीय बाब आहे. रिपब्लिकन पक्षाच्या नेतृत्वाच्या अपयशाचे, दलितांची राजकीय चळवळ मृतप्राय होण्याचेच नव्हे तर महाराष्ट्रात आणि मुंबईत जातीय तेढ वाढण्याचे मूळ इथेच आहे. 'दलित पँथरचा उदय झाला नसता तरी रिपब्लिकन ऐक्य झाले असते ती वेळ आलीच होती.' असे कितीही कंठरवाने पुढारी मंडळी ओरडत असली तरी ते कुणाला पटेल?

रिपब्लिकन पक्षाची एकवार समीक्षा होणे आवश्यक आहे. त्यातूनच पुढील नेतृत्वाला मार्ग सापडणार आहे. त्यासाठी चिकित्सक कार्यकर्त्यांचा वर्ग जो वेगवेगळ्या राजकीय पक्षात विखुरला गेला त्याला परत आणले पाहिजे. 'भूतकाळ विसरून आपण एक होऊ या' या म्हणण्यात रिपब्लिकन नेतृत्व मला अतिशय उतावळे आणि उथळ दिसते. रिपब्लिकन नेतृत्वाने आंबेडकरी चळवळीचा इतिहास विसरून तर चालणार नाहीच परंतु त्यांनी रिपब्लिकन पक्षाचा कटू इतिहासही विसरता कामा नये. वास्तविक तसा तो त्यांना विसरता येणारही नाही. इतिहासाशी फारकत करून कुठलीही राजकीय संघटना उभी करता येत नसते. कोणाच्या डोक्यात तो भ्रम असेल तर तो वेळीच काढून टाकणे आवश्यक आहे. अर्धवट विचार करणारी माणसे सारं विसरायला क्षणात तयार होतात आणि काहीच विसरत नसतात.

रिपब्लिकन पक्षाची त्याच्या जन्माच्या एका वर्षानंतरच अशी दुर्दशा होण्याचे कारण काय? असे जर विचारले तर त्याचे स्पष्ट उत्तर हे आहे की रिपब्लिकन पुढारी आंबेडकरी चळवळीची इतिहास

मीमांसा सम्यकदृष्टीने करू शकले नाहीत. अस्पृश्य समाजापुढील सर्वच दुःखे सामाजिक होती असे मानणे जितके मूर्खपणाचे ठरेल तितकेच त्यांची सर्व दुःखे आर्थिक समता आल्यानंतर संपतील हा मार्क्सवादी सिद्धांतही भारताच्या धार्मिक आणि सामाजिक संदर्भात चूक आहे. आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांची तीव्रता काळाप्रमाणे कमी अधिक प्रमाणात होत असते. बाबासाहेबांच्या हयातीत सामाजिक दुःखे आर्थिक दुःखाहून अधिक तीव्र होती परंतु त्यावेळीही आर्थिक दुःखे नव्हतीच असे बाबासाहेबांनी कधीच मानले नाही. आज विसाव्या शतकाच्या प्रेरणेने, यंत्रयुगाने, रेल्वे–एस्. टी. ने, शहरीकरणाने, नोकरीतील राखीव जागांनी आणि शैक्षणिक सवलतींनी गेल्या वीस वर्षात दलितांपुढील प्रश्नात झालेला फरक रिपब्लिकन पुढारी मंडळींच्या आकलनापलीकडे गेलेला दिसतो. आज सामाजिक आणि आर्थिक ही दोन्हीही दुःखे दलिताना सारख्याच प्रमाणात गिळंकृत करण्यास वेगाने पुढे सरसावत आहेत. याठिकाणी हेहीं स्पष्ट केले पाहिजे की ही दोन्हीही दुःखे पृथक असून त्यातील एकाचा परिहार झाला तरी दुसऱ्यावर त्याचा फारसा परिणाम होत नाही. म्हणून रिपब्लिकन पक्षाला एचाच वेळी सामाजिक आणि आर्थिक चळवळी अतिशय संयमाने परंतु तितक्याच समर्थपणे कराव्या लागतील. बाबासाहेब आंबेडकरांना आर्थिक चळवळीवर हवा तितका जोर देता आला नाही म्हणून आर्थिक चळवळी करणारे मार्क्सवादी डावे पक्ष त्यांचे शत्रू होते. हा विचार ३ आक्टोबर १९५८ साली रिपब्लिकन पक्षातून फुटलेला कांबळे गट जाहीर मांडू लागला. बाबासाहेब कम्युनिस्ट द्वेष्टे कसे होते हे सिद्ध करण्याच्या भरात संपूर्ण डाव्या चळवळीशी दलितांचे असलेले संबंध सैल होऊ लागले. इतिहासातील ही मजेशीर प्रक्रिया समजावून घेण्यासारखी आहे. शहरात शहरीकरणामुळे, दलितांचा कामगारवर्गात भरणा होऊ लागल्यामुळे व सरकारी नोकरांची संख्या वाढल्यामुळे शहरातील दलितांचा आर्थिक प्रश्न तीव्र होत होता तर खेड्यात धर्मांतर केल्यामुळे, बलुती स्वतः होऊन सोडल्यामुळे, उच्चवर्णियांनी काम देण्याचे नाकारल्यामुळे व सामाजिक तेढीमुळे दलितांचा आर्थिक प्रश्न शहरांप्रमाणेच अधिकाधिक तीव्र होत होता; आणि त्याच वेळी दलितांशी नाते सांगणारा राजकीय पक्ष आर्थिक चळवळी पुढे घेऊन जाणाऱ्या डाव्या चळवळीपासून लांब जात होता, सत्ताधारी कॉंग्रेसकडे जात होता. जे दलित नगरपालिका कामगार, हॉटेल मजूर, रेल्वे मजूर, टॅक्सी ड्रायव्हर्स इ. पेशात समाविष्ट आहेत त्यांच्या युनियन्स डाव्या पक्षाच्या ताब्यात आहेत. कामगार संघटना डावे पक्षच सुरू करतात हा विचारही आज कालबाह्य झालेला आहे. दिल्लीत जनसंघ, मुंबईत शिवसेना आणि इंग्लंडमध्ये कॉन्झर्वेटीव पार्टीही आता कामगार संघटना बांधू लागल्या आहेत हे आमच्या कधी लक्षात येणार आहे का ?

बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीवर नितांत श्रद्धा असणारे विचारवंत होते. तरीही समाजवाद लोकशाही मार्गाने आला तर तो त्यांना हवाच होता, 'राजकीय समते बरोबर आर्थिक व सामाजिक समता आली नाही तर राजकीय लोकशाहीचा दडपले गेलेले वर्ग विध्वंस करतील' हा भारतीय जनतेला राज्य घटना देताना दिलेला संदेश विसरुन चालणार नाही.

रिपब्लिकन पक्ष मुळातच अल्पसंख्याकांचा पक्ष असल्याने त्याला कोणाशी तरी निवडणूक करार करणे भाग आहे. तो कोणत्या पक्षाशी करायचा हे तत्कालीन परिस्थितीवर आणि पक्षीय उद्दिष्टांवर विचार करून पुढाऱ्यांनीच ठरवायचे आहे. आक्षेप निवडणूक करारांना नाही. आक्षेप आहे तो स्वतः निष्क्रीय राहून कामगारांचे आर्थिक प्रश्न घेऊन जाणाऱ्या चळवळींना विरोध करताना आंबेडकरांचा उपयोग केला जातो त्याला. आंबेडकरांना भारतीय इतिहासात न्या. रानडे, गो. कृ. गोखले, गांधीजी या नेमस्तांच्या रांगेत बसवण्याचा जो अपरिपक्व प्रयत्न झाला त्याला आक्षेप आहे. यामुळे दलितांचे निम्मे दुःख (आर्थिक) वेशीवर टांगणाऱ्या सर्व डाव्या चळवळीपासून रिपब्लिकन पक्ष दुरावला गेला आणि एक प्रचंड पोकळी निर्माण झाली. मला वाटते दलित पँथरचा उगम या पार्श्वभूमीवर तपासला तर दलित पँथरच्या नेत्यांच्या भाषणाचा गैर अर्थ करून त्यांच्यावर कम्युनिस्ट धार्जिणे म्हणून कोणीही विवेकी माणूस हल्ला करणार नाही. आंबेडकरांना रानडे, गोखले, गांधीजी यांच्या रांगेत बसवायचे की कार्लमार्क्स, म. फुले एम्. एन्. रॉय यांच्या रांगेत बसवायचे हे एकवार स्पष्ट झाले पाहिजे. यावर विचार मंथन झाले पाहिजे.

रिपब्लिकन पक्षाची अवस्था बघून विफल झालेले काही कार्यकर्ते आंबेडकरी चळवळ संपली, ती कालौघात नष्ट झाली, असे समजून कॉंग्रेसमध्ये गेले. त्यांना दलित पँथरने ही चळवळ संपलेली नसून ती जिवंत आहे हे दाखवून दिले आहे.

ज्या राज्यसत्तेत आपले आर्थिक आणि सामाजिक प्रश्न सुटणार नाहीत अशी ज्या जनतेची खात्री होते ती जनता नेहमी सत्तेच्या विरोधात उभी असते. राज्यसत्तेत असणारा अल्पसंख्यांकांचा गट हे प्रश्न सोडविण्यासाठी स्वतःच्या पक्षीय आणि शासकीय धोरणात मूलभूत बदल करण्याच्या दृष्टीने कमकुवत असतो. सत्तेत गेलेले कार्यकर्ते स्वतःभोवती गर्दी निर्माण करीत असतीलही परंतु ही गर्दी स्वार्थी आणि संधी साधूंची आहे याची जाणीव त्यांच्या अंतकरणात एक शल्य म्हणून असते. आर्थिक आणि सामाजिक दुःखांनी होरपळत असलेला सर्व सामान्य दलित माणूस राज्यसत्तेकडे अनेक आमिषे दाखवून खेचता येईल ही वेडी आशा बाळगून कोणी काम करणार असेल तर ते आंबेडकरी चळवळीच्या इतिहासाचे अज्ञान ठरेल.

रिपब्लिकन पक्ष जिवंत करून वाढवायचा असेल तर सामाजिक प्रश्नाबरोबर आर्थिक प्रश्न घेऊन ही चळवळ उभारली पाहिजे. नाहीतर सामाजिक प्रश्नावर अस्पृश्य, नवबौद्ध, दलित, कष्टकरी मजूर रिपब्लिकन पक्षाचे अनुयायी असतात आणि आर्थिक प्रश्नावर ते कम्युनिस्ट, समाजवादी, शेतकरी कामगार किंवा लाल निशाण पक्षाचे अनुयायी असतात. हा दलित जनतेच्या मनाचा दुभंगलेपणा कधी संपणार आहे की नाही ? तो संपला नाही तर चळवळीचा गाभाच दुभंगेल– पुनः पँथर जन्म घेईल आणि दलित पँथरला ठोकण्यासाठी पुनः रिपब्लिकन पक्ष एक होईल. पुनः विघटन– पुनः पँथर व पुनः एकी. यात जनतेचे काय होईल ? हे दुष्ट चक्र आणि आपल्या अनुयायांची क्रूर थट्टा आपण थांबवणार आहोत की नाही ? या प्रश्नाच्या उत्तरावरच या नव्याने एकत्रित झालेल्या रिपब्लिकन पक्षाचे भवितव्य अवलंबून आहे. □ □

# मुक्काम केज (बीड)

## राजा ढाले

राजा ढाले, नामदेव ढसाळ व लतीफ खाटीक ही मंडळी केजला येणार असे समजल्यावर त्यांची भाषणे ऐकायला केज येथे जाण्याचे निश्चित केले. राजा ढाले व नामदेव ढसाळ ही नावे गेल्या वर्षापासून सर्वत्र गाजत आहेत. मुंबईच्या निवडणुकीत तर या लोकांमुळे काँग्रेसचा पराभव झाला. तेव्हा त्यांची भाषणे ऐकण्याची उत्सुकता बरीच वाढली. भाषणामध्ये शिवराळ भाषा, हिंदु देवतांची टिंगलटवाळी, प्रचलित सामाजिक विषमतेवर कडाडून हल्ला होईल अशी अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षात मात्र त्याबद्दल अपेक्षाभंग झाला.

दि. २८ मार्च रोजी राजा ढाले यांचे केज येथे भाषण झाले. नामदेव ढसाळ व लतीफ खाटीक इतर ठिकाणी गेल्यामुळे केजला येऊ शकले नाहीत. केज येथील दलित पँथरच्या नेत्यांनी या मंडळींना निमंत्रण दिले होते. केज गाव ते केवढे ! तालुक्याचे गाव असून ग्रामपंचायत. पुणे-परळी रस्त्यावर असल्यामुळे चार लोकांना माहीत. स्टँडजवळ रस्त्याच्या कडेला पत्रे टाकून छोटेसे स्टेज उभे केले होते. त्या स्टेजवरून देखील दलितांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीची कल्पना यावी. दलित पँथरच्या अनुयायांनी सभेचा कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. दलित समाजातील व विशेषतः महार जातीतील शाळा कॉलेजातील तरुण राजा ढाले, नामदेव ढसाळ यांच्याकडे आकृष्ट झाला आहे. सर्वत्र स्वयंसेवक तत्परतेने काम करीत होते. त्यांच्या अंगी हळूहळू शिस्त बाणू लागली आहे. ७००-८०० लोकांचा समुदाय सभेला हजर होता. भर दुपारच्या उन्हात त्या छोटयाशा गावात श्रोत्यांनी राजा ढालेसाठी गर्दी केली होती.

आपल्या, जवळ जवळ दीड दोन तासांच्या भाषणात त्याने दलित पँथरच्या आवश्यकतेबद्दल मुद्देसूद चर्चा केली. तो पट्टीचा वक्ता वाटला नाही. परंतु त्याचे विचार मात्र शास्त्रशुद्ध, परखड व आत्मविश्वासपूर्ण होते. कोणाही विचारवंताला अंतर्मुख करायला लावण्याची ताकद त्याच्या भाषणात होती. म्हणूनच मी वर म्हटले आहे की त्याच्या भाषणाने अपेक्षाभंग झाला. तो आपल्या भाषणात म्हणाला, ' दलित पँथर ही संघटना केवळ बौद्धांची नाही. ती सर्व दलितांसाठी आहे. धर्मातीत व जातीयता विरोधी अशी ही संघटना आहे. त्याचप्रमाणे हल्लीच्या रिपब्लिकन पक्षाच्या विरुद्ध देखील ती आहे. म्हणूनच दलित पँथरचा उपाध्यक्ष मुस्लिम आहे. कोणत्याही धर्माच्या व्यक्तीला अगर जातीच्या व्यक्तीला या संघटनेत प्रवेश आहे. मात्र ती व्यक्ती दलित असली पाहिजे. व समतेवर तिचा विश्वास असला पाहिजे.'

आपल्या बहुतेक सर्व भाषणात त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या नेतृत्त्वावर कडाडून हल्ला चढविला. तो म्हणाला, ' हा रिपब्लिकन पक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पक्ष नव्हे. कारण १९५६ साली डॉ. बाबासाहेबांचे निर्वाण झाले. तर १९५७ साली रिपब्लिकन पक्ष स्थापन झाला. त्याचप्रमाणे बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर त्यांचा वारसा श्री. कांबळे, श्री. भंडारे, श्री. गवई, श्री. गायकवाड या नेत्यांनी सांगितला. बाबासाहेबांच्यानंतर बाबासाहेब कोण होणार म्हणून भांडणे सुरू झाली. या नेत्यांना दलित समाजाबद्दल काही कळवळा नव्हता. सर्वजण स्वार्थी होते. परवाच्या मुंबईच्या निवडणुकीत तीन तीन लाख रुपये घेतले, व या हरामखोरांनी आपला पक्ष काँग्रेसला विकला. परंतु तेथील दलितांची मते आम्ही काँग्रेसला मिळू दिली नाहीत.काँग्रेसचा पराभव झाला. म्हणून काँग्रेसवाल्यांनी त्यांजकडे पैसे परत मागितले. (कारण मते मिळाली नाहीत.) परंतु हे कोठून पैसे परत देणार ? मग काँग्रेसवाले त्यांना म्हणाले पैसे परत देत नसाल तर नेत्यांची एकी करा. म्हणून हे रिपब्लिकन नेते आता गावोगाव हिंडू लागले आहेत. परंतु बाबासाहेबांच्या नावाचा सौदा करून लोकांच्या काळजाला हात घालण्याचा उद्योग दलित पँथर करणार नाही. डॉ. बाबासाहेबांचे विचार आपणास पुढे न्यावयाचे आहेत. दलित पँथरला बाबासाहेबांचे खरेखुरे अनुयायी व्हायचे आहे, दलित पँथर म्हणजे बाबासाहेबांनी निर्माण केलेली सामाजिक चळवळ आहे. रिपब्लिकन पक्षाचे नेते महार व हरिजन आहेत. ते विषमतेचे नेते आहेत. ते जातीय नेते आहेत. पंढरपूरला ज्याप्रमाणे भक्त व पांडुरंग याच्यामध्ये बडवे आडवे येतात, त्याप्रमाणे दलित व बाबासाहेब यांच्यामध्ये रिपब्लिकन पक्षाचे सध्याचे नेते आडवे येत आहेत. त्या बडव्यांची तीन आडनावे आहेत. त्याप्रमाणे यांचेही तीन गट आहेत. त्यांना बाजूला सारून दलितांना डॉ. बाबासाहेबांकडे पहावयाचे आहे.'

' दलित पँथर इतरांकडे जातीय दृष्टीने पहाणार नाही. कारण ती जात-पात व धर्मांधता मोडण्यासाठी उभी राहिली आहे. बहुतेक सर्व पक्षांना ज्याप्रमाणे संघटना आहेत (युवक काँग्रेस, युक्रांद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) त्या प्रमाणे आम्हाला संघटना निर्माण करावयाची आहे. मात्र ती बुद्धिवादी नेतृत्व व शारिरिक बल असलेली संघटना हवी.'

दलित पँथर कम्युनिस्ट नाही हे स्पष्ट करताना तो म्हणाला, ' टीकाकार म्हणतात, आम्ही कम्युनिस्ट आहोत. पण बाबासाहेबांचा तर कम्युनिस्टांना विरोध होता. परंतु मला त्यांना हे सांगायचे आहे की, बाबासाहेबांचा विरोध हिंसेला होता. मार्क्सला नाही. समाजात विषमता आहे. त्यामुळे आम्हाला आर्थिक दैन्य आले आहे. ही सामाजिक विषमता घालवल्या नंतरच आमचे आर्थिक दैन्य दूर होण्यास मदत होईल. जोपर्यंत विषमता जात नाही, तोपर्यंत लढयाला काही अर्थ नाही. येथे बुद्ध धर्म आला पाहिजे. कम्युनिझम येण्याची गरज नाही. आम्ही कम्युनिस्ट नाही. मात्र ते जे समतेचे कार्य करीत आहेत, ते कमी महत्त्वाचे नाही.'

शेवटी जयभीम ! 'जय बुद्ध !' जय भारत !!!' असे म्हणून त्यांनी भाषण संपवले.

१९७२ च्या १५ ऑगस्टच्या साधना अंकात खळबळजनक लेख लिहून सर्व महाराष्ट्रात धमाल उडवून देणारा राजा ढाले तो हाच का ? असा प्रश्न मला पडला. वर्ष-दीड वर्षांच्या अवधीत त्याचे विचार बदलून खूपच प्रगत व व्यापक झाले आहेत. दिसायला दिसतो पोरगेलासाच, पण वाचन व अनुभव भरपूर दिसला. वक्तृत्व फारसे नव्हते. मात्र विचार प्रगल्भ होते. नेतृत्वाला आवश्यक असणाऱ्या काही गोष्टी त्याच्यामध्ये आढळल्या. सध्या तर त्याच्याभोवती महाराष्ट्रात एक वलय निर्माण झाले आहे. त्यामुळे तो जेथे जाईल, तेथे ते वलय गर्दी खेचून आणते. ज्यांनी त्याचा १५ ऑगस्ट १९७२ च्या ' साधना ' च्या अंकातील ' तो ' लेख वाचला असेल, त्यांना त्याने वरील भाषण संपवताना केलेली घोषणा लक्षणीय वाटेल.

—प्रा. सु. रा. काकडे

# सोलकढी


## अरुण दाते : नाबाद ४००
## व. पु. काळे : नाबाद ३००

महानगरी मुंबई अनेकरूपिणी आहे. शोभिवंत–अकाल, ऐश्वर्यवती–कंगाल, खानदान, अक्करमाशी, कलावती, बाजारबसवी, अन्नपूर्णा, वखवखलेली, आत्ममग्न, प्रदर्शनाळ, धावती, विश्रब्ध, बडबडी, घुमी, गूढ, मनमोकळी, घामेजलेली, आरामलेली, सुलभा, दुर्लभा...अशी विशेषणे नीटनेटकी वापरून मुंबईच्या बहुरंगी रूपाचे वर्णन कोणत्याही होतकरू वाचकाला सहज करता येईल. तसे झाल्यास लेखकाचे काम आणि महत्त्व हलके होऊ शकेल. पण ती अनेकरूपिणी असली तरी इतर काही खास समताळू दृष्टिवंतांप्रमाणे मी सहस्राक्ष नाही. माझी मुंबई वर्तमानपत्रे-पुस्तके वाचणारी, त्यावर चमचमीत वाद घालणारी, जिभेचे लाड करणारी, मोटार-टॅक्सीतून गिरकणारी, नाटके-चित्रपट पाहणारी, क्रिकेटचे सामने आणि राजकीय–सांस्कृतिक सभांना गर्दी करणारी, गाणे ऐकणारी आणि गाणे गुणगुणणारी, तृप्त व स्वप्नाळू मुंबई आहे.

अशी ही मुंबई माझी म्हणजे माझी एकट्याची अर्थातच नव्हे. या मुंबईत एकट्याने काहीच करता येत नाही; आणि कोंडाळ्याने काहीही करता येते. दादरला असेच एक 'कलासक्त' नावाचे कोंडाळे आहे. 'कलासक्त' ला घटना नाही, पदाधिकारी नाहीत, निवडणुका नाहीत, वर्गणी नाही; फक्त, आनंदाचे चार क्षण देण्याघेण्याचा रिकामटेकडा हव्यास आहे. या हव्यासामुळे 'कलासक्त' मधूनमधून काही जमाडीजमती करीत असते. अशीच एक जम्मत बावीस मार्चला त्याने केली.

स्थळ होते दादरच्या समुद्रात पाय बुडवून बसलेला महापौरांचा बंगला. बंगला वर्षभर मोकळाच होता. महापौर सुधीर जोशींना सारखी भेळपुरी खायचा मोह टाळायचा असल्यामुळे त्यांनी या बंगल्यात मुक्काम टाकलाच नाही. असेच वर्ष संपले महापौरपदाची सुधीर जोशींची मुदत संपली म्हणून 'कलासक्त'ने त्यांना निरोप दिला. सुधीर जोशी हा ऐकूणच बऱ्यापैकी माणूस आहे : शिवसेनाधिकारी होऊनही हसण्याहसवण्याची त्याची खोड गेलेली नाही; मराठी माणसाच्या उद्धाराची जबाबदारी शिरावर घेऊनही त्याचा आवाज घोगरा झालेला नाही; वागणे खरखरमुंडे बनलेले नाही. त्यामुळे हा 'महापौर' कसला, हा मस्तपैकी 'महापोर'च आहे, असे आमच्यासारख्या पोराठोरांना वाटत राहते.

महापौरांच्या निरोपाला जोडून आणखी एक जोड-कार्यक्रम होता : अरुण दात्यांच्या भावगीत गाण्याचा चारशेवा कार्यक्रम आणि व. पु. काळ्यांच्या कथाकथनाचा तीनशेवा कार्यक्रम, असा एकप्रयोग जुळून आला होता. गेल्या काही वर्षात अरूण दात्यांना धमाल लोकप्रियता मिळते आहे. त्याच त्याच गायकांचे तेच तेच आवाज ऐकून कंटाळलेल्या महाराष्ट्राने या वेगळ्या गायकाला चांगली दाद दिली आहे. मीसुद्धा अरुण दात्यांच्या गाण्यावर मोहित झालो म्हणजे बघा. कारण सुरुवातीला मला त्यांच्या गाण्याची भीती वाटायची : आईस्क्रिम-कोनमध्ये ओसंडून जावे इतके आईस्क्रिम भरावे तशी दात्यांच्या शब्दासुरातून भावना नको तेवढी ओसंडते, असे मला वाटायचे. त्यामुळे माझा आनंद चिकट होऊन जायचा. आता मात्र एखादे पान, त्यातल्या पदार्थांच्या बेमालुम प्रमाणाने जमावे, तसे दात्यांचे गाणे जमते आणि रंगते. पूर्वीचे कथेकरीबुवा जसे विशिष्ट पोशाख चढवून कथा सांगायचे तसे व. पु. काळे जाकीट चढवून आपल्या कथा सांगतात. जाकिटलेले त्यांचे ध्यान रम्य दिसते. काळ्यांची कथा हमखास रंगते : हंशे आणि हुंदके काळे हुकुमी वसूल करू शकतात. महाराष्ट्रातले बहुतेक नवे कथेकरीबुवा त्याच त्याच कथा पुन्हा पुन: सांगतात. इतके कार्यक्रम झाल्यामुळे काळ्यांनासुद्धा तसे काही वेळी करावे लागले असेल; तरीही त्यांच्या पोतडीत सांगण्यासारख्या पुष्कळच कथा आहेत; आणि व. पु. काळे हा एकूणच धोरणी इसम असल्यामुळे श्रोत्यांच्या एका



पुंजक्यावर आधी एकदा ऐकलेली कथा पुन: एकण्याचा प्रसंग येणार नाही, याची काळजी ते घेतात. आपण कोठली कथा कोठे आणि कधी सांगितली याची बारीक नोंद काळ्यांपाशी जय्यत असते. हे कशाला, परवा जेव्हा काळ्यांना माझ्यासमोर एक शिंक आली तेव्हा ती या वर्षातली एकोणनव्वदावी शिंक आहे, असे काळ्यांनी साटकन सांगितले. आता बोला.

अरुण दात्यांची गाणी आणि व. पु. काळ्यांच्या गोष्टी हा जोड–कार्यक्रम चांगलाच रंगला. नोंद ठेवणे यापुढे कठीण जाईल इतके या दोघांचे कार्यक्रम होत राहतील, असा मला संशय येतो. माझ्यासारखे सगळेच श्रोते जाणकार होते; त्यामुळे कार्यक्रमाला विशेष गंमत आली. एकूण सोहळाच इतका साजिरा झाला की भाषणेबिषणेसुद्धा तसा भाव खाऊन गेली. कलावंतांबरोबर त्यांच्या समानशील आणि सहनशील बायकांचेसुद्धा कौतुक करण्यात आले ते योग्य, उचित आणि स्वाभाविकच झाले. कालासक्त नवऱ्यांना आणि त्यांच्या कार्यक्रमांना सांभाळणे ही गोष्ट काही सोपी नाही. सौ. वसुंधराबाई काळे व. पुं. चा जो प्रतिपाळ करतात त्यावरून मी तर त्यांना 'व. पुं.' धराबाईच म्हणतो. असो.

माझ्या मुंबईत असे कार्यक्रम अधूनमधून सतत होत असल्यामुळे मी मुंबईला कधीच कंटाळत नाही. खरे असे आहे की आपण स्वतःला कंटाळत नसलो तर दुसऱ्या कोणाला कंटाळण्याचीही भानगड फारशी उपटत नाही.

–अनंतराव

चित्र वार्ता पुरवणी

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

प्रेमजी निर्मित आणि दुलाल गुहा दिग्दर्शित 'दोस्त'मध्ये धर्मेन्द्र आणि हेमामालिनी



## फिरसे मनोरंजन–एंटरटेनमेंट !

सगळी फिल्मी दुनिया, सगळे फिल्मी अखबारवाले होशियार झाले आहेत. बाऽअदब, बा मुलाहिजा मनोरंजन आ रहा है ! ग्रेटेस्ट फिल्मी उचलेगिरी याने की प्लॅगियाटिझम ऑफ नाइनटीन सेव्हन्टीफोर ! मुंबईकर पब्लिक ' मनोरंजन 'चे स्वागत कसे करील हे सांगायला नकोच. तुफान हाऊस फुल्ल–१५०० सीटसचे मिनर्व्हा थिएटर जाणार. तिकिटांचा काळाबाजार होणार. तुम्ही पिक्चरला जात असले तर थिएटरच्या भीडमध्ये तुम्हाला पब्लिक विचारणार, ' तिकीट है ' दो–दो चॅरिटी प्रिमिअर्स ! त्यात एक फिल्मी अखबारवाल्यांचाही आहे. आमच्या फिल्मी अखबारवाल्यांची फिल्म जर्न्यालिस्ट सोसायटी म्हणून एक संस्था आहे. कडकी संस्था आहे. कडकी संस्था असली म्हणजे संस्थेजवळ पैसा आल्याशिवाय काहीच अॅक्टिव्हिटी करता येत नाही असे मेंबर लोकांना वाटते. आता चॅरिटी प्रिमीअर झाला की संस्था मालंमाल होऊन जाईल. मग त्या संस्थेकडून काही होणार नाही. सर्वच संस्थेंची गोष्ट सांगतो. पण ते सोडा. एकूण चॅरिटी प्रिमिअरला केंद्रीय मंत्री इंद्रसेन गुजरालना आणून फिल्मी अखबारवाल्यांचा सबसे बडा प्रिमीअर करण्याचा उद्देश होता. पण तो यशस्वी झाला नाही. सबसे बडा प्रिमीअर दिल्लीला झाला असावा. राष्ट्रपती गिरी यांच्या उपस्थितीत. एकूण भारताचे राष्ट्रपती ' मनोरंजन ' सारखे सिनेमा पहातात, हे पाहून बरे वाटले. आमचे पंडित नेहरू म्हणे हिंदी सिनेमा पहाताना झोपी जात. पण राष्ट्रपती मात्र देशात होणाऱ्या गोष्टीची, उचलेगिरीची पण इज्जत करतातसे दिसते.

असो. ' मनोरंजन 'ची दिल्लीत काय हवा आहे कुणास ठाऊक ? अर्थात दिल्लीच्या हवेचा आणि मुंबईच्या हवेचा काही संबंध नाही. ' राजेंद्रकुमारचा ' गोरा और काला ' दिल्लीत चालला. मुंबईत फ्लॉप. साधनाचा ' गीता मेरा नाम ' दिल्लीत चालला. मुंबईत बोंबलला. ' मनोरंजन ' याने इंडियन ' अर्मा ला डूस 'ची दिल्लीची हवा आपल्या कानापर्यंत आली नाही पण, ' मनोरंजन 'ची हवा मात्र आहे. हवा असलेले पिक्चर ही एक हिंदी सिनेमातली इव्हेंट असते. नतीजा– ' मनोरंजन ' बाजारात येण्यापूर्वी शम्मी कपूरकडे डायरेक्शनसाठी आणखी पिक्चर्स आली. संजीवने जॅक लेमनवर कडी केली आहे अशी एक हवा आहे. इंपॉसिबल वाटत नाही. संजीव हा चांगला कॉमेडीयन आहेच. आणि झीनी झीनतने आपल्या जिंदगीतली अदाकारी केली आहे वगैरे वगैरे. ज्याने त्याने ' मनोरंजन ' पहावा. शम्मी म्हणतो, ' इटस एंटरटेनमेंट. नायतर उगीच मिनर्व्हा थिएटर समोर ' वोह देखो संजीवकुमार, वोह देखो आर. डी. बर्मन ! करायला याल '

## सी. रामचंद्र यांच्या डोक्यातला किडा वळवळला

बुजुर्ग संगीतकार सी. रामचंद्र आठवतात ? आम्ही त्यांना ' अण्णा ' म्हणतो. संगीतकारात दोन माणसे मोठी मस्त आहेत. अण्णा आणि दादा (बर्मन). अण्णा हॅंडसम, उंच, शेलाटे कुरळे केस, तलवारकट मिशा. हीरो होण्यासाठी जन्मलेला अखेर म्युझिक डायरेक्टर म्हणून फेमस झालेला. तर दादा बर्मन एकदम सिंपल, पूर्व बंगालमधल्या जानकीपदातील गरीब माणसासारखा. तर दादा विषयी पुन्हा कधीतरी. आमच्या अण्णांच्या मस्तकात अचानक किडा वळवळू लागला. ' किडा वळवळणे ' हे खास अण्णांचे एक्स्प्रेशन. एकदा चक्क मिनिस्टरा समोर केलेल्या भाषणात त्यांनी हे एक्स्प्रेशन वापरले. असा हा बिनधास्त माणूस. निमित्त काय झाले पहा. त्यांचे कोणी पुण्यामध्ये शुक्ल नावाचे मित्र आहेत. गातात. कसून मेहेनत करतात. पण चार जणात बैठकीला बसले आणि षड्ज लावला की श्रोत्यांना हटकून उठवून लावण्याचंही त्यांच्यामध्ये सामर्थ्य आहे. तात्पर्य, असे गाणे येणे आणि गाणे लोकांना पसंत पडेल असे गाणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. म्हणूनच अण्णांनी लोकांना गाणे कसे गावे याचे शिक्षण देणारा वर्ग सुरू करायाचे ठरवले. हनुमान जयंती हा दिवस मुक्रर केला. अर्थात हनुमान जयंतीच्या दिवशी अण्णांनी आपली संगीत शाळा सुरू केली तरी त्याची गुंड्याभाऊ दांडेकरांची संगीत व्यायाम शाळा करणार नाहीत. ' गायकाला मी पेटीवर गायला शिकवणार आहे, तंबोऱ्यावर नाही ' ते आम्हाला म्हणाले.

अण्णांनी ही संगीत शाळा (अॅकेडमी ऑफ इंडियन म्युझिक) काढून फिल्मी गायकांनी जी कोंडी केली आहे, ती फोडायचा ' एम ' (अॅकेडमीच्या नावाची आद्याक्षरांनी तयार झालेला शब्द). ठेवला आहे. आज ' टॉप 'वर असलेले फिल्मी गायक नव्या होनहार गायकांना पुढे येऊ देत नाहीत– त्यांना जणु काही गाण्याच्या क्षेत्रात मज्जावच आहे. अण्णा एक एक उदाहरण सांगत होते. ' सुमन कल्याणपूर पुढे येते आहे असे वाटत होते. इतक्यात तिचा बाझार आटोपला. वाणी जयराम ! तिचे एक गाणे हिट झाले. पर्वा ते रेकॉर्डिस्टच म्हणाले ' आता वाणी जयरामचे नावच ऐकू येणार नाही. ' अण्णांच्यापेक्षा माझ्याजवळ चांगले उदाहरण आहे. मागे भारत ज्योतीच्या अंकात माझे मित्र अजित मर्चंट यांनी छापलेले. एका निर्मात्याने हंसा दवे नामक एका गायिकेला हुडकून काढले (आपण तिची गुजराथी गीते ऐकून भारावून गेलो आहोत ! ) हंसा दवेचा आवाज तपासण्यात आला, गाण्याच्या तालमी झाल्या. आता फक्त ध्वनिमुद्रणच बाकी राहिले होते. इतक्यात लताला कशी कोठून बातमी लागली कुणास ठाऊक ? नेफामध्ये चीनच्या फौजा शिरल्याप्रमाणे तिची अवस्था झाली. तत्काळ ती ध्वनिमुद्रणाच्या रूममध्ये आली. हंसा दवे आऊट !

आमचा एक पत्रकार म्हणाला, ' लतासारखी आंतरराष्ट्रीय कीर्तीची गायिका पण, नव्यांना इतकी घाबरते. एकूण यावरून लता किती श्रेष्ठ कलाकार आहे, ते समजते. '

पण मी अण्णांच्या विचाराचा होतो. ' लता ही श्रेष्ठ कलाकार आहे. लता दुसऱ्या कलावंताला घाबरत नसून, निर्माते आणि



अण्णा चितळकर


कलावंत लताला घाबरतात. आता आशा भोसलेचंच उदाहरण घ्या ना. लता आणि आशा यांच्यामध्ये आजं तरी आशाच्या आवाजाचा कस अधिक चांगला वाटतो. पण, लताला खाली खेचण्याचे काम आशा करीत नाही. (तिथे तिचे पाय डळमळतात). आर. डी. वर्मनसारखा माणूस भर स्टेजवर लताच्या पाया पडतो. संगीतकाराने गायिकेच्या पाया पडावे हे किती विचित्र. पण लताची मर्जी सांभाळण्यासाठी त्याला पडलेच पाहिजे. नाहीतर त्याचा ओ. पी. नय्यर झालाच समजा. ओ. पी. नय्यर लताचा आवाज घेत नाही म्हणून आशा-लतांनी त्याचं गाणं ज्या रेकॉर्डिंग रूममध्ये ध्वनिमुद्रित होईल त्या रेकॉर्डिंगरूममध्ये गायचं नाही असं ठरवलेय. इतकी भयंकर कोंडी कुणाचीही नसेल !

असो, सी. रामचंद्र यांच्या ॲकेडमीमधून बाहेर पडणाऱ्या गायकाकडून आजची कोंडी फुटेल की नाही, कुणास ठाऊक. एक गोष्ट निश्चित की अण्णांना लताच्या पदरात तिचे माप परत करायचे आहे-असे मला सारखे वाटत राहिले. विशेषतः त्यांनी ' ऐ मेरे वतनके लोगो ' या पं. नेहरूंना हालवणाऱ्या गाण्याचा इतिहास सांगितला त्यावरून तरी नक्कीच वाटले. अण्णांमध्ये आणि लतामध्ये पूर्वीचे देणे घेणे उरले आहेच. लताने त्यांच्या पदरात यापूर्वी भरपूरच माप टाकले आहे. लताने अण्णांविषयी दुस्वास बाळगून कधी गाऊ नये; कोणा पत्रकाराने ' तुमची आवडती गाणी कोठची म्हणून प्रश्न विचारला असता, अण्णांचे एकही गाणे त्यात समाविष्ट करू नये, असा बदला ती घेत होती. पण काळही माणसावर बदला घेतच असतो. अण्णांच्या गाण्यावर बहिष्कार टाकणाऱ्या लताला इंग्लंडच्या दौऱ्यात ' ऐ मेरे वतन के लोगो ' हे अण्णांचे गाणे म्हणावेच लागले. ते गाणे गाताना, लताला गणंग मटकीचा दाणा दाताखाली यावा तसेच वाटले असेल, असे मला वाटते.

तर ' ऐ मेरे वतनके लोगो ' ची गोष्ट. अण्णांनी दिल्लीला जाण्यापूर्वी प्रदीपच्या मागे लागून हे गाणे लिहून घेतले होते आणि आशाची तालीम घेत होते. कुणालाच ठाऊक नव्हते. अण्णा दिल्लीत काय गाणे पेश करणार ते ? त्यापूर्वी मुंबईत त्यांनी एक फालतु गाणे बसवले होते तेच ते पेश करणार असा समज. मात्र लताला हे जबरदस्त गाणे पेश करताहेत याची कुणकुण लागली आणि तिने मग त्यांच्याकडून ते काढून घेतले.

एकूण अण्णांच्या चालीमुळे ते गाणे साऱ्या भारताला हेलावून गेले. केवळ लताच्या

**राजेंद्रसिंग बेदीचे चिरंजीव नरेंद्रसिंग बेदी यांच्या खोटे सिक्के मध्ये डॅनी आणि अलका. डॅनी आणि जया एकाच वर्षी फिल्म इन्स्टिटयूटमधून बाहेर आले आणि गंमत म्हणजे त्या वर्षीचे ॲक्टिंगचे गोल्ड मेडल डॅनीने पटकावले-जयाला बाजूला सारून.**



आवाजाचे ते कर्तृत्त्व असते तर ' सरफरोशी की तमन्ना 'ची का वेगळी स्टोरी झाली ?

अण्णांनी अॅकॅडेमीबाबत एक गोष्ट सांगितली ती मात्र सांगितलीच पाहिजे. अण्णांच्या अॅकॅडेमीमध्ये मराठी माणूस आला नाही. त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मराठी माणसाने अण्णांवर कधी प्रेम केलेच नाही. जीव ओवाळून टाकावा इतका उणापुरा दिलखुलास माणूस हा. पण त्यांचे ' संडे के संडे ' हे गीत ऐकले की मराठी माणसे नाक मुरडायची. त्यांच्यामते फिल्मीसंगीत म्हणजे गोविंदराव टेंबे, मा. कृष्णा या मंडळींचेच. अण्णा आपले बुजुर्ग गजानन जागीरदार यांचा किस्सा सांगतात. अण्णा याने की सी. रामचंद्र त्यावेळी टॉपला होते. त्यावेळीच एकदा जागीरदार भेटले रामचंद्र नावाच्या चितळकरांना. म्हणाले, 'काय चितळकर, काय तुम्ही आपले संगीत घेऊन बसला आहात. तो साऊथचा सी. रामचंद्र कसा पुढे आलाय. त्याच्याप्रमाणे जरा धडाडी दाखवा. '

बाय द वे, अण्णांच्या भेटीतच कळले की वाद्यवादकांच्या संपाचा शेवट झाला. त्यासंबंधी पुढील आठवड्यात.

## नरेंद्र बेदी यांचा तिसरा कारनामा

राजेंद्रसिंग बेदी यांचे मोना (स्मश्रु केलेले) पुत्र नरेंद्रसिंग बेदी हे ' खोटे सिक्के 'चे दिग्दर्शक. फिल्मी जगतात दोन सिनेमे ज्युबिली हिट केले त्याबद्दल ते महशूर आहेत. आपण चार वेगवेगळ्या तऱ्हेची पिक्चर्स काढणार असे ते म्हणतात. जानपदातील स्टोरीवर ' बंधन. ' तरुणीच्या प्रश्नावर ' जवानी दिवानी ' हे त्यांचे कामयाब कारनामे. ' खोटे सिक्के ' हा त्यांचा तिसरा डाकूच्या जीवनावरील कारनामा. डाकूवरचे पिक्चर म्हणजे कुठचा तरी फॉरेन माल उचललेला असतोच. इथे ' मॅग्निफिसंट सेव्हन ' उचलले आहे. डॅनी, रणजित, सुधीर, नरेंद्रनाथ हे एरव्ही पडद्यावरचे खोटे सिक्के, इज्जतवाल्या माणसांच्या भूमिका करण्यासाठी झुरत असतात; त्यांना या चित्रात तशा भूमिका मिळाल्या आहेत. पण अशा चांगल्या भूमिका केल्यानंतरही त्यांचे शत्रुसारखे होऊ नये. शत्रूने हिरोची भूमिका केली तरी त्याला लोक व्हिलन म्हणूनच पाहतात अशी त्याचीच तक्रार आहे.

या चित्रात मॅग्निफिसंट सेव्हन पेश केल्यामुळे काही कॅरेक्टर्स पेश होतील असे वाटले होते. पण काही कॅरेक्टर्स नाहीत. सुधीर हा नट, ज्या त्या पोरीला फंशी पाडीत असतो. त्यावरून आठवले. एकदा सुधीर आम्हाला म्हणाला, ' मी त्या खलनायकापैकी नाही जो एकाच पोरीवर मरतो. आपण जी मिळेल ती पोरगी उचलतो. हाच हॅपी गो लकी माणसाचा रोल त्याने या चित्रात केला आहे. म्हणून हा एकटाच लक्षात राहातो.

या चित्राची नायिका रेहाना सुलतान. हिला नाचता येत नाही तरी तवाएफची भूमिका करून हिने अवलक्षण दाखवले आहे. (बडा कबुतरमध्ये कॅब्रे डान्सरच्या भूमिकेत तिने अशीच भंकस केली होती.) मोठ्या डोळ्यांची अलका बरीच इंतजारची घडी संपल्यावर आता बऱ्याच भूमिकेतून दिसू लागली आहे. ती म्हणे अंगावरचे कपडे काढीत नव्हती म्हणून तिला काम मिळत नव्हते. आता कपडे काढू लागली आहे आणि फिल्मवाल्यांच्या ज्या अदाकारीच्या अपेक्षा आहेत त्याही पुऱ्या करू लागली आहे. उदाहरणार्थ–डॅनी रणजितच्या टोळीत सामील होऊन जनाना दादागिरी करणे, वगैरे. आर. डी. ने लक्ष्मीकांतच्या एका गाण्याची उचल करून ' इन्साफ 'मध्ये लक्ष्मीकांतने त्याच्या उचललेल्या गाण्याची परतफेड केली आहे. एकूण हिंदी सिनेमावाले स्टोऱ्या परदेशांकडून तरी उचलत होते पण, म्युझिकवाले एकमेकांचेच उचलू लागलेले दिसतात. ■

### एक किस्सा छानसा

फिल्मी मंडळींना सहकार्य करण्याचा झटका अधून मधून शासनाला येतो. पंजाब सरकारला अशाच स्वरूपाचा एक झटका आला असताना–या राज्य सरकारने चेतन बाबूंना सहकार्याचा हात दिला. शासन जामीन राहिले म्हणून एका राष्ट्रीकृत बँकेने चेतन बाबूंना थोडे थोडके नव्हे १० लक्ष रुपयांचे कर्ज मंजूर केले. रक्कम हातात पडल्यावर आपण कर्ज काढले होते ही गोष्ट चेतनजी सोयीस्करपणे विसरले आणि आपण जामीन राहिलो होतो याचा राज्य शासनाला विसर पडला. तुमचे आमचे भाग्य थोर म्हणूनच बँकेला आपण कर्ज दिले आहे याचा विसर पडला नाही.

वसुलीची चक्रे सुरू झाली–बँकेने प्रथम चेतनजींवर लक्ष केंद्रीत केले. फिल्मी माणसाला–' पत्रव्यवहाराने गाठणे ' म्हणजे एका महाचमत्कार. पण याचा साक्षात्कार बँकेला होईपर्यंत पोस्टखात्याला पाचशे रुपयांची खिराफत वाटून झाली होती. इथे दाद लागणे कठीण हे लक्षात आल्यावर बँकेने आपला होरा पंजाब सरकारकडे वळवला. बँकेला उत्तर आणि त्याची चेतनला प्रत हा खेळ सरकारने काही काळ चालवला. मुद्दल लांब, व्याजही हाती येईना, तेव्हा बँकेने चेतन बाबूंवर नोटीस ठणकावली. त्यांनी जामीनादाराकडे बोट दाखविले आणि दहा लाखाच्या रकमेवर–अडीच लाखाच्या व्याजाचा मलिदा चारून शासनाने हे प्रकरण अखेर हातावेगळे केले. पंजाब राज्य सार्वजनिक हिशेब समितीने (Public Acts Committee) या सर्व प्रकारावर कठोर टिका केली. टिका सोबतच्या टिपणीसह दप्तरी दाखल झाली. ' हिन्दुस्थान की कसम '–ये ' हकिगत ' बिल्कूल सही है ?

–शरद

## रानवट ऑलीव्हर रीड

' धी स्क्रीमिंग टार्जेट 'चा हिरो ऑलिव्हर रीड हे एक भयंकर रानवट धूड आहे. रानवटासारखे माथेफिरूप्रमाणे तो वागतो आणि सारे पिक्चर हालवतो. इथे तो एक खुनी कैदी आहे. त्याचा एक एक फटका जबरदस्त. जणु आपल्याच तोंडात बसावा


तसा बसतो. त्याचे आणि त्याच्या मित्राचे तुरुंगातून पळणे चिक्कार डिटेल्स्‌मध्ये भलतेच चित्तथरारक. हिंदी सिनेमावाले ते उचलून आपल्या पब्लिकला धडा देणार (' जुग्नु 'चा धडा विसरला नाहीत ना !) यात ऑलिव्हर रीडचा दोस्त इयान मॅक्शेन हा खरा ॲक्टिंग करणारा माणूस. तुरुंगातले पोलीस त्याच्या इंद्रियावर फटका मारतात, तो प्रसंग अस्सल आहे. पण अखेर ऑलिव्हर रीडचा विश्वासघात करून तो पळ काढतो त्यावेळी ऑलीव्हरचे रिव्हॉल्वर त्याच्याजवळ राहू देतो हा प्रकार काही समजला नाही. पाश्चात्य चित्रात असा एखादा ' क्ल्यु ' बरोबर बसला नाही की साऱ्या पिक्चरची वाट.


टेकिंग बहाद्दरच आहे. नुसते श्वास घेता येईल की नाही, असे होऊन पहात रहावेसे वाटते.

## मुमताझची शादी

नटीची शादी केव्हा व्हावी याचाही काही एक होरा असतो. आणि त्याचे भान संबंधीत नटीने ठेवायचे असते. हिशेबी अडाल्याने यशाचे सर्व टप्पे ओलांडून एकदम टॉपला गेलेल्या मुमताझने शादीचा हा मौकाही त्याच कौशल्याने साधल्याने मुमूची शादी ही दैनिकांनाही विशेष महत्त्वाची बातमी म्हणून दखल घ्यावी इतक्या मोलाची जरुर झाली आहे. अनेकांच्या समोर वरमाला नाचवून आणि त्या त्या वेळी प्रसिद्धीचा झगमगाट स्वतःभोवती केंद्रीत करणाऱ्या मुमताझने अखेर मयूर मधवानी या लंडनला स्थायीक झालेल्या धनाढ्य उद्योगपतींची निवड केली आहे. (मयूरला मुमताझ पत्नी म्हणून मंजूर आहे. हा तुलनेने दुय्यम भाग) कोणा डॉक्टरशी विवाह केल्यावर पद्मीनी जशी कायमची निघून गेली तशीच मुमताझही जाणार आहे. तशी तिची घोषणा आहे. नवीन चित्रपट घेण्याचे तिने थांबविलेच आहे आणि हाती असलेले चित्रपट शादीचा जोडा चढवण्यापूर्वी म्हणजेच २९ मे पूर्वी पूर्ण करण्याचा तिचा विचार आहे. नटीची विवाहोत्तर निवृत्ती हा एक चेष्टेचा विषय. तसा तो तिच्या बाबतीत होईल असे वाटत नाही. कारण लंडनला स्थायीक होणार असल्याने मुंबईच्या ग्लॅमर पासून ती प्रत्यक्ष दूर रहाणार आहे.

' आलिंगन ' — जस्मीन फिल्मचे. रोमेश शर्मा आणि झहिरा





जखमीच्या सेटवर
सुनिल दत्त, जॉनी वॉकर
आणि परवेश

जितेंद्र–मुमताझच्या वावडीला ज्यावेळी धार होती त्या वेळी पती कसा असावा? या संबंधी मुमताझने पत्रकार मंडळींना सुनावले होते– माझा पती चित्रपट व्यवसायाशी संबंधित आहे की नाही ही माझ्या दृष्टीने गौण बाब आहे. दोनच गोष्टीच्या बाबतीत माझा कटाक्ष आहे– आर्थिक दृष्टया तो माझ्यापेक्षा संपन्न असलाच पाहिजे. आणि माझ्या भूतकाळासंबंधी त्याला फाजील उत्सुकता नसली पाहिजे– आता मुमताझने खिलाडी बदलला असला तरी हा नवीन खिलाडी तिच्या अपेक्षा पूर्ण करणारा आहे. उमेदीचा कलाकार निवृत्त झाला की केली जाणारी पोकळीची भाषा प्रचंड नवीन आवक पहाता मुमताझच्या संदर्भात फारशा गंभीरपणे करण्याचे कारण नाही. कधी काळी तिची याद आलीच तर देव–मुमुचा खुशबुदर 'तेरे मेरे सपने' पाहून सुखद स्मृतींची चवीने चर्चा करायला रसीक मोकळा आहेच.

## एप्रिल उजाडला

मराठी चित्रपट तयार झाले की– त्यांना थिएटर मिळवणे हे एक महादिव्य असते. आता सध्या परिस्थिती अशी आहे की थिएटर्स तयार आहेत. पण निर्मातेच एक एप्रीलचा मुहुर्त साजरा केल्या खेरीज चित्र देण्यास तयार नाहीत. मराठी मंडळींच्या रडगाण्याला कंटाळून– आणि महाराष्ट्र

टाईम्सच्या अग्रलेखीय सल्ल्याकडे दुर्लक्ष करून महाराष्ट्र शासन मराठी मंडळींच्या मदतीस धावले आहे.
योजना अशी की– मराठी चित्रपटाचे करमणूक करापासून जे उत्पन्न येते, त्यातील मोठा हिस्सा त्याच संस्थेच्या पुढील चित्रासाठी मदत म्हणून देण्यात यावा.
या योजनेची घोषणा महाराष्ट्राचे अर्थमंत्री नामदार मधुकरराव चौधरी यांनी केली. मात्र तयार चित्रांचे वितरण एकदम एक-एप्रील पर्यंत लांबले. कारण या योजनेचा लाभ एक एप्रील नंतर तयार होणाऱ्या चित्रांनाच मिळणार आहे. आणि या पर्वणीचा लाभ घेण्याइतपत शहाणपण मराठी निर्मात्याजवळ, वितरकाजवळ टिकून आहे.
योजनेचा तपशील अजून हाती आलेला नाही. तथापी मृतप्राय झालेल्या मराठी चित्रपट व्यवसायाला थोडेफार चैतन्य या सवलतीने जरूर लाभावे. ■

## अपनी अपनी पसंद
## हिंदोस्तान की कसम

'सध्या कोठचे पिक्चर चांगलं लागलंय ?' हिंदोस्तान की कसम. आमच्या इंग्लिश समीक्षकांनी 'कसम'ला झोडपले असले तरी ते काही खरे नाही. इंग्लिश टीकाकारांना हिंदी पिक्चर पहाताच येत नाही. कारण एक म्हणजे, हिंदी पिक्चरला स्टोरी असावी लागते हे त्यांना ठाऊक नाही. आणि दुसरं म्हणजे हिंदी पिक्चरमध्ये ऑथेंटीसिटी थोडीजरी आली तरी पुष्कळ झाले म्हणावे. पुष्कळ हिंदी युद्धपटात साधे गणवेशपण बरोबर नसतात. 'हिंदुस्थान की कसम'मध्ये पाकिस्तानी गणवेश पण करेक्ट आहे. राडारचे लक्ष चुकवण्यासाठी विमाने कमी उंचीवर आणावी लागतात आणि विमानाच्या छपराला कॅनॉपी म्हणतात इतकी या चित्रात ऑथेंटिसीटी आहे. पण या पिक्चरमधले खास आकर्षण म्हणजे विजय आनंदची भूमिका. विजय आनंदसारखा गहरा आवाज असलेला नट दुसरा नाही. अमिताभचापण दुसरा नंबर लागेल. विशेषतः तो गीतेचा उर्दुमधला तर्जुमा पेश करतो ना 'गिसम पैदा होते है–जिसम पन्हा होते है.' आपण एकदम स्वीप झालो ते ऐकता ऐकता. आणि विजय आनंद मेला ना त्यावेळी एकदम वाटलं आपल्या डोळ्यात कधी पाणी येत नाही पण यावेळी–

असं म्हणतात की 'कसम'चा घोस्ट–डायरेक्टर विजय आनंदच होता. असणारच. त्याशिवाय इतके चांगले चित्र कसे निघेल ? (दिग्दर्शक चेतन आनंद म्हणे आजारी होता). ■



रोमँटिक पेअर शाम प्रधान, अमीना करीम – 'रोमिओ इन सिक्कीम'मध्ये

# त्र्यं. सी. तथा अण्णासाहेब कारखानीस–जन्मशताब्दी

वि. भा. देशपांडे

[महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेतील एक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. भगवान पंडित यांच्याशी समक्ष बोलून आणि त्यांच्या जवळील कागदपत्रे पाहून त्या आधारे तयार केलेला हा लेख.]

त्र्यंबक सीताराम तथा अण्णासाहेब कारखानीस (जन्म १५ एप्रिल १८७४. मृत्यु ८ जाने, १९५६) यांची जन्मशताब्दी साजरी होत आहे. नाट्यक्षेत्रातील त्यांचा कर्तृत्वाचा काल १९०४ ते १९२०. नट, दिग्दर्शक, संस्थापक आणि नाटककार अशा बहुविध स्वरुपाची कामगिरी त्यांच्या हातून घडली. मूलतः त्यांचा पिंड शिक्षकाचा. ते दापोलीला शिक्षक म्हणून काम करीत होते. एक निष्ठावान, ध्येयवादी शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक होता. त्या काळात दापोलीतील राष्ट्रीय शाळेत स्वतःची मुले शिकण्यासाठी पाठवून मनातील राष्ट्रीय वृत्तीला त्यांनी प्रत्यक्ष रूप दिले. आचार्य स. ज. भागवत, आचार्य जावडेकर यांच्यासारख्या समाज आणि राष्ट्र चिंतकांच्या सहवासात त्यांनी अनेक गोष्टींचे मनन-अध्ययन केले. प्रो भानु, प्रो. पानसे, दाजी भावे यांचे मार्गदर्शन नाट्यसंस्था काढल्यानंतर त्यांना लाभले. या साऱ्या व्यक्तींच्या सहवासातून त्यांचे व्यक्तित्त्व आकाराला येऊ लागले. एक जीवनदृष्टी तयार झाली.

'महाराष्ट्र नाटक मंडळी' या नाटक कंपनीचे एकूण नऊ सूत्रधार होते. त्यामध्ये गोविंदराव टिपणीस, यशवंतराव टिपणीस, माधवराव टिपणीस आणि स्वत: अण्णासाहेब हे होते. त्या काळात सहकारी तत्त्वावर काढलेली ही पहिली नाटककंपनी म्हणून ओळखली जाते. ही नाट्यसंस्था उभारण्यासाठी अण्णासाहेबांनी प्रसंगी घरातील दागदागिने मोडले. संस्थेसाठी अन्य नोकऱ्यांची प्रलोभने दूर सारली. सर्वस्व पणाला लावून संस्था नावारूपाला आणली. संस्था सुरू करताना डोळ्यासमोर असलेले उद्देश स्पष्ट होते. लोकशिक्षण, लोकरंजन, आणि तत्त्वप्रचार यावर अधिक भर होता. त्याच्याच जोडीला नटांची नीतिमत्ता सुधारणे हाही भाग होता. ही संस्था केवळ नाट्यप्रयोग करण्यामध्येच गुंतून पडू नये अशीही खबरदारी अण्णासाहेबांनी घेतलेली होती. संस्थेला एक वैचारिक रूप असावे, अभ्यासाचे अधिष्ठान असावे या हेतूने त्यांनी ग्रंथालय निर्माण केले, निरनिराळ्या विद्वानांची व्याख्याने म. ना. मं. त आयोजित केली. या सर्व कार्याच्या मागे देशाभिमान आणि राष्ट्रीयवृत्ती सातत्याने होती. महाराष्ट्र नाटक मंडळीचे प्रयोग कोकणात मोठ्या प्रमाणात होत असत. त्याचबरोबर कर्नाटक आणि महाराष्ट्रातील इतरही भागात होत. त्यांच्या प्रयोगांवर कानडी, गुजराथीतून माहिती आणि अभिप्राय येत. लोक मोठ्या उत्साहाने प्रयोगांचे स्वागत करीत. गावात प्रयोग झाल्यावर नटमंडळींचा-व्यवस्थापकांचा सत्कार करीत. पंचमजॉर्जसाहेब एकदा मुंबईत आले असताना त्यांच्या स्वागतासाठी निरनिराळे देखावे करण्यात आले होते. अण्णासाहेबांनी कंपनीतर्फे शिवाजीच्या दर्शनाचा देखावा तयार केलेला होता. त्याला प्रदर्शन कमिटीतर्फे बक्षीस मिळालेले होते.

अण्णासाहेबांनी नाट्यप्रयोगातून फार मोठ्या स्मरणीय भूमिका केल्या असे नाही. परंतु ज्याकाही भूमिका केल्या त्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे एखादी भूमिका थोडक्या अवधीत ते सादर करीत. अशांपैकी काही भूमिका हंबीरराव (कांचनगडची मोहना), सखारामबापू (भाऊबंदकी), जयंत (प्रेमसंन्यास), दुर्जनसिंग (प्रेमध्वज) इत्यादी. स्वतःच्या कामासंबंधी त्यांनी अगदी काटकोरपणे परीक्षणवजा नोंद करून ठेवलेली आहे. गणपतराव भागवत हे नाटकमंडळीत नट आणि दिग्दर्शक म्हणून मान्यवर होते. भागवतांनंतर अण्णासाहेबांनी दिग्दर्शनाचे काम स्वतःकडे घेतले. बबंदशाही, सवतीमत्सर या नाटकांचे दिग्दर्शन त्यांनी केले. संस्थेमध्ये काम करीत असतानाच ते हौशी लोकांची नाटके दिग्दर्शित करीत असत. विशेषत: महाविद्यालयात जाऊन नाटके दिग्दर्शित करीत. पुण्याच्या एस्. पी. कॉलेजमध्ये आणि मुंबईच्या मेडिकल कॉलेजमध्ये त्यांनी काही नाटकांचे दिग्दर्शन केलेले होते.

'राजाचे बंड' आणि 'स्वैरिणी' ही अण्णासाहेबांची दोन नाटके. 'विधुरांची घरे' 'लक्ष्मी नारायण धनेश्वर', 'शिवसाफल्य' ही तीन नाटके मात्र प्रत्यक्षात येऊ शकली नाहीत. शिवाजीवरील नाट्यरचना आपल्या मनात कशी आहे ते त्यांनी के. नारायण काळे यांना पत्राने कळविले होते. त्यात त्यांनी म्हटले आहे, 'महाराष्ट्राच्या इतिहासातील शिवाजी नुसता रेखाटण्याची माझी इच्छा नसून, दृष्टीप्रमाणेच सर्व ज्ञानेंद्रियांना ग्रहण करता येईल व अर्वाचीन संस्कारयुक्त मनाला पटेल असा, रंगभूमीवरील दीपरेषेने भारलेल्या मर्यादित क्षेत्रात का होईना, पण बोलता चालता शिवाजी निर्माण करण्याची माझी इच्छा नव्हे महत्त्वाकांक्षा आहे.' अण्णासाहेबांनी व्यक्त केलेली महत्त्वाकांक्षा त्यांच्या प्रगत नाट्यदृष्टीची महत्त्वपूर्ण साक्ष आहे. त्यांनी नाट्यलेखन जरी अल्पसे केलेले असले तरी शॉ, गॉल्सवर्दी, इब्सेन इत्यादी नाटककारांच्या कलाकृतींचा अभ्यास वेधकपणे केलेला होता. स्वतःच्या लेखनापेक्षा इतर नाटककारांना मार्गदर्शन करणे हा त्यांचा स्वभावविशेष होता. विशेषत: गडकरी, वासुदेव शास्त्री खरे इत्यादी प्रथितयश नाटककारांशी त्यांची अनेकदा चर्चा होत असे.

'नाट्यमन्वन्तर' आणि 'महाराष्ट्रीय कलोपासक' या दोन संस्थांच्या स्थापनेमध्ये अण्णासाहेबांचा फार मोठा सहभाग होता. याच निमित्ताने के. नारायण काळे, अनंत काणेकर, भगवान पंडित, डॉ. प्रभुदास भुपटकर इत्यादींना अण्णासाहेबांचा, केशवराव दात्यांचा सहवास लाभला. त्यांचे विचारधन साठवता आले.

नट, नाटककार, दिग्दर्शक या त्यांच्या भूमिकांपेक्षा नाट्यशिक्षक आणि व्यवस्थापक हीच त्यांची प्रमुख भूमिका स्मरणीय राहील. आणि निर्मिती आणि सर्जन यापेक्षा पद्धतशीरपणा, शिस्त, संघटना, तंत्र आणि सुव्यवस्था ह्यात त्यांचे मन रमलेले होते. तोच त्यांचा स्वभाव बनलेला होता. त्यांच्या

पृष्ठ ३३ वर

मध्यंतर

# काठोकाठ भरू द्या प्याला

## मनोहर काटदरे यांचे नवे नाटक

'मनिषा कलामंदीर' या नाटचसंस्थेने 'घेतलं शिंगावर'चे कर्ते मनोहर काटदरे यांचे नवे नाटक 'काठोकाठ भरू द्या प्याला' गेल्या आठवड्यात रंगमंचावर आणले. 'घेतलं शिंगावर' प्रमाणे याही नाटकाचे दिग्दर्शन दामू केंकरे यांनी केले आहे.

वरवर पाहता हे नाटक रहस्यप्रधान वाटते. त्यातील सर्व प्रसंगांची गुंफणही त्याच धर्तीची आहे. परंतु खरे तर या नाटकाचे सूत्र मनोविश्लेषणात्मक आहे. एका स्त्रीची जीवनेच्छा चेतविण्यासाठी रचिलेले कपट-नाटक असेच या नाटकातील रहस्याचे स्वरूप आहे. रेखा-अविनाश हे तरुण प्रेमविवाहित जोडपे आणि रेखाची अल्लड बहीण मीना, ही या नाटकातील प्रमुख पात्रे आहेत. रेखा तरुण आहे, प्रेमळ आहे, परंतु लग्न झाल्यापासून ती आजारी आहे. या आजारातून आपण वाचत नाही असा तिचा समज आहे. इतकेच नाही तर आपल्या मृत्यूनंतर अविनाशने मीनाशी लग्न करावे असेही ती सुचवते. मीना आणि अविनाश तिला जपण्याचा प्रयत्न परोपरीने करीत आहेत, पण त्यांना यश येत नाही. अशावेळी अचानक रेखाला आपल्या जिवावर कोणी उठले आहे अशी शंका येते. रेखा जिवंत असतानाच तिच्या नावावरील बंगला मालकिणीच्या आकस्मिक मृत्यूमुळे विकायला काढल्याची जाहिरात तिच्या नजरेत येते. कोणीतरी तिचे पोर्ट्रेट आणून देते त्यावर तिचा मृत्युदिनांकही आहे. आपण फार दिवसांचे सोबती नाही असे, म्हणणारी रेखा मृत्यूच्या कल्पनेने कासावीस होते. साऱ्या शक्ती एकवटून आपल्या खुनाचा कट करणाऱ्यांशी सामना द्यायला सिद्ध होते. लग्नापासून ऋग्ण असणारी रेखा नावालाच अविनाशची पत्नी आहे. त्यामुळे तिला अविनाश आणि मीनाचा स्वाभाविक संशय येतो. आपला खून करून हे दोघे लग्न करणार अशी तिची खात्री होते. शेवटच्या अंकात ती 'मला जगायचंय' असे म्हणत असतानाच 'रहस्यनाटकाचा उलगडा केला जातो. या नाटचवस्तुरचनेतला एक मूलभूत दोष असा की मनोविश्लेषण शेवटी प्रेक्षकांना धक्का देण्यासाठी वापरले असल्यामुळे ते अधांतरी ठेवण्यात आले आहे. मुळातच नुकता प्रेमविवाह झालेल्या एका सधन तरुणीला असा आजार व आभास का होतो याचा विचार आणि आजारानंतरचे अविनाश-रेखाचे नाते, हे मनोविश्लेषणात्मक सूत्राला प्रस्तुत असे अनुभवखंड दुर्लक्षून नाटककाराने केवळ चतुर रचना पत्करली आहे.

दिग्दर्शक दामू केंकरे यांनी नाटकाचा प्रयोग चातुर्याने बसविला आहे. सुलभा देशपांडे यांनी रेखाची भूमिका उभी करताना नाटककाराच्या शब्दापलीकडे जाण्याचे आपले कसब पणाला लावले आहे. अलीकडच्या त्यांच्या भूमिकात खटकणारा तीव्र स्वरही इथे नव्हता की हातांचा अतिरिक्त वापरही नव्हता. संयत पातळीवर संवेदनाक्षमतेने त्यांनी ही भूमिका सादर केली. किंबहुना सुलभाबाईंच्यामुळेच या नाटकात प्रेक्षकांचे अवधान टिकते असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. मीनाच्या भूमिकेत अंजली दाते या तरुण नटीने सुलभाबाईंना चांगली साथ दिली. अल्लड वयाची मीना आणि अविनाशच्या कटात सामील झाल्यामुळे बावरलेली, गोंधळलेली मीना, ही त्या भूमिकेची दोन्ही स्वरूपे या नटीने कार्यक्षमतेने सादर केली. या मुलीची समज व रंगमंचावर वावरण्यातली सहजता यापूर्वीच्या तिच्या भूमिकातही दिसत होती. फक्त दिग्दर्शकाने व स्वतः नटीनेही तिच्या आवाजाकडे लक्ष पुरविणे अगत्याचे आहे. चटकन् किनरा होणारा हा आवाज रंगमंचावर त्रासदायक ठरण्याची खूप शक्यता आहे. तसेच हाताच्या कोपराचा एक विशिष्ट कोन अवघडलेपणे ठेवण्याची तिची लकबही स्थिर झाल्यास वाईट दिसणारी आहे. अरविंद देशपांडे बऱ्याच वर्षांनी, या नाटकातील 'नाना'च्या भूमिकेत रंगमंचावर दिसले; पण त्याच्या अभिनयाला या भूमिकेत फारसा वाव नव्हता. रमाकांत देशपांडे यांनी त्यांच्या नेहमीच्या कौशल्याने ज्योतिषाची भूमिका वठवली.

या नाटकाच्या सुव्यवस्थित प्रयोगात काही खटकले असेल तर अरूण जोगळेकरांचे संपूर्ण नटसमूहापासून आणि नाटचप्रयोगापासून अलग राहण्याचे कसब! एकतर ते नवशिक्या नटासारखे अवघडलेपणे वावरत होते. आपले लक्ष दुसरीकडेच कुठेतरी असल्यासारखे संवाद फेकीत होते. नाटकातील कपट नाटकामुळे त्यांनी गोंधळलेले असणे गोष्ट वेगळी आणि नट म्हणून रंगमंचावर वावरलेले असणे वेगळे! याच अरूण जोगळेकरांच्या 'पी डी. ए.' आणि 'नाटचद्वयी' मधील भूमिका अनेक मराठी प्रेक्षकांनी पाहिलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे या नाटकातले हे वागणे निराशाजनक तर होतेच पण उद्वेगजनकही होते.

यशवंत देवांसारख्या कल्पक संगीत दिग्दर्शकाला या नाटकात फारसा वाव नव्हता. आणि त्यांनीही समंजसपणे नाटकावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न न करता अत्यंत संयत पार्श्वसंगीत दिले आहे. एका सामान्य नाटकाचा प्रयोग, कुशल दिग्दर्शक आणि कसलेले नट लाभल्यामुळे रेखीव झाला. 'मनिषा कलामंदीर'सारख्या नव्या नाटचसंस्थेला मराठी नाटकी कुटुंबात आपले अस्तित्व सिद्ध करायचे असेल तर 'दोघी' वा प्रस्तुत नाटक यापेक्षा अधिक चांगल्या नाटचसंहितेची निवड करावी लागेल.

—पुष्पा भावे

# उलटी सुलटी अमेरिका

लेखक : **आर्ट बुकवॉल्ड**

अनुवाद : **अनंत भावे**

## □ माझ्या बायकोचा 'रोम'न्स

बायकोला रोमला नेली ही मुळातच माझी चूक झाली. कोणताही शहाणा अमेरिकन नवरा, बायकोला इटालीला नेत नाही; पहिल्या वेळी तर नाहीच नाही. पण इटालियन माणसांची कर्तबगारी मी जाणली नाही हेच खरे. ते तसे अवघडच असते म्हणा.

माझी बायको खरेदीचा कार्यक्रम आटपून हॉटेलवर परत आली. तिचा चेहेरा आनंदाने फुलला होता. आतून आतून तिला कसलीतरी गंमत वाटत होती.

मला त्याचे कारण समजायलाच हवे होते. म्हणून मी तिला विचारले : 'एवढी कसली गंमत वाटतेय तुला ?'

'अहो, आज किनई तीन इटालियन पुरुषांनी माझ्याशी चक्क भररस्त्यात चावटपणा केला.' ती म्हणाली : स्वतःवर ती भलतीच खूश झाली होती.

'एवढं काही फुशारून जायला नको त्यामुळं' मी तिला समज देत म्हणालो, 'ते लेकाचे प्रत्येक बाईशीच असा चावटपणा करतात म्हटलं.'

'उगाच काय काहीतरी' बायको म्हणाली, 'शिवाय, आपण एक स्त्री आहोत याची खरीखरी जाणीव करून देतात आपल्याला हे रोमन पुरुष.'

'तू स्त्री आहेस याची खरीखरी जाणीव मीसुद्धा करून देतो तुला' मी चिडून उद्गारलो.

'तुम्ही म्हणता मला कधी 'नीलनयन'?' तिने मला चिडवीत विचारले.

'नाही. पण त्याचं कारण स्पष्टच आहे. तुझे डोळे निळे नाहीच आहेत मुळी.'

'त्याचा काय संबंध ? इटालियन पुरुष खोटंच सांगत असतील तसं. पण म्हणून काय झालं ? किती छान खोटं बोलतात ते. मोठे मस्त आहेत हे इटालियन पुरुष.'

मी फार संतापलो होतो. पण संयम राखला आणि तो विषय सोडून दिला.

दुसऱ्या दिवशी, खरेदीचा कार्यक्रम आटपून बायको हॉटेलवर जेव्हा परत आली तेव्हा तिचा चेहेरा आदल्या दिवसासारखाच आनंदाने फुलला होता. आतून आतून तिला कसलीतरी गंमत वाटत होती.

'आता आजसुद्धा काय झालं आणखी ?' मी विचारलेच.

'अहो मी रस्ता ओलांडीत होते आज, तर त्या रहदारी सांभाळणाऱ्या पोलिसाने सगळ्या मोटारी रोखून धरल्या होत्या कित्ती वेळ.'

'व्वा. मोठंच सांगतेस. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडायला मिळावा म्हणूनच रहदारी सांभाळणारे पोलीस मोटारी रोखून धरतात. ते कामच आहे त्यांचं.'

'तसं नाही. मोटारींना जाऊ देणारा दिवा लागला होता; तरी त्या बहाद्दर पोलिसाने जाम रोखून धरल्या होत्या सगळ्या मोटारी. सगळ्या मोटारी मारे कर्णे वाजवीत कोकलत होत्या आणि अहो, मी रस्ता ओलांडीत होते तर त्या पोलिसाने हसून चक्क अभिवादन केलं मला. असं कधीच कुठल्या शहरात घडलेलं नाही माझ्या बाबतीत.'

'कसं घडेल ? नाहीच घडणार. कारण बहुतेक शहरात रहदारी सांभाळणारे पोलीस, लोकांचा जीव वाचवायचा प्रयत्न करतात' मी तावातावाने म्हटले, 'आणि रोमचा हा दीडशहाणा पोलीस अभिवादन करतो तुला ?'

'होयच मुळी. बायकांची काळजी घ्यावी ती इटालियन पुरुषांनीच' बायको ठासून म्हणाली.

एकूण बायकोचे प्रकरण कठीण झाले होते. दुसऱ्या दिवशी, ती बाहेरून आली तेव्हा मला तिची भीती वाटत होती. तिचा चेहेरा आपला आनंदाने फुललेला.

'आज काय झालं ते मीच सांगतो तुला' मी खवचटपणे म्हणालो, 'आज दुकानातल्या विक्रेत्यानं हिऱ्याचा हार भेट दिला असेल तुला : रोमची एक आठवण म्हणून होय ना ?'

'असं काही झालेलं नाही' ती म्हणाली, 'पण एका टॅक्सी ड्रायव्हरनं रात्री नृत्याला बोलावलंय मला.'

'अस्सं ? पण काय ग, इटालियन भाषा येते तुला ? रात्री त्यानं तुला नृत्याला बोलावलंय हे कळलं कसं तुला ?'

'त्यात काय ? त्याने दोन्ही हात वर करून कोणाला तरी कवटाळण्याचा अभिनय केला आणि गाण्याची लकेरही गुणगुणला तो.'

'यात एवढं विशेष ते काय झालं ?'

'विशेष हे की हे सगळं करताना टॅक्सी भरधाव चालूच होती म्हटलं.'

यावर काही बोलणे शक्य झाले नाही मला. म्हणून मी आपला उठून खोलीतून बाहेर जाऊ लागलो. ते पाहून बायको उसळून म्हणाली, 'तुम्ही अगदी दुष्ट आहात. इथं प्रत्येकजण किती चांगला वागतोय माझ्याशी. आणि तुम्ही मात्र नसती खुसपटं काढीत बसता. तुम्हा अमेरिकन पुरुषांना स्त्रियांचं कौतुक कसं करावं ते जन्मात कळणार नाही कधी.'

'न कळू दे. स्त्रियांचं कौतुक करणाऱ्या माझ्या एका चुलत भावाचं काय झालं माहीत आहे ?' मी आवेशाने म्हणालो, 'न्यू यॉर्कमध्ये रस्त्यावरून चालणाऱ्या एका पोरीजवळ जाऊन हे राजश्री तिला म्हणाले : 'तुझ्यासारखी टंच पोरगी पाहिली नाही मी कुठे' आणि आता वीस वर्षं बसलेत तुरुंगात खडी फोडीत. तेव्हापासून, कोणाबद्दल काहीही वाटलं तरी ते आपलं मनातल्या मनातच ठेवतो मी.'

□ □

भारतकुमार राऊत

# मिनी लॉटरी जिंदाबाद



तुम्ही काहीही म्हणा पण आपलं सरकार एकूण ग्रेटच. मला माहीत आहे की, या वाक्यावर तुम्ही नाकं मुरडणार. मला सरकारचा चमचा म्हणणार. पण आपलं मत कायम आहे. आमचं सरकार ग्रेट म्हणजे ग्रेटच. तर अशा या ग्रेट सरकारचे नेते वसंतराव नाईक. राज्याचं दैव थोर म्हणून या थोर मुख्यमंत्र्याला साथीदारही एकाहून एक थोर मिळाले आहेत. इतके की, नाईका-नंतर या थोर-अतीथोर मंत्र्यांपैकी कुणाला मुख्यमंत्रीपद द्यावं याबाबत आपल्या थोर इंदिराजींना सुद्धा चिंता पडली आहे.

असो, तर सांगायचा मुद्दा असा की, अशा या थोर मंत्रीमंडळातले मधुकरराव चौधरी हे सुद्धा एक थोर मंत्री. त्यातून अर्थखात्याचे. हा माणूस फार कल्पक. म्हणजे काय आहे, साने गुरुजींच्या सहवासास राहिल्यानं समाज-सेवेचं आणि कल्याणाचं बाळकडू प्यालेले. साहाजिकच समाजाच्या हिताचं जे काही करता येईल ते ते करायचं, असा यांचा बाणा. मागे शिक्षण आणि वनखात्याचे मंत्री असताना (शिक्षण आणि वनखाते एकाच मंत्र्याच्या हातात देण्यात काय प्रयोजन आहे, ते ठाऊक नाही) चौधरी गुरुजींनी शिक्षण विषयक एक श्वेतपत्रिका काढली. महाराष्ट्रात जशी हरितक्रांती (!) होऊ घातली आहे तशाच प्रकारची क्रांती शिक्षण क्षेत्रात या श्वेत पत्रिकेमुळे होणार होती म्हणे. पुढे त्याचं काय झालं कोण जाणे. नंतर निवड-णुका आल्या. नको नको म्हणत असताना मधुकररावांना बळेच तिकीट देण्यात आलं. साहाजिकच ते निवडून आले. (त्यांचा प्रति-स्पर्धी जनसंघी उमेदवार काही दिवस बेपत्ता होता म्हणे) मग त्यांना बढती मिळाली. मधुकरराव अर्थमंत्री झाले. असो.

तर, हा इतिहास उगाळण्याचं कारण मधुकररावांची कल्पकता. ते अर्थमंत्री पदावर आले, त्यावेळी राज्यात लॉटरी, मुदतपूर्व लॉटरी चालूच होती. पण जनतेला महिन्या-तून फक्त तीनदाच पैसे मिळावेत हे काही समाजवादाच्या सच्च्या भक्तास सोसवेना. राज्यातल्या गरीब जनतेला रोज पैसा मिळाला पाहिजे, ते श्रीमंत झाले पाहिजेत, अशी साने गुरुजींच्या या कडव्या शिष्याची धारणा. तर याकरिता त्यांच्या कल्पक मेंदूतून एक नितांतरम्य अशी महान शक्कल निघाली. 'मिनी लॉटरी!' बस्स. दर एक दिवस आड सोडती. मग काय गरीब जनतेला पैसाच पैसा. समाजवादाची पालखी वाहा-णाऱ्या या मंत्र्याचं मन तृप्त झालं.

मुंबईमध्ये 'मिनी लॉटरी'ची प्रायोगिक योजना एक मार्च पासून सुरू होत असल्याची घोषणा विधान सभेत झाली. सरकारनं मिनी लॉटरी काढली. दर एक दिवस आड सोडती निघू लागल्या. एक हजार रुपये आणि पाचशे, शंभर आणि दहा रुपयांची तिकिटे ठेवण्यात आली आहेत. प्रत्येक वेळी दोन मालिका काढण्यात येतात. म्हणजेच दर एक दिवस आड सरकार ४२२४ बक्षिसे वाटते. यामुळे बक्षिसाद्वारे शासनाकडून जन-तेला ७४ हजार रुपये मिळतात.

नामदार मधुकररावांचा यात केवळ जन-तेला दर दिवसा आड ७४ हजार रुपये मिळावेत इतकाच हेतू नाही. राज्यात सध्या मटक्याचं प्रस्थ वाढलेलं आहे, त्याला पुरेपूर आळा बसावा अशी ही या मागची कल्पना आहे. आहे की नाही आमचं सरकार ग्रेट! सध्याचं आपलं समाजवादी राजकारण चालू असल्यानं जास्तीत जास्त उद्योग प्रायव्हेट सेक्टरमधून पब्लिक सेक्टरमध्ये आणण्याचं

धोरण आहे. त्याला अनुसरूनच प्रायव्हेट सेक्टरमधला ' मटका ' जुगार नामशेष व्हावा या हृद्य हेतूनं सरकारनं हा सरकारी मटका किंवा मिनी लॉटरीचा उद्योग सुरू केला असावा.

सरकारी अधिकाऱ्यांच्या मते या मिनी लॉटरीला जनतेकडन प्रचंड पाठिंबा मिळाला. ज्या अर्थी जनतेचा प्रचंड पाठिंबा मिनी लॉटरीला मिळाला त्या अर्थी अर्थमंत्र्यांच्याच तर्कशास्त्राप्रमाणे मटक्याला प्रचंड तडाखा बसायला हवा होता. म्हणून तिथं चौकशी केली तर मटकाही प्रचंड प्रमाणात चालू आहे. असो. जनतेला भरपूर पैसा मिळवून देणारे गव्हर्नमेंट आणि प्रायव्हेट सेक्टरमधले हे दोन्ही समाजवादी उद्योग एकमेकावर कुरघोडी न करता सुखात चालू आहेत, हे पाहून माझ्या समाजवादी मनाला संतोष वाटला.

या योजनेमुळे सरकारला फायदा किती ? तर रगड. दर सोडतीची सरकार दोन दोन लाख तिकिटं छापते. ती सर्व विकली गेली तर नगद दोन लाख रुपयांचा गल्ला जमणार. त्यापैकी ७४ हजार रुपये बक्षिस वाटण्यात जाणार. लॉटरीचे व्यवस्थापन आणि रेडिओ तसेच वर्तमान पत्रातल्या जाहिरातीकरता सव्वीस हजार रुपये जरी बाजूला काढले तरी दर एक दिवसआड सरकारकडे एक लाख रुपये जमा. म्हणजे महिनाभरात पंधरा लाख रुपये. आता ही रक्कम जाणार कुठे ? हा नतद्रष्ट प्रश्न तुमच्या मराठी मेंदूत निर्माण झाला असणार याची मला कल्पना आहे. माझ्याही मेंदूत हाच प्रश्न उगवला होता. पण लगेच विविध भारतीवर ऐकलं ' आपल्या आणि राज्याच्या विकासाकरता महाराष्ट्र शासनाची मिनी लॉटरी ! टिंग-टाँग. ' आलं ना लक्षात. आता आपला विकास कोणता ? आणि राज्याचा विकास कसा होणार ? असले भलते प्रश्न मनात आले तरी विचारू नका. कारण समाजवादी समाज रचनेच्या राज्यात असले प्रश्न विचारायचे नसतात.

तर या ' मिनी लॉटरी 'च्या कल्पनेबद्दल आपल्या कल्पक अर्थ मंत्र्यांची मी मनातल्या मनात दृष्ट काढीत असतानाच काही अर्थतज्ज्ञांची मतं ऐकायला मिळाली. एका अर्थविषयक प्राध्यापकाच्या मते ' सरकारने हा चक्क खिसेकापूचा धंदा सुरू केला आहे. ' आपल्या या दणदणीत विधानाचं स्पष्टीकरण करताना हा अर्थशास्त्रज्ञ म्हणतो की, 'मुळात लॉटरी काढूनच सरकारनं जनतेला श्रमवादाकडून दैववादाकडे नेलं आहे. त्यातून पूर्वी काळात तीनदा लॉटरी असल्याने सामान्य माणसाचे—की जो नेहमीच दैववादी असतो—महिन्याला फक्त तीन रुपये जात. आता या तीन रुपयांखेरीज आखणी पंधरा रुपये जाणार आहेत. म्हणजेच महिना अठरा रुपये तो केवळ दैववादाकरता घालवणार. आधीच आपला देश मागासलेला. निरक्षर. त्यात सरकारनंच अशा लॉटऱ्या सुरू केल्या तर जनतेचा पैसा अशा ठिकाणी गुंतत जाईल. यामुळे शासनाला पैसा मिळणार असला तरी जनतेचे मात्र अप्रत्यक्षपणे फारच नुकसान होणार आहे. '

लॉटरी विक्रेत्यांच्या मते मिनी लॉटरीची योजना चांगली आहे पण तिकिटाची किंमत पन्नास पैसे केली तर अधिक चांगलं होईल. एक विक्रेता म्हणाला की मासिक आणि मुदतपूर्व लॉटरीच्या वेळी आम्ही दिवसेंदिवस रस्त्यावर दुकानं मांडून बोंबलत असतो पण लॉटरी फुटायच्या आदल्या दिवशीच पब्लिक तिकिट घ्यायला गर्दी करतो. ' मिनी लॉटरी दर एक दिवस आड फुटणार असल्यानं पब्लिकचं आकर्षण कायम रहाण्याची शक्यता आहे.

असो. तर मिनी लॉटरीची कहाणी एकंदर अशी आहे. सध्या प्रायोगिक अवस्थेत असलेली ही योजना सरकार बहुतेक परमनंट करील. म्हणजे मिनी लॉटरी मॅक्सी व्हायला वेळ लागणार नाही. यामुळे जनता नागवली जाईल वगैरे ते फडतूस अर्थतज्ज्ञ खुशाल बरळोत. आपण या ' मिनी 'वर बेहद्द खूश आहोत. ही मिनी लॉटरी काढून आमच्या थोर मंत्र्यांनी, सरकारकडे चांगल्या योजना नाहीत असा बिनबुडाचा आरोप करणाऱ्याचं तोंड बंद केलं आहे. आमचं सरकार ग्रेट आहे. आमचे मंत्री थोर आहेत. □

# वेटिंग फॉर गोदो — एक अनुभव

आता पुण्य भावेंच्या क्षेत्रात थोडंसं अतिक्रमण. त्याचं काय झालं, बोअर होण्याचा जो परमोच्च बिंदू असतो ना तो मला नुकताच अनुभवायला मिळाला. आता मोजमापाच्याच भाषेत बोलायचं तर विधान परिषदेत ग. प्र. प्रधानांच्या अर्थसंकल्पावरच्या भाषणाच्या वेळीही मी जितका बोअर झालो नव्हतो, तितका या वेळी झालो. आता फटकन सांगून टाकायचं म्हणजे मी ' वेटिंग फॉर गोदो ' पाहिलं. आता तुम्ही म्हणाल, इंग्रजी नाटक पाहून बोअर नाही होणार तर काय होणार ? मंडळी, मला तुमची शंका कळली. पण नाटकाचं नाव जरी अखंड आंग्ल भाषेत असलं तरी नाटक मात्र मी जागा होतो तोपर्यंत मराठीतच चाललं होतं.

तर ' वेटिंग फॉर गोदो ' हे यंदाच्या राज्य नाट्यस्पर्धेत पहिलं आलेलं नाटक. हैद्राबादच्या कुठल्याशा संस्थेनं सादर केलेलं. रंगभवनला या नाट्यस्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. यावेळी या नाटकाचा प्रयोग करण्यात आला. दुर्दैवानं तो पहाण्याचं आमच्या नशिबी आलं म्हणून हे वाचण्याचं तुमच्या नशिबी आलं. म्हणजे तशी ही आपत्ती मी आपणहून ओढवून घेतली. मराठी रंगभूमीवरची एक अभिनय सम्राज्ञी (असतात एकेकाची मतं) माझी चक्क मैत्रीण आहे. आपल्यामध्येही नाट्यकलेविषयी आस्था किंवा गोडी वगैरे आहे हे दाखवण्याकरता मी नाटकाला गेलो. रंगभवनपर्यंत पोहोचलो इतक्यात लाल दिवा लुकलुकणारी एक ॲम्बॅसॅडर आडवी गेली, तेव्हाच मनात शंका आली होती. कारण मांजर आडवं जाणं आणि मंत्र्यांची मोटार आडवी जाणं जवळ जवळ सारखंच. असो. तर प्रतिभा पाटील निघून गेल्या. त्यांचं प्रयाण आणि आमचं आगमन एकाच वेळी झालं.

बराच वेळ काव काव झाल्यानंतर तिसरी घंटा एकदाची वाजली. आम्ही स्थानापन्न झालो. कुठलं तरी महान नाटक बघायला मिळणार म्हणून मी पॉपकॉर्न भराभर संपवीत होतो. पडद्यामागून आवाज येऊ लागला.

अनीसर पहिल्याच शब्दाला अडखळला. मग जवळजवळ पाच मिनिटं न थांबता तो काही तरी बरळत होता. त्यापेक्षा दिल्लीच्या दत्ता कुलकर्णीच्या बातम्या ऐकणं बरं असं वाटलं. शेवटी तेही संपलं आणि पडदा उघडून स्टेज दिसू लागले. हल्ली हिप्पी घालतात तसे चट्टेरी पट्टेरी ठिगळंवाले कपडे घातलेला एक माणूस बूट काढण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याचं नाव 'गोदो' हे नंतर कळतं. नंतर आणखी एक तसलाच पण दाढीवाला येतो. त्याचं नाव आता आठवत नाही. हे दोघेजण बराच वेळ बोलतात म्हणजे नुसतंच बोलतात. मध्येच सर्कशीसारख्या कसरती करतात. हे दोघेजण 'गोदो'ची वाट पहात असतात. पहिल्यांदा त्यांचे संवाद मजेदार वाटत होते. पण हळूहळू बोअर होऊ लागलो. इतक्यात गुलामाला घेऊन 'पोझो' नामक माणूस स्टेजवर प्रवेश करता झाला. नाटकात जरा रंग भरेल असं वाटलं. पण छे. पुन्हा संभाषणं सुरू झाली. पहिला अंक संपण्याची वाट पाहू लागलो. पण आमच्या अभिनय सम्राज्ञी मैत्रिणीकडून समजलं की, या नाटकाला दोनच अंक आहेत. म्हणजे मध्यंतराला बराच वेळ होता. एक मोठी जांभई. आता मागे पब्लिक अगदी फॉर्मात आलं होतं. शिट्या आणि टाळ्या मधून मधून येत होत्या. माझी झोप मात्र फुकट डिस्टर्ब होत होती. शेवटी झोपही धड येईना आणि नाटकही बघवेना. बघवेना म्हणण्यापेक्षा समजेना. म्हणून आम्ही दोघांनीही मध्यंतरानंतर सभात्याग करण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला. शेवटी मध्यंतर झालं आणि आम्ही 'हे नाटक आम्ही सोडून तमाम प्रेक्षकांना सुखाचं जावो' असं म्हणत प्रस्थान ठेवलं.

हे नाटक फारच फिलॉसॉफीकल. जीवनातल्या आशा-निराशेचा खेळ. पुन्हा आशावादाचा होणारा विजय वगैरे नाटकात दाखवलं आहे असं आमच्या मैत्रिणीनं सांगितलं. पण एकंदर नाटक पाहून मला तरी तो सारा निराशेचाच खेळ वाटला. नाटकातली पात्रं उत्तम अभिनय करीत होती. पण एकंदर नाटकातच चांगली झोप लागण्याइतकासुद्धा दम नव्हता. असो. तर नाटकाची इतर गुणवैशिष्ट्ये वगैरे क्लिष्ट बाबींवर पुष्पाबाई यथाकाल लिहितीलच. पण राज्यस्पर्धेत हे नाटक पहिलं कशामुळं आलं, याचा मला तरी उलगडा झाला नाही. बाकी आपलं सरकारच थोर. त्यामुळं इथं काही झालं तरी आश्चर्य नाही. पण अशा नाटकांना पारितोषिकं देऊन नाट्यकलेला उत्तेजन मिळणं मात्र शक्य नाही.

या सगळ्या रामायणाचा क्लायमॅक्स म्हणजे, ही समस्त बोअर कथा दुसऱ्या दिवशी मी आमचे एक समीक्षक मित्र अवधूत परळकर, जे 'माणूस'मध्ये सत्यजित रे आणि मृणाल सेनच्या चित्रपटांबद्दल लिहितात त्यांना सांगितली. त्यावर चेहरा शांत ठेवून ते म्हणाले की, तुम्ही बोअर झालात, यातच त्या नाटकाचं यश आहे. कारण प्रेक्षकाला बोअर करणं हाच या नाटकाचा हेतू आहे. मी अक्षरशः उडालो. असं जर असेल, तर खरोखरच हे नाटक एक हजार टक्के यशस्वी ठरलं आहे. 'वेटिंग फॉर गोदो' जिंदाबाद ! नवनाट्य जिंदाबाद !!

□ □

# भेसळविरोधी प्रदर्शनाच्या निमित्ताने....

गेल्या सोमवारी विधान भवनाच्या परिसरात अन्नधान्य भेसळ विरोधी प्रदर्शन महाराष्ट्र शासनाच्या अन्न आणि औषध प्रशासनातर्फे भरवण्यात आले. विधान भवनाच्या परिसरात ते भरवले गेल्यामुळे, सामान्य जनतेला ह्या प्रदर्शनापासून काहीच लाभ उठवता आला नाही. तथापी नीटस मांडणीनं छोटेखानी असं भेसळ विरोधी प्रदर्शन विधान भवनात ज्यांनी पाहिलं, त्यांना भेसळीच्या प्रश्नाची तीव्रता सहज जाणवावी एवढं यश त्या प्रदर्शनाला निश्चित मिळालं असावं. निदान मिळायला हरकत नव्हती असं मला वाटतं. ह्या प्रदर्शनाच्या जागीच एक शेरा-बुक प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांच्यासाठी उपलब्ध होतं. काही विरोधी आमदार, काही पत्रकार आदी मंडळींचे जे शेरे, हे पुस्तक चाळताना मला आढळले त्यावरूनही मला असं वाटतं की, प्रदर्शन मी वर सांगितलेल्या दृष्टीने यशस्वी निश्चित झाले आहे. बहुसंख्य आमदारांनी, प्रेक्षकांनी "अरे बापरे" सारखे काढलेले उद्गार मी ऐकले. शेरा पुस्तकात, बहुतेकांचा सूर एकत्र आढळला," असं प्रदर्शन (किंवा हेच प्रदर्शन) सर्वसामान्य जनतेसाठी, खेड्याखेड्यातून फिरवलं पाहिजे !" विधान भवनातल्या प्रदर्शनाला मिळालेले हे शेरे हेच त्याचं यश होतं !

ज्या पद्धतीनं प्रदर्शन विधान भवनात भरवलं गेलं तशा पद्धतीनं ते सर्वत्र फिरवलं गेलं पाहिजे ह्यात वादच नाही. तसं झालं तरच भेसळी विरुद्ध सामान्य जनतेच्या पातळीवर एक परिणामकारक आंदोलन उभारणं शक्य होणार आहे. अन्यथा, जनतेचं भेसळीच्या प्रश्नावर लोक-शिक्षण होऊ शकणार नाही. आणि लोकशिक्षणाशिवाय जनआंदोलन उभं राहू शकणार नाही. महाराष्ट्र शासन आणि त्याचं अन्न आणि औषध प्रशासन ह्यांच्या जोडीनंच मराठी विज्ञान परिषद, विविध महिला संस्था आदींनी देखील अशा तऱ्हेचं लोकशिक्षणाचं कार्य करून, भेसळी विरुद्ध तीव्रतर जनआंदोलन उभारायला हरकत नाही. सरकार भेसळ करणाऱ्याविरुद्ध आवश्यक ती कडक कारवाई करीत नाही, ही आपली बहुतेक नेहमीची ओरड. तीत काही तथ्यही आहे यात वाद नाही. सरकारी दूध, एकाधिकार खरेदीतून पुरवली जाणारी धान्यं, सरकारमान्य धान्य दुकानातून मिळणारं रेशन– या साऱ्यातही अनेकदा भेसळ आढळते. तशा तक्रारी प्रत्यही येत असतात. आता सरकारी कारभारातूनच अशा तक्रारी येऊ लागल्यावर, भेसळ करणाराचे हात कुठपर्यंत पोचलेले आहेत याची थोडीशी कल्पना येऊ शकते ! हे सगळं खरं असलं आणि सरकार भेसळ करणाऱ्याविरुद्ध आवश्यक ती भक्कम पावलं उचलीत नाही हेही गृहीत धरलं, तरी सुद्धा सरकारच्या वरील उपक्रमाचं स्वागत व्हायला

हरकत नाही. किमान त्यातून लोकशिक्षण तर होईलच, पण त्याच बरोबर भेसळविरोधी जे सर्वगामी आंदोलन उभं राहाणं आज आवश्यक आहे त्यालाही चालना मिळेल !

हे लहानसं प्रदर्शन सुंदर अशा अनेक चित्रांनी नटवलेलं आहे. " अन्न धान्य भेसळ– एक ज्वलंत समस्या " अशा भल्या मोठ्या आकर्षक पाटीवर खिळलेली दृष्टी सोडवून घेऊन आत प्रवेश करताच दिसतात तीन त्रस्त स्त्रिया– एक अतिशय पुढारलेल्या वर्गातली, दुसरी मध्यम वर्गातली व तिसरी ग्रामीण ! भेसळीनी त्या तिघींनाही अगदी त्रस्त करून सोडलेलं आहे. ह्या नंतर अनेक चित्रांवाटे व त्याखालच्या मजकुराच्या वाटे, भेसळीच्या ज्वलंत समस्येचं यशस्वी चित्रण झालेलं दिसून येतं. ह्यात मध्येच एक मोठा फलक दिसतो– " अन्न हे परब्रह्म ! (भेसळ नसेल तेव्हाच ! )"

ह्या मोठ्या फलकाद्वारे प्रदर्शनकारांनी बरंच काही साधलं आहे असं मला वाटतं. जवळ जवळ प्रदर्शनाच्या शेवटी, एका दूधवाल्याचं दुकान दाखवलं आहे. " दुधात पाण्याचा अंश नाही."

अशा मजकुराखाली " असे फलक दुकानादुकानातून आढळतील तो सुदीन " असा मथळा टाकला आहे. हेही एक उल्लेखनीय चित्र आहे...

ह्या चित्रांखेरीज भेसळ युक्त पदार्थही या प्रदर्शनात पाहायला मिळतात. भेसळीसाठी वापरण्यात येणारे रंग, इतर विविध प्रकार, दालचिनीऐवजी मिळणारे लाकडी तुकडे वगैरेही पाह्यला मिळतात. त्याचबरोबर ही भेसळ ओळखायची कशी, प्रयोग कसे करायचे त्यासाठी कुठली साधनं वापरायची ह्याचीही प्रात्यक्षिकं ह्या प्रदर्शनात पाह्यला मिळतात. प्रात्यक्षिक, चित्रं भेसळीचे विविध नमुने आणि भेसळ करणारासाठी वापरात आणल्या जाणाऱ्या पदार्थांचे नमुने, ह्यामुळे हे प्रदर्शन अत्यंत शैक्षणिक बनलं आहे. चित्रांची व वरील वस्तुंची मांडणी आणि चित्राखालचा मजकूर ह्यामुळे हे प्रदर्शन तितकंच मनोरंजकही आहे. ज्वलंत समस्येचा हा गंभीर विषय एका सरकारी यंत्रणेने हलक्या, फुलक्या, नेटक्या आणि सर्वसामान्यांना समजेल अशा पद्धतीने हाताळला आहे हा ह्या प्रदर्शनाचा मोठा विशेष ! अत्यंत सुटसुटीत आणि छोटेखानी असल्यामुळे हे प्रदर्शन कुणालाही जड होणार नाही, व म्हणून ते शैक्षणिक दृष्ट्या जास्त योग्य ठरू शकेल !

जसं गावागावातून हे प्रदर्शन फिरवलं जावं असं अनेकांना वाटतं, तसंच ते शाळाकॉलेजातूनही फिरवलं जावं असं मला वाटतं. भेसळीच्या प्रश्नाचं गांभीर्य विद्यार्थ्यांवर जितक्या सहजतेनं ठसवता येईल तितकं ते मोठ्यांच्या मनावर ठसवता येणार नाही. आणि हा विद्यार्थी भेसळीविरुद्ध अधिक परिणामकारक आवाज उठवू शकेल ह्याची मला खात्री वाटते. चीड त्याच्या मनात लौकर निर्माण होते; आणि भेसळीविरुद्धची चीड एकूणच समाजात जेवढी जास्त निर्माण करता येईल तेवढी ती भेसळीविरुद्धच्या कामी येईल ! चिडलेला विद्यार्थी काय करू शकतो याचं ताजं उदाहरण गुजरात आहे ! इथे भेसळीविरुद्ध त्याची चीड संघटित केली गेली तर भेसळीचा राक्षस जाळून टाकणं ह्या विद्यार्थ्याला अशक्य नाही. शाळा-कॉलेजातून हे किंवा असं प्रदर्शन दाखवताना, स्लाईडस व भाषण असा प्रयोग केला तर तो आणखी जास्त फायद्याचा ठरेल !

प्रदर्शनात एवढा सगळा चांगला भाग असला तरी काही त्रुटीही होत्या. मुख्य म्हणजे, औषधातल्या भेसळीला ह्या प्रदर्शनात स्पर्शही करण्यात आलेला नाही. 'औषधात भेसळ अजिबात नाही असा आमचा चॅलेंज आहे' हा औषधाचा आणि अन्न प्रशासनाचा दावा ! असेलही कदाचित तसे, पण तरी देखील, कुणालाही हा प्रशासनाचा दावा अतिशयोक्ती पूर्णच वाटणार यात शंका नाही. तेव्हा औषधात कशा पद्धतीने भेसळ होऊ शकते, त्याचे दुष्परिणाम काय ह्याचंही चित्रण प्रदर्शनात हवं होतं. त्याचप्रमाणे केवळ अन्न धान्य व औषधातच नाही, तर इतरही प्रत्येक पदार्थात आज भेसळ असते. सिमेंट, क्रूड ऑईल, पेट्रोल, केरोसीन प्रत्येक पदार्थात आज भेसळ असते. तिचाही सामान्य जनतेशी या ना त्या प्रकाराने संबंध येत असतो, त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. सिमेंट मधल्या भेसळीमुळे त्याच्या राहत्या घरांना तडे जातात. केरोसीनमधल्या भेसळीमुळे त्याच्या जळणाचा खर्च वाढतो. सौंदर्य प्रसाधनातल्या भेसळीतून त्वचेचे रोग उद्‌भवण्याची शक्यता असते. खतांमधल्या भेसळीतून अन्नधान्याच्या उत्पादनावर,त्याच्या गुणवत्तेवर परिणाम होऊन त्याचे परिणाम अनिष्ट होऊ शकतात. जनावरांच्या खाद्यांच्या भेसळीमुळे ह्या जनावरांपासून मिळणाऱ्या दुधातून विषबाधाही होऊ शकते. अन्न धान्यातल्या भेसळीमुळे जगण्याचाच प्रश्न कधी मधी उत्पन्न होतो व त्यामुळे त्या विरुद्धचं युद्ध सर्वंकष झालं पाहिजे हे खरं असलं तरी त्या बरोबरच, इतर पदार्थामधल्या भेसळीही माणसाच्या दैनंदिन जीवनात घातक ठरतात हे जाणलं पाहिजे व त्या दृष्टीनेही सार्वत्रिक प्रयत्न व्हायला हवे. अन्न आणि औषध प्रशासनाने हा दृष्टिकोण स्वीकारलेला आहे असं ह्या प्रदर्शनावरून तरी वाटत नाही !

ह्या प्रदर्शनात, भेसळ कशी ओळखावी ह्या विषयींच्या प्रयोगांबाबत मार्गदर्शन करायचा प्रयत्न केला आहे. सध्याचे दिवस टंचाईचे आहेत. आज हे नाही, उद्या ते नाही, अशा अवस्थेत, कुठून तरी आवश्यक धान्य उपलब्ध करून स्वयंपाकघर चालवायचं असा प्रकार घरच्या गृहिणीच्या बाबतीत असतो. ह्या पार्श्वभूमीवर, आलेला पदार्थ तिनं तपासावा, भेसळीची शंका आल्यास बाजूला ठेवावा, (तोही पावतीसह ! ) ह्या अपेक्षा या गृहिणीकडून बाळगणं जरा कठीणच ! तेव्हा ह्या बाबतीत काही अधिक सोपा मार्ग प्रशासनानं सुचवायला हवा होता. मला वाटतं, प्रत्येक दुकानावर सक्ती करून गृहिणीचे हे कष्ट वाचवता येतील. गृहिणीने हे कष्ट उचलून भेसळ ओळखून काढायला माझी हरकत नाही. परंतु जे जीवन मी प्रत्यही न्याहाळतो, त्यात तिनं असे प्रयोग घरी करणं निदान मला तरी शक्य–व्यवहार्य वाटत नाही. त्याऐवजी प्रत्येक दुकानातून प्रत्येक पदार्थ तपासून मिळण्याची सोय करवून घेणं अधिक व्यवहार्य ठरेल. साध्या साध्या भेसळी घरातून गृहिणीने ओळखून काढायची जी अपेक्षा आपण धरतो, ती तिच्याऐवजी दुकानदाराकडून धरणं जास्त श्रेयस्कर ठरेल. अशा तऱ्हेच्या प्रयोगांसाठी साधनं स्वतःजवळ ठेवणं गृहिणीपेक्षा त्याला जवळ जवळ काहीच जड जाणार नाही ! ज्या खरेदीदाराला मालाविषयी शंका येईल त्याला प्रयोग करून दाखवून त्यांचं समाधान दुकानदारानं केलं पाहिजे. एवढी सक्ती दुकानदारावर सहज करता येईल. बॅटरीचे सेल्स घेताना ते टेस्ट करून दुकानदार देतो. विजेच्या बल्बबाबतही तोच मार्ग दुकानदार चोखाळतो. लहान मुलांची खेळणी चालवून दाखवून गिऱ्हाईकांचं समाधान बहुतेक दुकानदार करतात. भेसळीबाबतही असाच प्रयोग करायला हरकत असू नये. भेसळीची गूढ वा मोठी प्रकरणं जिल्ह्यातल्या वा अन्य विभागीय प्रयोगशाळांकडे जावीत, पण छोटी प्रकरणं व सुरुवातीची दक्षता खरेदीच्या वेळीच घेतली गेली, तर पावती सांभाळण्याचे तक्रार करण्याचे, तक्रार सिद्ध करण्याचे पुढचे सव्यापसव्य टाळता येतील असं मला वाटतं. हा प्रयोग प्रशासनाने, विरोधी पक्षांनी, महिला–विद्यार्थी संघटनांनी सरकारवर दडपण आणून राबवायचा प्रयत्न करून पाहावा असं भेसळविरोधी प्रदर्शनाच्या निमित्ताने मला जरूर वाटतं !

–प्रतिनिधी

# पाँपीदूंच्या निधनाने फ्रान्सपुढे प्रश्नचिन्ह

वा. दा. रानडे

फ्रान्सचे अध्यक्ष जॉर्जेस पाँपीदू यांच्या निधनाने सत्तारूढ द गॉल पक्षापुढे प्रश्नचिन्ह उभे आहे. द गॉलएवढा प्रभाव पाँपीदूंचा नव्हता हे खरे, पण आता जनमनावर पाँपीदूंच्या एवढा प्रभाव असलेलाही नेता पक्षाजवळ नाही. बावीस एप्रिल ते सात मेच्या दरम्यान नव्या अध्यक्षाची निवडणूक होईल. तोपर्यंतच्या काळात हंगामी अध्यक्ष म्हणून घटनेनुसार सिनेटचे अध्यक्ष अॅलेन पोहेर यांची नेमणूक झाली आहे.

वर्षापूर्वी झालेल्या फ्रेंच नॅशनल असेंब्लीच्या निवडणुकात द गॉल यांच्या पक्षाने हुकमी बहुमत मिळविले खरे, पण पक्ष पहिल्या फेरीत निर्णायक बहुमत मिळवू शकला नाही. डाव्या पक्षांना बहुमत मिळाले तर मी असेंब्ली बरखास्त करून नव्या निवडणुका घेईन, अशी धमकी रेडिओवरील भाषणात अध्यक्ष पाँपीदू यांनी दिली होती. त्याचा परिणाम दुसऱ्या फेरीच्या मतदानात झाला व द गॉल पक्ष निर्णायक बहुमताने निवडून आला. पण त्याच्या पक्षाला १९६९ च्या निवडणुकांपेक्षा १२५ जागा कमी मिळाल्या, हे त्याची लोकप्रियता व प्रभाव कमी झाल्याचेच निदर्शक होते. एकूण ४९० सभासदांपैकी २६२ जागा द गॉल पक्षीयांनी मिळविल्या. म्हणजे निर्णायक बहुमतापेक्षा अवघ्या १७ जागा त्यांना अधिक मिळाल्या. पक्षाची घसरती लोकप्रियता आणि पाँपीदूंचे निधन तसेच 'पक्षातील फूट' यांचा परिणाम होऊन अध्यक्षीय निवडणुकीत द गॉल पक्षीयांना निर्णायक बहुमत मिळविणे कठीण जाईल व फ्रान्सच्या अध्यक्षपदी डाव्या गटाच्या नेत्याची निवड होण्याचा संभव आहे. निवडणुकीचे चित्र उमेदवार ठरल्यानंतर आणखी काही दिवसांनी स्पष्ट होईल, पण डावे पक्ष एकजूट करून ही निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करतील हे उघड आहे. पश्चिम जर्मनीत सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या हाती सत्ता आहे. इंग्लंडमधील निवडणुकीनंतर मजूर पक्ष तेथे अधिकारावर आला आहे. या घटनांचा परिणामही फ्रेंच मतदारांवर झाल्याशिवाय रहाणार नाही.

डाव्या पक्षाचा अध्यक्ष निवडला गेलाच तर अध्यक्ष एका मताचा आणि नॅशनल असेंब्लीत बहुमत दुसऱ्या पक्षाचे, अशी परिस्थिती उद्‌भवून पेचप्रसंग व संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. फ्रान्सच्या घटनेप्रमाणे अध्यक्षाला नॅशनल असेंब्ली बरखास्त करून नव्या निवडणुका घेण्याचा अधिकार आहे. डाव्या पक्षाचा अध्यक्ष निवडून आलाच तर नॅशनल असेंब्लीशी संघर्ष टाळण्यासाठी तो असेंब्ली बरखास्त करून नव्या निवडणुका घेईल.

द गॉल पक्षाची लोकप्रियता एवढी का घसरली? त्यासाठी द गॉल आणि पाँपीदू या दोघांच्याही राजवटीचा विचार करावा लागेल. अनेक छोट्या पक्षांमुळे चौथ्या प्रजासत्ताकाच्या काळात एकही सरकार दोन तीन महिन्यापेक्षा अधिक काळ अधिकारावर राहू शकले नाही. या अस्थिरतेतून मार्ग काढण्यासाठी द गॉल यांच्या हाती १९५८ साली सत्ता सोपविण्यात आली. आपल्या १० वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी देशाला स्थैर्य दिले, नवी घटना दिली. अध्यक्षीय लोकशाही आणि संसदीय लोकशाही या दोन्ही पद्धतीतील काही कल्पनांचा त्यात समावेश केला असला तरी अध्यक्ष हे केवळ मानाचे पद नसून निर्णायक सत्ता त्याच्या हातीच केंद्रित करण्यात आली आहे.

अल्जेरियाचा ऱ्होडेशिया होऊ न देता तेथील फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांचे बंड मोडून काढून द गॉल यांनी अल्जीरियास स्वातंत्र्य दिले. परराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेच्या व इंग्लंडच्या कलाने चालणारे राष्ट्र ही जी फ्रान्सची प्रतिमा निर्माण झाली होती ती बदलून एक स्वतंत्र धोरणाचे समर्थ राष्ट्र ही प्रतिष्ठा त्यांनी फ्रान्सला मिळवून दिली. युरोपने नेहमी अमेरिकेचीच बाजू न घेता जगाच्या राजकारणावर स्वतंत्र शक्ती म्हणून आपला प्रभाव पाडावा असा त्यांचा प्रयत्न होता. अर्थात त्यांना ही जी युरोपची संघटना करावयाची होती ती फ्रान्सच्या नेतृत्वाखाली करावयाची होती. याबाबतीत पश्चिम जर्मनीशी त्यांचा संघर्ष होणार हे उघड होते. युरोपच्या राजकारणात व अर्थकारणात ब्रिटनचा शिरकावही त्यांना पसंत नव्हता. म्हणूनच युरोपच्या समाईक बाजारपेठेत ब्रिटनने प्रवेश करण्यास त्यांनी विरोध केला होता. पण या बाबतीत त्यांना माघार घ्यावी लागली. अटलांटिकपासून उरलपर्यंत समर्थयुरोप उभारण्याचे द गॉल यांचे स्वप्न होते. युरोपच्या राजकारणावर अमेरिकेचे वर्चस्व त्यांना नको होते व फ्रान्सवर तर मुळीच नको होते. त्यासाठी नाटो करारातून फ्रान्सने आपल्या फौजा काढून घेतल्या. नाटोची मुख्य कचेरी पॅरिसहून हलवायला लावली आणि रशियाशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले. वॉर्सा करार राष्ट्रांच्या फौजांनी १९६८ साली चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केले तेव्हा पॅरिस-मॉस्को मैत्रीच्या संबंधांना धक्का बसला पण काही काळानंतर पाँपीदूंनी रशियाशी पुन्हा मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

समर्थ परराष्ट्र धोरणाला समर्थ संरक्षण धोरणाची जोड हवी हे द गॉल यांनी ओळखले होते. फ्रान्सला त्यांनी अण्वस्त्रधारी राष्ट्र बनविले. त्यांचे हे धोरण पाँपीदू यांनी पुढे चालवून जगाच्या विरोधास न जुमानता अण्वस्त्र चाचण्या केल्या. द गॉल यांना अंतर्गत आर्थिक प्रगती घडवून आणण्यात फारसे यश आले नाही. फ्रान्समध्ये १९६८ मध्ये देशभर संपाची व आंदोलनाची लाट येऊन सरकारी कारभारच थंडावला. घटनेत काही दुरुस्त्या करण्यासाठी त्यांनी सार्वमत घेतले. त्यात पराभव झाल्यानंतर त्यांनी राजिनामा दिला. पाँपीदूंनी द गॉलचेच धोरण पुढे चालविले पण त्यात अधिक व्यावहारिकता आणली. तेल पुरवठ्याची हमी मिळविण्यासाठी फ्रान्सने अरब राष्ट्रांशी स्वतंत्रपणे करार केला. पण समर्थ युरोप उभारण्याचे द गॉलचे स्वप्न पाँपीदूही साकार करू शकले नाहीत. तसेच गैरकारभाराची काही प्रकरणे, कॉंकार्डसारख्या योजनावरील उधळपट्टी, वृत्तपत्र कचेऱ्या व विरोधी पक्ष नेत्यांवर वाढती पोलीस पाळत यामुळे त्यांची राजवट अप्रीय होत गेली. अध्यक्षीय निवडणूक जिंकणे द गॉल पक्षाला त्यामुळे फार कठीण जाणार आहे. □

# तेलसमस्या

पृष्ठ ११ वरून

वरील तक्त्याकडे नजर टाकल्यास एक गोष्ट स्पष्टपणे ध्यानात येईल की एकूण उपलब्ध क्रूडतेलापैकी फारच थोडे क्रूडतेल पेट्रोलच्या उत्पादनासाठी वापरले जाते. म्हणूनच पेट्रोलच्या वापरातील कपातीचा, एकूण क्रूड तेलाच्या वापरावर महत्त्वाचा असा परिणाम होणार नाही.

पेट्रोलियम पदार्थांपैकी नाफ्ता हा अतिशय महत्त्वाचा द्रव पदार्थ म्हणावा लागेल. नाफ्याचे दोन प्रमुख उपयोग. खत उत्पादन व पेट्रोकेमिकल पदार्थ. पेट्रोकेमिकल्स कारखान्यात प्लॅस्टिक, सिंथेटिक धागे, डिटर्जंटस् इ. अनेक पदार्थ बनविले जातात. क्रूडतेलापासून पेट्रोल व नाफ्ता दोहींचे उत्पादन करता येते– पेट्रोलचे उत्पादन जास्त केल्यास नाफ्ता कमी व नाफ्याचे उत्पादन जास्त केल्यास पेट्रोल कमी– एका अंदाजाप्रमाणे १ लिटर पेट्रोलऐवजी नाफ्ता बनविल्यास होणाऱ्या खत उत्पादनाच्या वापरामुळे १० किलोग्राम जास्त धान्य पिकविता येते. आणखी एक अंदाज असा की पेट्रोलवापर २२ टक्क्यांनी कमी झाला तर खत उत्पादन वाढेल व परिणामी ६० लाख टन धान्योत्पादन होईल. नाफ्त्यातून खत उत्पादन करणे ही किफायतशीर गोष्ट आहे. भांडवल गुंतवणूक व दैनंदिन खर्च या दोन्ही दृष्टींनी...

इतर पेट्रोलियम पदार्थांपैकी केरोसीन आजतागातही खेडोपाडी व काही प्रमाणात शहरातूनही घरगुती इंधन म्हणून वापरले जाते. गॅससारख्या पर्यायी इंधनाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन व प्रसार आजतरी शक्य दिसत नाही. म्हणूनच केरोसीनचे किमान उत्पादन जरूरीचे ठरते. केरोसीन व्यतिरिक्त दुसरा महत्त्वाचा पेट्रोलियम पदार्थ म्हणजे डिझेल तेल (हाय स्पीड) होय. डिझेल तेलाचा वापर रस्त्यावरील वाहतूक (ट्रक्स, बसेस इ.) व रेल वहातूक यासाठी प्रामुख्याने होतो. खाजगी मोटारींचा वापर कमी करावयाचा झाल्यास साहजिकच सार्वजनिक वहातूक वाढणार व त्याचबरोबर डिझेल तेलाची मागणीही वाढणार. याशिवाय जहाज वाहतूक, विमान वाहतूक, यंत्रांसाठी वंगण, इत्यादीसाठीही इतर पेट्रोलियम पदार्थ वापरले जातात.

तेल व्यवसाय बव्हंशी सरकारी अखत्यारीतला आहे. तेलसाठ्यांचा शोध, क्रूड तेलाचे उत्पादन इत्यादी कामे प्रामुख्याने ऑईल अँड नॅचरल गॅस कमिशनकडे सोपविलेली आहेत. जोडीला ऑईल इंडिया लिमिटेड व आसाम ऑईल कंपनी याही हे काम करतात. देशांतर्गत तेलउत्पादन सर्वस्वी सरकारी ताब्यात आहे. देशात उत्पादन होणाऱ्या सुमाने ७५ लाख टनात आयात होणाऱ्या १६५ लाख टनांची भर घातल्यास सुमारे २४० लाख टन शुद्धीकरणाकरिता उपलब्ध होते.

शुद्धीकरण उद्योग सरकारी व खाजगी क्षेत्रात विभागला गेला आहे. शुद्धीकरण करणाऱ्या सरकारी मालकीच्या चार कंपन्या आहेत. त्यातील प्रमुख कंपनी इंडियन ऑईल कॉर्पोरेशन. या कॉर्पोरेशनतर्फे गोहत्ती, बरौनी, जवाहरनगर, हाल्डिया इत्यादी कारखाने चालविले जातात. दिग्बोई, मद्रास व कोचीन येथील तेलशुद्धीकरण निरनिराळ्या सरकारी कंपन्यांच्या ताब्यात आहे. खाजगी क्षेत्रातील तिन्ही कंपन्या एस्सो, बर्मा-शेल व काल्टेक्स परकीय आहेत. (सध्या संसदेपुढे असलेल्या बिलान्वये एस्सो कंपनी बरीचशी सरकारी ताब्यात येईल) एस्सो व बर्मा-शेल या कंपन्यांचे कारखाने ट्रॉम्बे येथे तर काल्टेक्स कंपनीचा कारखाना विशाखापट्टनम् येथे आहे

### उपाययोजना

एकूण आर्थिकसमस्या व विशेषेकरून तेलसमस्या ही अक्षरशः ज्वलंत समस्या होऊन बसली आहे. पाचव्या योजनेनुसार १९७८–७९ साला अखेर तेलाची मागणी ३४० लाख टनापर्यंत वाढेल. आज हाती असलेले पुढे सफल होणारे तेल शोधाचे प्रयत्न जमेस धरले तरी जास्तीत जास्त ३० टक्के एवढी मागणी (सुमारे १०० लाख टन) देशांतर्गत उत्पादनातून भागू शकेल. म्हणजेच सुमारे २४० लाख टन तेल (सध्याच्या आयातीच्या दीडपट) आयात करावे लागेल. तेलाची किंमत कमी होण्याची काहीच चिन्हे दिसत नाहीत. म्हणून यापुढील उपाय योजनांचा या संदर्भात सखोल विचार आवश्यक आहे.

उपाय योजना दोन स्वरूपाच्या–तातडीने अंमलात आणावयाच्या व दीर्घकालीन.

तातडीने अंमलात आणण्यासारखा पहिला उपाय म्हणजे पेट्रोल वापरात बचत. पेट्रोलचा बराचसा वापर सरकारतर्फे होतो. आपला एकूण पेट्रोल वापर तसा फारसा नाही हे यापूर्वी आलेच. पण जेवढी जमेल तेवढी बचत करावयास हवी. पेट्रोल वापरातील बचत दोन मार्गांनी करता येईल. रेशनिंग बसवून व द्वि किंमत अंमलात आणून. पेट्रोल रेशनिंग करण्याकरिता यंत्रणा उभारावी लागेल. तसेच ती यंत्रणा कार्यक्षम व चोख असावी लागेल. याची ग्वाही देता येत नाही. त्यादृष्टीने दुसरा प्रकार अधिक सोईचा. द्वि किंमत पद्धतीत अत्यावश्यक अशा वापराकरिता वस्तू माफक किंमतीत उपलब्ध करून दिली जाते व बाकी माल खुल्या बाजारात विक्रीस काढला जातो. असे झाल्याने खुल्या बाजारातील किंमत एवढी वाढते की वापरावर आपोआपच नियंत्रण बसते. साखरेवर असे नियंत्रण आहे. भारत सरकारने नुकतेच नाफ्ता या पेट्रोलियम पदार्थावर असे नियंत्रण जारी केले. त्यामुळे खत उत्पादनाकरता माफक भावात नाफ्ता मिळू लागेल.

दुसरा तातडीने अंमलात आणण्यासारखा उपाय म्हणजे मध्य पूर्वेतील राष्ट्रांशी ठेवलेल्या मैत्रीचा व्यापारी पातळीवर उपयोग करून घेणे. व त्या राष्ट्रांना होणारी निर्यात वाढविणे हा होय. अरब राष्ट्रांना होणाऱ्या निर्यातीपैकी केवळ ४–५ टक्केच निर्यात भारतातर्फे होते. या अरब राष्ट्रांना सर्व प्रकारचा माल लागतो. त्यांच्या अन्न व कपडे इ. गरजा पुऱ्या करण्याऐवजी इतर स्थायी स्वरुपाच्या गरजा पुरविण्यात आपणास पुढाकार घेता येईल. अरब राष्ट्रात आता जागृती झाली आहे व ते औद्योगिकरणाच्या मागे आहेत. आपणाकडे औद्योगिकरणाकरिता आवश्यक अशी यंत्रसामुग्री तंत्रज्ञान, इ. उपलब्ध आहे. द्विपक्षीय करार करून अशी निर्यात

वाढवावी व मोबदल्यात तेल विकत घ्यावे.

असा एक करार नुकताच इराण सरकारबरोबर झाला. त्याची येथे नोंद घ्यावयास हरकत नाही. या करारान्वये उधारीवर तेल-खरेदी, मद्रास तेलशुद्धीकरण कारखान्याची कार्यक्षमता वाढविण्यास मदत या गोष्टी इराण सांभाळणार तर मोबदल्यात भारत सरकार सिमेंट व पोलाद यांची निर्यात व इराणमध्ये खत कारखाना काढण्यास मदत करणार. तेलसमस्या सोडविण्याच्या दृष्टीने हे एक आशादायी पाऊल टाकले गेले असे म्हणता येईल.

तातडीचा आणखी एक उपाय म्हणजे अरब राष्ट्रांकडून पैशाची मदत मिळविणे. त्यांच्याकडे आज अमाप पैसा आहे. व त्यांना हा सर्व पैसा तावडतोब खर्च करणे शक्य नाही. काही शिल्लक पडणारच. या शिलकी रकमेवर योग्य ते व्याज व परतफेडीची हमी त्यांना दिली की झाले. पाचव्या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट स्वयंपूर्णता हे खरे. तरी काही प्रमाणात परकीय मदत घ्यावी लागणारच. ती मदत नेहमीच्या मार्गांनी घेण्याऐवजी अरब मित्रांकडून घ्यावयाची.

अनेक दीर्घकालीन उपाययोजना सुचविल्या गेल्या आहेत. सरकारने नेमलेल्या फ्यूएल पॉलिसी कमिटीनेही काही सूचना केल्या आहेत. या सर्व उपाययोजनांचा मतितार्थ असा. एक म्हणजे तेल-उत्पादन वाढविणे व दुसरा म्हणजे पर्यायी मार्गांनी इंधन पुरवठा करणे. तेलसंशोधनाबाबत आसाम व मुंबई येथून आशादायक बातम्या आल्या आहेत. अनावश्यक बाबींवरचा खर्च टाळून पाचव्या योजनेत तेलशोध व तत्सम निकडीच्या बाबींवर पैसा खर्च केला पाहिजे.

तेल-उत्पादन वाढविणे हे सर्वस्वी आपल्या हातातले नाही. म्हणूनच यापुढे दीर्घकालीन उपाय म्हणून पूरक उपायांनी इंधन-पुरवठ्यातील तूट कशी भरून काढता येईल याकडे लक्ष पुरविले पाहिजे. आपल्या देशात खत उत्पादन व वीजनिर्मिती यास योग्य असा कोळसा मुबलक उपलब्ध आहे. (कोळशाचा साठा १२००० कोटी टन असावा असा एक अंदाज. त्यामानाने तेलसाठा केवळ २० कोटी टन इतकाच). इतर अनेक देशात कोळसा वापरून औष्णिक वीज निर्माण करण्यात येते. आपणही या दृष्टीने प्रगती केली पाहिजे. शिवाय कोळशापासून खत उत्पादन करणे हेही आवश्यक आहे. ते खर्चाचे खरे पण त्या-शिवाय तरणोपाय नाही. त्याचबरोबर अणुशक्ती, गॅसेस, जलविद्युत् इ. साधनांनी पर्यायी इंधन पुरवठा वाढविणे जरूरीचे होऊन बसले आहे. खेडोपाडी शेण वापरून गॅस तयार करता येतो, त्यावर भर दिला पाहिजे. रस्ते सुधारून व ट्रक्सऐवजी ट्रेलर गाड्या वापरून इंधन वापरात बचत करणे हाही एक दीर्घकालीन उपाय अंमलात आणावयास हवा.

तेलसमस्या कठीण खरी. दैवाने आपणास हात दिला नाही हेही खरे. म्हणूनच मानवी प्रयत्नांची शिकस्त करून या परिस्थितीशी मुकाबला करावयास हवा. आज एकूण आर्थिक परिस्थिती तशी निराशाजनक. आपले पुढारी हतबल झालेले दिसतात. अर्थयंत्रणा गेल्या एक दोन वर्षांत बरीच कोलमडलेली आहे. तेलटंचाईने त्या आगीत भर टाकली आहे.

पण हतबल होऊन प्रश्न सुटत नसतात. तेलसमस्येबाबत काही विचार या लेखात मांडले आहेत. एकाच उपायाने या समस्येचा उलगडा होईल असे नाही. सर्व बाजूंनी या प्रश्नावर हल्ला केला तर प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने प्रगती होऊ शकेल. सरकारतर्फे काहीच झाले नाही असे म्हणण्याचा इरादा नाही. पण ज्या सुसंगतपणे एकूण प्रश्न हाताळावा तसा तो हाताळला गेला नाही. तेलव्यवसाय हा बव्हंशी सरकारी ताब्यातला. म्हणूनच सरकारवर या प्रश्नाची जबाबदारी येऊन पडते. ही जबाबदारी केवळ सरकारचीच असे म्हणता येणार नाही. आपणा सर्वांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पणे थोडी जबाबदारी येऊन पडते. आपणही सरकारी प्रयत्नांना सक्रीय हातभार लावणे जरूरीचे आहे.

मानवी प्रयत्नांची पराकाष्ठा झाल्यास या व असल्या संकटावर मात करणे कठीण जाणार नाही अशी आशा हा लेख संपविताना व्यक्त करावीशी वाटते. □ □

---

## कै. अण्णासाहेब कारखानीस

पृष्ठ २४ वरून

नाट्यसेवेचा कालखंड जरी मर्यादित असला तरी त्याचा दर्जा आणि महत्त्व मात्र अनन्य-साधारण स्वरूपाचे आहे. नाट्यकला-नाट्य-व्यवसाय ह्याबद्दल निश्चित स्वरूपाची आंतरिक निष्ठा बाळगणारे ते निरलस नाट्य-सेवक असून त्यांची काही अपरिवर्तनीय मूल्ये आहेत. नाट्यक्षेत्रातील त्यांची तत्त्वनिष्ठा, सौजन्य आणि सचोटी यांबद्दल कोणाचेच दुमत नाही. ज्ञानार्जनाची तळमळ आणि प्रगतीची ओढ हा त्यांचा प्रकृतिधर्म आहे. पण त्याचबरोबर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की रंगभूमीचा प्रत्यक्ष अनुभव व नाट्य-विषयक उपपत्तीवर प्रभुत्व असूनही त्यांची नाटके प्रयोगानुकूल राहू शकली नाहीत. त्यांच्या नाटकातील प्रभावी नाट्यतत्त्व तात्त्विक उपपत्तीच्या भाराखाली दडपून दुर्बल झाले. परिणामी नाट्यसंवादाला तार्किक चर्चांचे स्वरूप आले.

अण्णासाहेब नाट्यक्षेत्रातून निवृत्त झाल्यावर म्हणजे १९२० नंतर १९५६ पर्यंत ग्रंथसंग्रह आणि लोकसंग्रह चांगला होता. अंतर्मुख, स्वयंकेंद्रित स्वभावामुळे आणि प्रसिद्धी पराङ्मुख वृत्तीमुळे समकालीन रंग-भूमीच्या प्रवाहात दर्शनी स्वरूपात कार्यमग्न घटक म्हणून ते राहिले नाहीत तर त्या प्रवाहाचे एक साक्षी म्हणून राहिले.

कालौघात अण्णासाहेबांचे कार्य आपल्या-पासून खूपच दूर गेले आहे.पण काही विचार-धन मात्र चिरकाल टिकणारे आहे. त्यातला एक महत्त्वपूर्ण विचार तर आजच्याही काळात मननीय असा आहे. १९२८ साली त्यांनी एक व्याख्यान दिले होते. विषय होता 'विश्वविद्यालये आणि नाट्यकला' त्यामध्ये त्यांनी म्हटले होते 'विश्वविद्यालयात नाट्य-कलेची एक शाखा असणे जरूर आहे. नट निर्माण करण्यासाठी नव्हे–या योगाने नट निर्माण होणारही नाहीत–तर आमच्या शिक्षणात निव्वळ शोषणक्रिया (absorption) होते. self Expression ला म्हणजे मनोगत प्रकट करण्याच्या क्रियेला–कोठे वावच नाही. त्यासाठी नाट्यकलेला विश्व-विद्यालयांच्या अभ्यासक्रमात स्थान अवश्य पाहिजे.' या आणि अशाच स्वरूपाचे काही पायाभूत विचार अण्णासाहेबांनी मांडले. एका अर्थाने हे सारे विचार आणि त्यांचे नाट्य-विषयक मौलिक कार्य हौशी नाट्यसंस्थांना दीपस्तंभाप्रमाणे आधारभूत आहे असेच म्हणावे लागेल. म्हणूनच त्यांचे पुण्यस्मरण सतत होणे अगत्याचे आहे. □

# आणखी एक नवी मुंबई

पृष्ठ ५ वरून

होती. त्यापैकी १, २, ७ (अर्धवट) आणि ८ ह्या विभागाचे काम १९२६ पर्यंत पूर्ण झाले. ह्या विभागांच्या कडेने समुद्रात भिंत उभारण्याचेही काम त्यावेळी हातात घेण्यात आले व आजच्या नरिमन पॉईंटपर्यंत भिंत उभारण्यात येऊन १९२६ मध्ये इतर कामाबरोबर हेही काम बंद करण्यात आले. समुद्र मागे हटवून संपादित केल्या जाणाऱ्या जमिनींना योग्य तो भाव न मिळाल्याने व एकूण आर्थिक मंदीमुळे ही योजना त्यावेळी अर्ध्यावरच सोडण्यात आली. त्यावेळी संपादित करण्यात आलेल्या विभाग ७ आणि ८ वर संरक्षण खात्याच्या इमारती व इतर गोष्टी उभ्या राहिल्या.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मुंबईच्या वाढीला बेफाट वेग आला. फोर्ट विभागात ऑफिसेस फार मोठ्या प्रमाणावर वाढू लागली. ही मोठाली ऑफिसेस, उच्चभ्रू लोकांची प्रथमपासूनची वस्ती, ह्यामुळे ह्या भागात जागांचे भाव भरमसाट वाढू लागले. ब्रिटिशांनी ज्या जीत-जेते तत्त्वावर मुंबईची विभागणी प्रथमपासून केली होती, तिनं स्वातंत्र्योत्तर काळात गरीब-श्रीमंत भेदाचे स्वरूप, या वाढत्या किंमतीमुळे आपोआप धारण केले. एक प्रकारे ब्रिटिशांचाच वारसा चालू ठेवला जाऊन, फोर्ट व इतर मुंबईच्या मुख्य भागात समाजातल्या वरच्या श्रेणीतल्या लोकांचे प्रस्थ वाढले आणि गरीब समाज दूरवर उपनगरातून फेकला गेला. १९५१, १९६१...मुंबईची लोकसंख्या झपाट्याने वाढत गेली आणि त्याचबरोबर ही विषमता देखील !...

लोकसंख्येच्या दृष्टीने मुंबईची अशी विषम वाढ होत असताना, खुद्द फोर्ट विभागात अनेक ऑफिसेसची भाऊगर्दी वाढत होती. धंद्याच्या दृष्टीने फोर्ट विभागात आपले ऑफीस उघडणे प्रत्येकाला आवश्यक भासू लागले. परिणामतः एक टेबलापुरती जागा मिळवायला फोर्ट विभागात २५० ते ३०० रुपये भाडे मोजावे लागत आहे. ह्या खेरीज चार-पाच हजार रुपायांपर्यंत डिपॉझीट किंवा पागडी द्यावी लागते ती वेगळीच ! साहाजिकच, आधीची प्रस्थापित ऑफिसेस, सचिवालय, शासकीय कचेऱ्या हे सारे जवळ पडेल अशा पर्यायी जागेच्या शोधात सारे लोक लागले व त्यातच १९२६ साली ब्रिटिशांनी 'अव्यवहार्य' म्हणून सोडून दिलेल्या योजनेवर पुन्हा एकवार विचार सुरू झाला. १९५८ साली त्यावेळच्या ना. यशवंतराव चव्हाणांच्या कारकिर्दीत कै. स. गो. बर्वे ह्यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने एक अभ्यासमंडळ नेमेले. ह्या अभ्यासमंडळाने, मुंबईकरांची जागेची भूक भागवण्यासाठी 'बॅक बे'ची योजना पुन्हा राबवण्यात यावी अशी शिफारस मुंबई शासनाला केली. या शिफारशीबरोबरच, बर्वे कमिटीने काही इशारेही शासनाला दिले.' इतःपर, म्हणजे १९५८ नंतर शासकीय कार्यालये व इतर ऑफिसेस आणि उद्योग-विनिमय केंद्रे (Commercial Centres) मुंबईत स्थापण्यात येऊ नयेत; अशी ऑफिसेस व केंद्रे उपनगरात निर्माण करावीत; ब्रांद्रा-कुर्ला रिक्लमेशन योजनेला प्राधान्य देण्यात यावे इत्यादी शिफारशीही शासनाला केल्या होत्या. असे न करता केवळ 'बॅक बे' योजना राबवली तरी, दक्षिण मुंबईतली गर्दी भयानक वाढेल, अनावर होईल असा इशाराही बर्वे कमिटीने दिलेला होता. परंतु बर्वे समितीच्या अन्य शिफारशीकडे दुर्लक्ष करून, शासनाने केवळ बॅक बे संबंधातली शिफारस उचलून धरली. १९२६ पासून धूळ खात पडलेल्या 'बॅक बे' योजनेचे पुनरुज्जीवन करायचा निर्धार केला आणि विभाग (Blocks III to VI) ३ ते ६ या क्षेत्रात समुद्र हटवण्याच्या योजनेला प्रारंभ केला.

आज शासनापुढे असलेली 'बॅक बे'ची योजना ती हीच ! मुंबईच्या दक्षिण टोकाला नरिमन पाईंटच्या पुढे, कफ परेडच्या आजूबाजूला, कुलाब्याच्या परिसरात ५५१ एकर जमीन समुद्र मागे हटवून संपादित करायची व तिथे व्यापारी (Commercial) व राहाण्याच्या जागा उपलब्ध करायच्या, बगिचे, खेळायची मैदाने उभी करायची अशी ही योजना आहे. या ५५१ एकरांपैकी आतापर्यंत फक्त १७० एकर जमीन संपादण्यात आली असून ती सर्व ३ ऱ्या आणि चौथ्या विभागात आहे. १९६९ पर्यंत तरी ह्या जागांना फार मोठ्या किंमती मिळाल्या नाहीत. उलट सुरुवातीला १९६२ मध्ये मागे लागून एअर इंडियाच्या गळ्यात, संपादित जागेपैकी साडेसात हजार चौरस मीटर्सचा प्लॉट अक्षरशः बांधावा लागला. त्यानंतर ३ वर्षांनी इंडियन एक्स्प्रेसने आणि मफतलालने एकेक प्लॉट घेतला. ह्याच सुमारास, ह्या संपादित क्षेत्रात उद्योगपतींना आकर्षित करता यावे म्हणून शासनाने ३.५ वरून ४.५ पर्यंत एफ्. एस्. आय्. वाढवून दिला आणि ह्या नंतर मात्र प्लॉट्स भराभर गेले असून आज ह्या परिसरात मोठमोठ्या इमारती उभ्या राहात आहेत. आज इथली परिस्थिती अशी आहे की, समुद्र मागे न हटवताही, संपादित न केलेल्या जागाही शासन विकीत आहे ! अक्षरशः पाण्यात अंदाजे रेषा कल्पून प्लॉट्स पाडले जात आहेत, विकले जात आहेत व तेही भरमसाट किंमतींना असा ह्या बाबतीत जाहीर आरोप आहे. शासनानेही हे वेळोवेळी कबूल केले आहे की, स्वखर्चाने जमीन संपादित करून घ्यायसाठी (To get them retained) लोक मोठ्या संख्येने पुढे येत आहे. १९६९ पर्यंत विकल्या गेलेल्या प्लॉटसची यादी व त्यांची किंमत शेजारी दिली आहे. तीच किंमत विकल्या जाणाऱ्या पाण्याची (असंपादित प्लॉट्सची) आकारली जात आहे म्हणे ! या किंमतीवर नजर टाकली तरी हा सारा उपद्व्याप कुणासाठी आहे ह्याची कल्पना येऊ शकते.

ह्या एकूण ५५१ एकर जागेपैकी २०% जागा व्यापारी क्षेत्रासाठी सोडण्यात येणार आहे, तर ८०% जागा राहाण्याच्या उपयोगासाठी सोडण्यात येणार आहे. परंतु ८०% जागांमध्येच बागा, मैदाने ह्यांचा समावेष असल्याने, प्रत्येक्षात हे प्रमाण १ : ३ असे न पडता केवळ १ : २ ते २½ च्या आसपास पडेल. इथल्या भूसंपादनाचा खर्च, टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंटच्या अंदाजानुसार दर चौरस वाराला ३०० रु. असा आहे. हा अंदाज, १९६८ चा आहे. आज खर्च ५०० रु. च्या आसपास जावा. १९६८ चा जरी खर्च धरला तरी, सुमारे ८४ कोटी रुपयांच्या आसपास या योजनेचे बजेट जाईल. ह्या खेरीज, इ. स. २००० पर्यंत ही योजना पूर्ण होईल तेव्हा वहातूक व्यवस्था, महामार्ग, रेल्वे, बस विस्तार योजना वगैरे सर्व मिळून एकूण खर्च ३०० कोटीच्या घरात जाईल.

या योजनेच्या शेवटी सुमारे दीड लाख लोकांची वस्ती ह्या प्रदेशात होईल असा अंदाज आहे. ३·५ एफ. एस. आय. लक्षात. इथे योजनेनुसार उपलब्ध असणाऱ्या जागेत ८७० चौ. फुटांचे अट्ठावीस हजार गाळे बांधता येऊ शकतील. अर्थात, गगनचुंबी इमारती गृहीत धरूनच ! एका गाळयात ५ माणसे ह्या साधारण हिशोबाने इथली वस्ती १,४०००० च्या घरात जाते. तथापी इथल्या गाळयांच्या किमती किंवा त्यांचे भाडे एवढे प्रचंड असेल की, गरीब किंवा मध्यम वर्गीयांना ते परवडूच शकणार नाही व ही किंमत थोडी हलकी करण्यासाठी गाळयामागे पाच हे प्रमाण तरी उल्लंघिले जाईल किंवा एवढी वस्तीच इथे वाढणार नाही आणि इथल्या ऑफिसेसमधून काम करणारा कर्मचारी दूरवरून इथे येऊ लागेल. परंतु काही झाले तरी इथे राहाणाऱ्या एकूण व्यक्तींपैकी अगदी जास्तीत जास्त १०,००० लोकांना इथल्या इथे काम उपलब्ध होऊ शकेल. ह्या उलट ह्या परिसरात निर्माण होणाऱ्या ऑफिसेसमुळे (एकूण क्षेत्र ११४ चौ. मीटर ! ) दर ७१ चौरस फुटास १ कर्मचारी ह्या सध्याच्या फोर्टमधील प्रमाणानुसार दोन लाख नवीन कर्मचारी इथल्या ऑफिसेसमधून कामासाठी येऊ लागतील. ह्याखेरीज ह्या ऑफिसेसमध्ये कामानिमित्त येणाऱ्या इतर मंडळींची संख्या (फोर्टमधले सध्याचे प्रमाण लक्षात घेता ! ) ५० ते ७५ हजारांच्या घरात जाईल. बोरीबंदर, चर्चगेट व वेगवेगळे बसमार्ग ह्यांच्याद्वारे फोर्टमध्ये बाहेरून येणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या आज अंदाजे चार लाखांच्या घरात आहे. एवढ्या संख्येतच आज गाड्यांना प्रचंड गर्दी असते. एखादी लोकल रद्द झाली तर जनतेचा आगडोंब उसळतो. बेस्टच्या बसेससाठी लांबच लांब रांगा असतात. चार लाख लोकांची वहातूक करताना दोन्ही रेल्वे आणि बेस्ट ह्यांची तारांबळ उडते. मग प्रवाशांची संख्या, चारवरून सहा साडेसहा लाखांवर गेली तर गाड्यांना काय गर्दी होईल, बसेसच्या रांगा केवढ्या होतील, लोकांचे हाल काय होतील ह्याची कल्पनाच केलेली बरी !

बॉम्बे सेंट्रल ते चर्चगेट दरम्यान चार लाईनी टाकल्या, मध्य रेल्वेवर बारा डब्यांच्या गाड्या धावल्या, कुलाब्यापर्यंत रेल्वे वाढवली, बसेसची नवीन खरेदी केली, जमिनीखालील रेल्वे सुरू केली तरी—ह्या सर्व उपाययोजनांतून आणखी केवळ लाख उतारूंची ने—आण वाढू शकेल. त्यातही बसेसचा वेग मंदावण्याची शक्यता आहे. प्रवाशांच्या जाण्यायेण्याच्या वेळात वाढ होण्याची शक्यता आहे. शिवाय ह्या साऱ्यातून जो प्रचंड खर्च होईल त्यामुळे 'बॅक बे' वरच्या जागा विकून येणारा फायदा धुवून निघण्याची शक्यताच जास्त आहे.

बॅक बे वरील वसाहतींना पाण्याचा पुरवठा करण्याचा प्रश्नही असाच बिकट आहे. इथल्या एकूण भागाला रोजी २३ दशलक्ष गॅलन पाणी लागेल. ह्या पाण्याचा पुरवठा करण्याचा खर्चच ४५० कोटींच्या घरात जाहे. शिवाय पाणीपुरवठा करावा लागेल. तोही मलबार हिलच्या रिझर्वायरमधून. तिथूनच गिरगाव, वाळकेश्वर वगैरे भागांनाही पाणी पुरवठा होतो. गिरगावातला पाणीपुरवठा मी नव्यानं वर्णायला हवा असे मुळीच नाही. तेव्हा बॅक बे मुळे पाण्याचा धड पुरवठा बॅक बेला होणार नाही; तसाच तो गिरगावकरांच्याही मुळावर येईल.

रस्ते, ड्रेनेज ह्यांच्यावरही मोठा खर्च होणार आहे. इलेक्ट्रिसिटीचा वापरही भरमसाठ वाढणार असून तिच्या पुरवठ्यासाठीही मोठा खर्च व्हायचा आहे.

महाराष्ट्र शासनानेच बॅक बेवर काही वर्षांपूर्वी म्यु. कमिशनर

## बॅक बे एका दृष्टिक्षेपात

| | |
|---|---|
| १. एकूण क्षेत्रफळ | ५५१ एकर. |
| २. आतापर्यंत संपादित क्षेत्रफळ | १७४ एकर. |
| ३. सुविधांची अंदाजे किंमत | |
| अ) पाणीपुरवठा— | रु. १। कोटी |
| ब) ड्रेनेज— | रु. ३ कोटी |
| क) रस्ते— | रु. २॥ कोटी |
| ४. पाण्याची आवश्यकता | २३ दशलक्ष गॅलन. रोजी |
| (सध्याच्या १७० एकरात) | १ दशलक्ष गॅलन ,, |
| ५. विद्युत आवश्यकता | ५७० मेगॅवॅट |
| (सध्याच्या १७० एकरात) | १७ मेगॅवॅट |
| ६. एकूण विकास खर्च | ३०० कोटी रुपये |
| ७. रेल्वे विस्तार खर्च | २५० ,, ,, |
| ८. बस विस्तार खर्च | १० ,, ,, |
| ९. उत्पादित जागेचा सरासरी खर्च | |
| १० ,, ,, किंमत | |
| अ) राहण्याची रु. १६००।— | दर चौरस वार |
| ब) व्यापाराची रु. २०००।— | ,, |

## १९६९ पर्यंत विकल्या गेलेल्या जागांचा तपशील

| क्र. | प्लॉट नं. | कुणाला विकला | विक्रीचा भाव रु. दर चौरस वारास |
|---|---|---|---|
| **विभाग नं. ३** | | | |
| १. | २१८,२४५,२४६ | एअर इंडिया | ४००।— |
| २. | २१९,२२०,२४३,२४४ | इंडियन एक्स्प्रेस | ५५०।— |
| ३. | २४१,२४२ | निर्मल कमर्शियल | ५,१५५।— |
| ४. | २४७ | ईस्ट इंडिया हॉटेल्स | २,६५०।— |
| ५. | २२९,२३२ | शिपींग कॉर्पोरेशन | ४५०।— |
| ६. | २२७,२२८,२३३,२३४ | स्टेट बँक | ११००।— |
| ७. | २२१,२२२ | मफतलाल | ५२०।— |
| **विभाग नं. ५** | | | |
| १. | १५७ | हिंद मिश्रा कन्स्ट्रक्शन | १७२५।— |
| २. | १५८ | अल्ट्रा कन्स्ट्रक्शन | २००२।— |
| ३. | १५९ | श्री. ईश्वरदास भाटीया | २१५१।— |
| ४. | २२० | श्री. मेहता | १६५६।— |
| ५. | १६० | श्री. राहेजा | १७४०।— |
| ६. | २२२ | पाईम हॉटेल | १५५१।— |
| ७. | २२३ | दालमाल अँण्ड सन्स | १५५१।— |

श्री. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती. विविध समस्यांचा अभ्यास करून ह्या कमिटीने मांडलेले गणित इथे उद्धृत करण्यासारखे आहे. त्यांनी मांडलेल्या गणितानुसार सर्व खर्चांची एकूण सरासरी ९०·०६ कोटी रुपये आहे. तर उत्पन्नाची सरासरी ४३·११ कोटी आहे. फायद्याच्या दृष्टीने हा प्रयोग राबवला जात असून, बॅक बे तून मिळणाऱ्या फायद्यातून, उर्वरित मुंबईचा विकास साधायचा, गरीब लोकांकरता घरे बांधायची हे सरकारी गणित आहे. परंतु एकूण व्यवहारच तोटयाचा असल्याचे गणित मांडून पटवर्धन कमिटीने हा सरकारी दावाच उधळून लावला आहे. पटवर्धन कमिटीच्या हिशोबानुसार या योजनेतील फायद्याचे प्रमाण (benefit cost ratio) अतिशय व्यस्त आहे.

ह्याहीनंतर अनेक कमिटया नेमल्या गेल्या. जागतिक बँकेनेही ह्या योजनेचे सर्वेक्षण केलं. सर्वांनी ही योजना अव्यवहार्य असल्याचे जाहीर केले व बहुतेक प्रत्येक समितीने, सरकारी कार्यालये उपनगरातून हलवावीत, कुर्ला-बांद्रा रिक्लेमेशन व जुळी मुंबईला योजनेला प्राधान्य द्यावे, बॅक बे योजना रद्द करावी अशा तऱ्हेच्या सूचना केल्या. मूलत: ज्या बर्वे समितीचा आधार घेऊन रिक्लेशन योजना आज राबवली जात आहे, त्या समितीनेही, बॅक बेपेक्षा जास्त प्राधान्य कुर्ला-बांद्रा-वडाळा भागातल्या रिक्लेमेशनवर दिले होते. परंतु हे सारे बासनात गुंडाळून, सर्व समित्यांचे विरोधी निर्णय आले असताही, नगरविकास मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक कॅबिनेट सब कमिटी शासनाने नेमली. वित्त मंत्री, महसूल मंत्री आणि दळणवळण-खात्याचे मंत्री अशा तिघांचा ह्या समितीत समावेश होता. ह्या समितीने, ही योजना राबवायची शिफारस केली. त्याचबरोबर सध्याच्या व्यापारी क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग इतर रिक्लेमेशनसाठी करायचा, त्यानंतर संपूर्ण योजना पूर्ण झाल्यावर, म्हणजे इ. स. २००० नंतर येणाऱ्या उत्पन्नातील ५०% खर्च मुंबईच्या विकासावर (रस्ते धरून) करायचा, २५% घरांसाठी व इतर २५% मुंबईच्या रस्त्यांच्या कार्यक्रमांसाठी करायचा अशाही शिफारशी ह्या कमिटीने केल्या आहेत.

कमिटीच्या ह्या निर्णयावर जानेवारी, १९७३ मध्ये महाराष्ट्र शासनाने शिक्कामोर्तब केले. सरकारने स्वीकारलेल्या अंतिम योजनेनुसार–

१. बॅक बे बरोबरच, कुर्ला-बांद्रा योजनेचाही विकास करावयाचा आहे.

२ महानगर वहातूक व्यवस्था (रेल्वे)च्या सहाय्याने दोन जादा रेल्वे मार्ग टाकायचे व पश्चिम व मध्य रेल्वेची स्थानके रेल्वेमार्गांनी जोडायची

३. ट्यूब रेल्वे (भुयारी रेल्वे) साठी ७६ एकरांचा प्लॉट राखून ठेवायचा व ती रेल्वे योजना राबवायची.

४. काही मोजके प्लॉट्स महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाला द्यायचे व त्यावर सरकारी कर्मचारी व इतर लोकांसाठी गाळे राखून ठेवायचे.

ह्या साऱ्यांतून मुंबईतल्या वाढत्या गर्दीचे प्रश्न सोडवता येतील अशी शासनाला खात्री वाटते व त्याचबरोबर इथे मिळणाऱ्या पैशांतून एकूण जनतेच्या कल्याणाचे प्रकल्प हाताळता येतील अशी शासनाची भूमिका आहे.

पण एकूण गणित इतके सरळ साधे नाही. त्याला विविध तज्ज्ञांचा विरोध आहे तो राजकीय नाही. मा. वसंतराव नाईक विधानसभेत ह्या योजनेला होणारा विरोध हा असंतुष्ट, विघ्नसंतोषी, राजकारणी लोकांचा आपमतलबी विरोध आहे असे सांगतात. महापालिकेच्या ठरावाची बोळवण करतात. पण, सिडकोचे डिसूझा, मध्य रेल्वेचे पुसाळकर, गाडगीळ, श्री. पटवर्धन आदी मंडळींचा काही राजकीय स्वार्थ होता असे वाटत नाही. जागतिक बँकेच्या निरीक्षकांना इथल्या राजकारणात काही संबंध होता असेही मला वाटत नाही. परंतु तरीही ह्या सर्वांच्या विरोधात ही योजना नाईक-सरकार राबवीत आहे. समुद्रातल्या आणखी एका नव्या मुंबईत, विधानभवन बांधीत आहेत. सचिवालयाचा विस्तार करीत आहेत. ह्या नव्या मुंबईचा एवढा आग्रह नाईक सरकारचा कशासाठी आहे? आणि ह्या योजनेला एवढा सार्वत्रिक विरोध तरी का? ह्याचे चित्रण पुढील अंकी मी सादर करीनच ! ☐

## पूर्वार्ध समाप्त


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

ब. मो. पुरंदरे

किंमत सात रुपये

राजहंस प्रकाशन

# विश्वविख्यात साहित्यिकाचं भाडं थकतं तेव्हा–

ऑलिव्हर गोल्डस्मिथ. अठराव्या शतकातील जागतिक कीर्तीचा एक बुद्धिमान, प्रेमळ, उदार, थोर हृदयाचा, अष्टपैलू आंग्ल साहित्यिक, कवि, नाटककार. साहित्यिक विश्वाला हाच त्याचा परिचय आहे. तथापि, इटलीत त्यानं वैद्यक शास्त्राची परीक्षा देऊन एम. डी. ची पदवीही मिळविली होती. त्याची ही डिग्री नि मेडिसीनचे ज्ञान शंकास्पद मानले गेले आहे. डॉक्टर म्हणून त्याने प्रॅक्टीस कधी केलीच नाही नि डॉक्टर म्हणून त्याला कुठे नोकरीही मिळाली नाही. त्याचे मित्र विनोदाने त्याला म्हणायचे, 'ऑलिव्हर, तुझ्या वैद्यकीय ज्ञानाचा नि कौशल्याचा उपयोग तुझ्या मित्रापेक्षा शत्रूवरच कर बाबा...हो, तुझी नाटके आम्ही अवश्य पाहू; तुझ्या कविता जरूर वाचू... पण तुझे औषध नको...' गोल्डस्मिथ फिड्लही वाजवायचा. गंमतीदार गोष्टी सांगायचा.चारचौघांची थट्टा-मस्करी करायचा नि स्वतःची करवूनही घ्यायचा. दोन देणे नि चार घेणे असा त्याचा स्वभाव होता, खिलाडू.

१० नोव्हेंबर १७२८ ते ४ एप्रिल १७७९ या एक्कावन वर्षांच्या कालखंडात त्याने विपुल नि समृद्ध साहित्य लिहिले. प्रत्येक साहित्यिकाच्या वाटचाला येणारे स्तुती-टीकेचे हार नि प्रहार त्यानेही अनुभवले.

साहित्यावर त्याने जितका पैसा मिळविला त्याच्या शतपटीने त्याने बारेमाप उधळपट्टीही केली. कितीही पैसे मिळोत, त्याला ते पुरत नसत. कर्ज काढून जगण्याचेही त्याच्यावर प्रसंग आले. त्याने भिकाऱ्यांना उदारपणे पैसे वाटले नि स्वतःही भिकारी बनून भिकेचे भोग भोगले. भीक घालणे नि मागणे त्याच्या स्वभावातच होते. कांचनाच्या सहवासाने तो कधीही सुखावला नाही नि निष्कांचन अवस्थेमुळे रडलाही नाही, मृत्यूसमयी त्याने स्वतःवर दोन हजार पौंडाहून अधिक कर्जाचा डोंगर लादून घेतला होता. पण त्याचे घेणेकरीही त्याच्याबाबतीत सहृदय होते.

तो दिसायला अत्यंत ओबडधोबड नि कुरूप होता. त्याच्या चेहऱ्यावर सर्वत्र खोल असे देवीचे व्रण होते. बुटका असून त्याचे अवयव बेडौल होते. 'His gait was so ungainly that it looked as if the various parts of his body were not properly joined together,' असे त्याचे वर्णन केले गेले आहे. त्याच्या उभ्या आयुष्यात त्याच्या मित्रांनी त्याची खूप टर उडविली. पण त्याला त्याची खंत वाटली नाही. उलट त्याचे विशाल हृदय त्याच्या ओठावर होते.

डॉ. सॅम्युएल जॉन्सनसारखा विश्वविख्यात साहित्यिक–पंडित त्याचा घनिष्ट स्नेही होता. डॉ. जॉन्सनने त्याला आपल्या सुप्रसिद्ध 'Literary Club'चे सदस्यही करून घेतले होते. याच क्लबचे इतर नामवंत सभासद–पेंटर जोशुआ रेनॉल्ड्स्, अभिनेता डेव्हिड गॅरीक्, राजकीय तत्त्वज्ञ, वक्ता नि द्रष्टा एडमंड बर्क, चरित्रकार जेम्स बॉस्वेल–या समकालीनांशीही त्याच्याशी चांगलीच जानपछान होती. स्नेहापोटी डॉ. जॉन्सन त्याची टिंगल उडवायचा, 'गाढीपासून घोडा हा भिन्न पशु आहे, इतके कळण्याइतपतच त्याचे प्राणिशास्त्राचे ज्ञान होते.' तथापि, गोल्डस्मिथच्या मृत्यूची बातमी ऐकल्यावर एडमंड बर्कच्या डोळ्यातून अश्रूधारा कोसळल्या नि डॉ. जॉन्सनलाही भडभडून आले.

वैऱ्यावरही येऊ नये असा अवमानाचा नि अप्रतिष्ठेचा एक प्रसंग गोल्ड स्मिथवर कोसळला. तो ज्या बाईच्या घरात भाडेकरू म्हणून राहात होता तिचं बरंचसं भाडं त्यानं थकवलं होतं. तिची भूमिका होती, 'गोल्ड स्मिथ असेल इंग्लंडचा थोर साहित्यिक; मला काय त्याचं अप्रूप? मला जगायचंय माझ्या भाड्यावर; त्याच्या साहित्यावर नाही.' वाट पाहून तिनं त्याच्यावर दावा लावून कोर्टामार्फत त्याच्या प्रॉपर्टीचा जप्ती हुकूम मिळविला. ही 'अॅटॅचमेंट डिक्री' घेऊन शेरीफचे अधिकारी त्याच्या दारात येऊन थडकले. इतका वेळपर्यंत थंड बसलेला गोल्डस्मिथ पुरा खचला. याच वेळी 'Vicar of Wakefield' या त्याच्या जगप्रसिद्ध कादंबरीचे हस्तलिखित त्याच्याजवळ तयार होते. हे हस्तलिखित बरोबर घेऊन तो तसाच धावत डॉ. जॉन्सनकडे गेला. डॉ. जॉन्सनने या कादंबरीचे साहित्यिक मोल जाणून ते 'न्यूबेरी' या प्रसिद्ध प्रकाशक–पुस्तकविक्रेत्याकडे पाठवून दिले. न्यूबेरीने गोल्ड स्मिथला मानधन म्हणून साठ पौंड दिले. यातून त्याने थकलेले भाडे मालकिणीला देऊन टाकले. दोघांचेही काम झाले होते. गोल्डस्मिथचे रस्त्यावर येणे स्थगित झाले होते.

दुसऱ्याच दिवशी गोल्डस्मिथने आपल्या उधळ्या नि दिलदार स्वभावाला अनुसरून, भाडेमुक्तीचा जल्लोष म्हणून, एक जंगी मदिरापार्टी दिली. मालकिणीच्या हातात मद्याचा पेला स्वहस्ते देऊन गोल्डस्मिथ म्हणाला, 'पुढचे पुढे बघू हो...तूर्त तरी भाडं फिटलेय ना? घ्या हा ग्लास नि लावा तोंडाला...' अवाक् होऊन मालकीण त्याच्याकडे सहानुभूतीने पाहातच राहिली.

या प्रसगानंतर 'Vicar of Wakefield' ही कादंबरी प्रसिद्ध झाली दोन वर्षांनी! एक 'क्लासिक' म्हणून गाजलीही. या कादंबरीतली 'भोकं' हुडकून काढणाऱ्या लॉर्ड मेकॉलेनेही स्वच्छ प्रशस्तीपत्र दिले, 'इंग्रजी भाषा पृथ्वीवर जिवंत आहे तोपर्यंत या कादंबरीला मरण नाही...'

'वेस्टमिन्स्टर अॅबे' या इंग्रजांच्या दफनगृहात गोल्ड स्मिथच्या थडग्यावर डॉ. जॉन्सनने लिहून ठेवलेल्या लॅटीनमधील चार ओळी इंग्रजी साहित्यविश्वाला आजही स्फूर्ती देत राहिल्या आहेत. 'Who left untouched fairly no species of writing, and who touched nothing that he did not adorn.' कर्तृत्वाचे केवढे विशाल सर्टिफिकेट!

चेहऱ्याने कुरूप नि देहाने बेडौल असलेला बुटका ऑलिव्हर गोल्डस्मिथ आपल्या साहित्यसंपदेमुळे फार सुंदर, कमालीचा सहृदय नि चांगलाच उंच होता, हाच त्याच्यापासून घेण्याचा बोध. बर्कच्या अश्रूंनी त्याच्या मानवभूत दयावादावर, मेकॉलेच्या प्रशस्तीपत्रकाने त्याच्या साहित्यिक गुणांवर नि जॉन्सनच्या सच्च्या स्नेहाने त्याच्या हळुवार हृदयावर श्रेष्ठतेच्या वज्रलेपाचा हात फिरविला आहे. आयुष्यभरच्या धडपड-तडफडीनंतर, अनेक चढउतारानंतर, मानवी जीवनाचे सर्व कप्पे अनुभवल्यानंतर, गोल्डस्मिथच्या आपल्या नजरेसमोर येणाऱ्या लोभस व्यक्तिमत्त्वापुढे मन-भावना असलेल्यांचे दोन्ही हात प्रणामाकरता एकत्र आल्याशिवाय राहणार नाहीत.

**– चित्तरंजन घोटीकर**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

**दि. १३ ते १९ एप्रिल ७४**

### मध्यप्रदेश-बिहार राजकीय भूकंपाच्या छायेत

ओरिसा व उत्तर प्रदेश या नव्या सरकारांची स्थापना साडेसातीच्या चंद्रावर झाली असल्यामुळे तेथे स्थैर्याची अपेक्षा व्यर्थ आहेच. पण आता प्रश्न उभा राहील तो मध्यप्रदेश व बिहार या राज्यातील नेतृत्वाचा. ही दोन्ही राज्ये शनी-मंगळाच्या क्रूर दृष्टीत आहेत. मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री त्या पदावर आपण ध्रुवासारखे अढळ आहोत असे सांगत असले तरी इंदिरा गांधींच्या समोर अगदी लवकरच सेठी व गफूर यांच्या नेतृत्वाची डोकेदुखी निर्माण होणार आहे. आठवड्याच्या शेवटी मिथुन राशीत होणाऱ्या शनी-मंगळ युतीचे वेध इंदिराजींना त्रासदायक ठरू लागणार आहेत आंतर राष्ट्रीय राजकारणातील बांगला, पाकिस्थान व भारत त्रिपक्ष परिषद यशाच्या दृष्टीने शंकास्पद ठरण्याची शक्यता आहे. पंचवार्षिक योजनेचे भवितव्य अधारू लागेल. महाराष्ट्रात संप सत्याग्रहाचे वारे निर्माण होईल.

### मेष : प्रगतीला वेग

या आठवड्याच्या शेवटी आपल्या पराक्रमाला शनी-मंगळ युतीचे वेध लागणार आहेत. तरी पण या आठवड्यात मात्र अनेक शुभ घटना घडून तुमच्या प्रगतीचा वेग वाढणार आहे. आज चंद्र धनू राशीचा असताना आठवडा सुरू होत आहे. हा एक अर्थाने भाग्यपुष्प उदीत करणारा चंद्र आहे. शनिवार ते बुधवार हे पाच दिवस वाया घालवू नका. नोकरी, व्यवसाय, संसार, प्रेम राजकारण, लेखन, प्रवास इत्यादी क्षेत्रात जे जे तुम्ही करीत असाल ते ते यश आणि सफलता घेऊन येईल. मोठ्या आर्थिक उलाढाली होतील. मात्र काळजीपूर्वक करार करा. योग्य सल्ला घ्या. व्यापारी लोकांना व शेतकरी वर्गाला थोडा फार नुकसानीचा हा काळ आहे. गुरुवार व शुक्रवार प्रवास होईल. महिलांस : मुलीच्या लग्नाचा आनंद मिळणार. नोकरी करणाऱ्या महिलास पगार वाढवून मिळेल. ◻

### वृषभ : लॉटरीत लाभ

तुमच्या राशीवरचे लॉटरी लाभाचे भविष्य वाचून तुम्ही खूश व्हाल यात शंका नाही. तसे सामाजिक वा कायद्याचे बंधन न पाळता अचानक श्रीमंत होण्याची तुमची फार इच्छा असते. मटका खेळू नका असे तुम्हाला सांगितले तरी तुम्ही ऐकणार नाही. तो तुम्ही खेळणार व तुम्हाला पैसा मिळणार. पण भाऊसाहेब, मूळ कुंडलीत उच्चीचा ग्रह असावा लागतो हे ध्यानी असू द्या. धनू राशीचा चंद्र आज आहे व रविवारी तुम्हाला चंद्र उत्तम आहे. पैसा मिळेल व दोन दिवस तरी मजेत घालवाल. पत्नी, मुले, जवळचे मित्र यांच्या सहवासात तुम्ही आनंद लुटाल. मंगळवारी बेकारांच्या भाग्याचा दिवस आहे. नोकरी हवी त्यांना ती मिळेल व ज्यांना कोणताही स्वतंत्र व्यवसाय करावयाचा असेल त्यांना भांडवल मिळेल. सौंदर्यप्रसाधनाच्या कारखानदारांना व व्यापाऱ्यांना खूप फायदा होईल. शुक्रवारी एखाद्या श्रेष्ठ साधूचे दर्शन घडेल, महिलांस : लेखक महिलांना लेखनाच्या गौरवाचे समाधान लाभणार आहे बक्षिस मिळण्याची शक्यता आहे. ◻

### मिथुन : संसारात आनंद

तुमच्या राशीत शनीचे वास्तव्य असून आता मंगळही त्याला भेटायला आला आहे. केतूसारखा ग्रह बारावा झाला असला तरी निदान हा आठवडा तरी आपण निश्चित रहावे. आज शनिवारी सातवा चंद्र असताना आठवड्याची सुरुवात होत आहे ही शुभसूचक होय. शनिवार, ते बुधवार उत्तम दिवस आहेत. अपेक्षापूर्ती करणारे आहेत. नुकताच नवा संसार सुरू झाला असेल तर या नव दांपत्याला गोड अनुभूतीचा स्पर्श या मुदतीत होणार आहे. त्यांची मने गुलाबी स्पर्शाने सुगंधीत होतील. सर्व सामान्य लोकांना या आठवड्यात अडचणी कमी येतील. पैसा गरज भागवील. मुलांना नवे कपडे घेता येतील. परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांचा रिझल्ट यावेळी असेल तर ते पास होतील. लॉटरीची सोडत असेल तर नशीब उघडेल. नोकरीत तसा त्रास नाही. पण चूक होऊ देऊ नका. महिलांस : कुमारिकांचे चटकन् विवाह ठरतील. कॉलेजात जाणाऱ्या मुलींनी प्रेम पारखून घ्यावे. ◻

### कर्क : सावधगिरी हवी

आठवड्याच्या सुरुवातीलाच सहावा चंद्र आहे. हा चंद्र तेवढासा वाईट नसला तरी तसा अनुकूल नाही. प्रामुख्याने तब्येतीला त्रास व धंदा-व्यवसायात गुप्त विरोधकांचा जोर या कात्रीत सापडणार आहात. तशातच केतू जरी शनीपासून दूर झाला असला तरी मंगळ बारावा आला आहे. सारांश तुमच्याभोवती सध्या दुष्ट ग्रहांनी कडे केले आहे. आठवड्याच्या शेवटी तर शनी-मंगळ युती व्ययस्थानी होत आहे. म्हणूनच अनेक महत्त्वाची कामे या आठवड्यात उरकून घ्या. नोकरीत तुम्हाला काही वरिष्ठांकडे मागायचे असेल तर ते याच आठवड्यात मागा. मंगळवार ते शुक्रवार हा काळ अनुकूल आहे. मागण्यांचा सहानुभूतीने विचार होईल. उद्योग-व्यवसायात नवीन धाडस कोणतेही करू नका. आहे त्यातच लक्ष द्या. व्यापारी लोकांनी जादा किंमत घेऊन

कोणतीही वस्तू विकू नये. पैसा जपून वापरा. **महिलांस :** नव्या वस्तूंची खरेदी सोस म्हणून करू नका. पैसा खर्च करताना खबरदारी घ्या. ¤

## सिंह : आर्थिक स्थित्यंतर

या आठवड्यात अनेक ग्रह तुम्हास अनुकूल आहेत. चंद्राचे भ्रमण पहिले चार दिवस अतिशय अनुकूल आहे. शनिवार ते मंगळवार परीक्षार्थी विद्यार्थ्यांना यश देणारे आहेत. वरिष्ठ अधिकाराची जागा मिळण्यासाठी होणाऱ्या परीक्षांचा निकाल या चार दिवसात असेल तर असे लोक ऑफीसर होतील. चालू नोकरी कटाळवाणी वाटेल. पण नोकरीत बदल होण्याची शक्यता नाही. बदल करूही नये. हा आठवडा प्रामुख्याने आर्थिक स्थित्यंतराचा आहे. ज्यांच्या मूळ कुंडलीतील ग्रह उच्चीचे असतील त्यांना लॉटरी, रेस वगैरेपासून नशीब उघडण्याचे समर्थ योग आहेत. पगारवाढीचा देखील पैसा मिळेल. एखादा उद्योग उघडण्याचा लांबणीवर पडत असलेला प्रश्न बुधवार ते शुक्रवार या मुदतीत त्रासाशिवाय सुटेल. प्रवासाचा योग आहे. परदेशी प्रवासांचे देखील जमावे. विवाहाचा प्रश्न प्रयत्नाने मार्गी लागेल. **महिलांस :** मिश्र फलाचा असा हा आठवडा आहे. सार्वजनिक कार्य करणाऱ्या स्त्रीयांना मानाचा योग आहे ¤

## कन्या : आरोग्याची काळजी घ्या.

'कन्या ही रास संकटाची' हे कन्या राशीच्या बाबतीत अनुभवाचे तत्त्व तुम्हास अधुनमधून अनुभवाला येत असेलच. तिसरा राहू तुम्हाला अनुकूल आहे. केतूदेखील अनुकूल आहे. तरीपण पहिले तीन चार दिवस मात्र प्रामुख्याने शनिवार ते मंगळवार चौथा चंद्र आहे. मनःस्थिती उगीचच बिघडवून घेऊ नका. रक्तदाब, कफ, दमा व अशक्तपणा यांचा ज्यांना त्रास होत असेल त्यांनी निसर्गाच्या सान्निध्यात हे दिवस घालवावेत. बुधवार ते शुक्रवार मात्र बऱ्याच अनुकूल घटना घडवणारा असा काळ आहे. नोकरी व्यवसायातील, व्यापार उदीमातील अनेक योजना दृष्टिपथात येऊ लागतील. नव्या नोकरीचे प्रयत्न यशस्वी होतील. जुन्या नोकरीत तुमच्याबद्दलचे वातावरण सुधारेल. पैशाची अडचण तात्पुरती का होईना मिटेल. दुकानदारीची योजना यशस्वी व्हावी. **महिलांस :** लेखक म्हणून प्रसिद्धी मिळण्याचा योग आहे. नोकरी व्यवसायात अनुकूल वातावरण राहील. ¤

## तूळ : कलाक्षेत्रात प्रसिद्धी

सध्या तुम्ही गुरू हर्शलाच्या शुभयोगातून जात आहातच. या आठवड्यात चंद्रहर्शलचा छान योग जमून येत आहे. मंगळाचे भाग्यस्थानी नुकतेच आगमन झाले आहे. ही सारी अनुकूल ग्रहस्थिती तुमच्या भाग्यचक्राला वेग आणल्याशिवाय राहाणार नाही. अनेक क्षेत्रात तुमच्या योजनांची व यशाची घोडदौड चालू होणार आहे. परदेश प्रवासाचा, कल्पनेत नसलेला योग याच वेळी येत आहे. संधी मिळत आहे, फक्त ती हाती धरा. तुम्हाला सिनेसृष्टीत प्रवेश हवा असेल तर प्रयत्न करा. तुम्ही एखादे नाटक लिहिले असेल तर ते नाटककंपनीकडून स्वीकारले, जाईल व तुम्हाला कल्पनातीत आनंद मिळेल. या राशीच्या गायकांच्या मैफली यावेळी फार गाजतील. नोकरीत अनुकूल वातावरण राहील. बेकारांच्या कामाचा प्रश्न सुटेल. संयम व विवेक बाळगून तुम्ही आपल्या कार्यात मग्न राहिलात तर यश तुम्हाला माळ घालील. **महिलांस :** या आठवड्यात काही भाग्यवान तरुणी प्रेमात यशस्वी होतील. हवाई सुंदरी म्हणून नोकरी मिळण्याची शक्यता आहे. ¤

## वृश्चिक : अधिकारात वाढ

गेल्याच महिन्यात राहू तुमच्या चंद्रावर आला आहे. तर या आठवड्याची सुरुवात दुसऱ्या चंद्राने–धनू राशीच्या चंद्राने होत आहे. ही अनुकूल योगाची गोष्ट आहे. चौथा गुरू तुम्हाला वाईट नाही. तुम्ही तुमच्या इष्ट देवतेची वा कुलदेवतेची उपासना करीत असाल तर त्याचे फल तुम्हाला यावेळी मिळणार आहे. मंगळवार ते गुरुवार या दरम्याने अशा भाग्यवान–निष्ठावंत उपासकांना साक्षात्कार दर्शवणारे एखादे स्वप्न पडून त्याचे परिणाम पुढील काही महिने सुखदायी जाण्यावर होईल. शनिवार ते सोमवार आर्थिक खळबळीचा आहे. काही वेळा पैशांची अडचण निर्माण होईल. पण ती फार काळ न राहता मित्राकडून भागविली जाईल. शेतजमिनीच्या एखाद्या वादात तुमचा जय संभवतो. लॉटरीत वा रेस वा इतर मार्गाने पैसा मिळणार आहे. मात्र नोकरीच्या बाबतीत भलत्याच अपेक्षा व महत्त्वाकांक्षा बाळगू नका. अवास्तव इच्छा निराशा निर्माण करील. आरोग्याच्या बाबतीत गुरुवार व शुक्रवार काळजी घ्या. **महिलांस :** पदवीधर स्त्रियांना वरिष्ठ दर्जाची नोकरी मिळू शकेल. विवाह ठरावयाला काळ अनुकूल आहे. ¤

## धनू : खर्चाला मर्यादा हवी

आज चंद्र तुमच्या राशीत आहे. हा एक शुभ योग आहे. राहू बारावा असला तरी त्याची पर्वा निदान सध्या तरी करू नका. त्याबरोबर सप्तमस्थानी शनीबरोबर येऊन बसलेला मंगळ दुर्लक्षून चालणार नाही. तब्येत व संसारी वातावरण डोळ्यात तेल घालून जपावे लागेल. शनिवार ते मंगळवार नोकरी व्यवसायातील महत्त्वाची कामे उरकून घ्या. वरिष्ठांकडून थोड्याफार प्रमाणात सहानुभूती मिळू शकेल. चालू नोकरीत बदल, बदली-बढती संभवते. प्रोफेसर, शिक्षण क्षेत्रातील वरिष्ठ व्यक्ती, कापड उद्योगातील 'ऑफिसर' प्लॅस्टिक उद्योगातील कामगार, पत्रकार, लेखक या लोकांना पहिले चार दिवस अनुकूल आहेत. नव्या उद्योगाची बोलणी यशस्वी होऊ शकतील. उच्चपदावरील व्यक्तीबरोबर परिचय होईल. या राशीबरोबर निगडीत असलेल्या राजकारणी लोकांना मात्र लोकक्षोभ सहन करावा लागेल. लोकप्रियतेला तडा जाईल. एखादी भानगड प्रकाशात येईल. **महिलांस :** समजूत व समंजसपणा ठेवा. शेजारी व्यक्तीबरोबर भांडण टाळा. ¤

## मकर : सुधार दिसेल

बाराव्या राहूने तुमचे सारे जीवन उध्वस्त करून टाकले होते. सर्वच क्षेत्रात तुमची कोंडी झाली होती. गेल्याच महिन्यात राहू अकरावा होऊन तुम्हाला अनुकूल झाला आहे. आता तुमच्या बाबतीत सुधारणेचे वारे वाहू लागतील. अनेक क्षेत्रात झालेली कुचंबणा सुधारू लागेल. अडखळत चाललेली पावले वेग घेतील. नोकरी, धंदा, व्यापार, प्रवास, योजनाबद्ध कार्यक्रम ठरलेले बेत

रेंगाळत पडलेली कोर्ट कचेरीची कामे नव्या उद्योगाचे परवाने वगैरे सर्वच बाबतीत प्रगतीची चिन्हे दिसू लागतील. रविवार ते मंगळवार जरा सबुरीने वागा. नोकरीत तुमच्या कामाची गुप्त तपासणी होण्याची शक्यता आहे. पैशाचे व्यवहार काळजीपूर्वक करा. संशयाला जागा ठेऊ नका. कोणत्याही मोहाच्या आहारी जाऊ नका. बुधवार ते शुक्रवार अकल्पित पैसा मिळण्याचा योग आहे. लॉटरीचे तिकीट अवश्य काढा. **महिलांस :** तुमच्या आकांक्षा पुऱ्या करणारा हा आठवडा आहे. नोकरीत यश. ◻

### कुंभ : यशस्वी सप्ताह

अकरावा चंद्र उत्तम असतो. शनीप्रधान धर्म असलेली तुमची रास आज आघाडीवर आहे. कमी बोलणे व काहीतरी भव्यदिव्य हातून घडणे असा हा काळ आहे. प्रामुख्याने औद्योगिक व राजकीय क्षेत्रातील लोकांना हा काळ अतिशय अनुकूल आहे. रेसच्या शौकीनांना शनिवार ते मंगळवार बरेच मोठे घबाड मिळू शकेल. मात्र जन्मस्थ कुंडलीत श्रीमंतीचा तसा जबर योग हवा. आमदार, खासदार, मंत्री वगैरे राजकीय क्षेत्रातील नेत्यांना गौरवाचे योग आहेत. कापड गिरणीच्या मालकांना सरकारी कृपा लाभेल. तेल, लोखंडी अवजारे हे उद्योग ज्या व्यक्तींच्या हाती असतील त्यांच्या नशिबाला बहर येईल. नोकरीत चालू काम निश्चित बदलू शकेल. मनपसंत काम मिळून बढती मिळेल. सोने चांदीचे व्यापारी गबर होतील. **महिलांस :** दागिन्याची हौस पुरी होईल. करमणुकीचाही उत्तम योग आहे. ◻

### मीन : पदवीधरांना शुभवार्ता

राशीस्वामी गुरु व्ययस्थानी असला वा शनी सुखस्थान दूषीत करून बसला असला तरी हा आठवडा आपणास अनुकूल आहे. प्रामुख्याने शनिवार ते बुधवार तुमच्या मनातील स्वप्ने, तुमच्या महत्त्वाकांक्षा व तुम्ही ठरवलेल्या योजना साकार व्हायला मदत करणारे आहेत. शेती, वाणिज्य, इंजिनिअरिंग, रसायन, संशोधन, संस्कृती इत्यादी क्षेत्रातील पदवीधरांना सुवर्णसंधी मिळणार आहे. त्यांना नोकरी करायची असो वा स्वतःचा एखादा उद्योग उभारायचा असो त्यांचे काम फत्ते होणार आहे. आर्थिक व तांत्रिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचा आशिर्वाद लाभणार आहे. चालू नोकरीत आजवर तुम्हाला न मिळालेली संधी, वरील जागेचा मान यावेळी मिळणार आहे. गुरुवार व शुक्रवार कुणालाही पैसा व आश्वास देऊ नका. करार व मदार लांबणीवर टाका. तब्येतीला जपा. **महिलांस :** प्रसूतीयोग्य महिलांना काळजी घ्यायला हवी. धाडस नको ◻

---

## खुलासा : पृष्ठ १ वरून

ही मोहीम ११ मे पर्यंत पूर्ण झाली. ८ लाख जर्मन फौज कैद करण्यात आली. व २००० जर्मन रणगाडे आणि १००० विमाने काबीज करण्यात आली. तसेच सव्वा लाख सोविएत सैनिकांनी प्राणाहुती दिली, तेव्हाच प्राग मुक्त करता आले. हे काम व्लासोवच्या विखुरलेल्या बटालियन्सच्या कुवतीबाहेरचे होते हे अगदी उघड आहे. युरोपमधील युद्धातील या अखेरच्या लढाईत व्लासोवच्या मंडळींनी जर्मनांच्या आज्ञेचा भंग कुठे कुठे केलाच तर तो केवळ एका हेतूनेच. लढाईतून पळ काढून अमेरिकनांना शरण जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सोविएत फौजेचे कैदी बनण्याचा प्रसंग त्यांना टाळायचा होता. त्यांची बंडखोरी एवढीच.

सही
**इगोर तोगोयेव**
माहिती अधिकारी,
सोविएत कॉन्सुलेट जनरलची
माहिती शाखा–मुंबई.

'सोल्झेनित्सिन' (माणूस, २३ फेब्रुवारी १९७४) या माझ्या लेखासंबंधी मुंबईतील सोविएत कौन्सुलेट जनरलच्या माहिती अधिकाऱ्यांकडून आलेले पत्र पाहिले. माझ्या लेखातील चुका म्हणून त्यांनी ज्या भागाचा उल्लेख केला आहे तो भाग म्हणजे सोल्झेनित्सिन यांच्या 'गुलाग आर्चिपेलागो' या पुस्तकातलाच उतारा आहे. त्यात काही चुका असल्याच तर त्या सोल्झेनित्सिन यांच्या आहेत माझ्या नव्हेत. सोल्झेनित्सिन यांची विधाने चूक की बरोबर यापैकी कोणताच दावा माझ्या लेखात मी केलेला नाही.

सोव्हिएट माहिती अधिकाऱ्यांच्या पत्रातील एका चुकीकडे मात्र मी लक्ष वेधू इच्छितो. व्लासोव्ह (लासोव्ह) कैदेत होता असे सोल्झेनित्सिन यांच्या त्या उताऱ्यातही म्हटलेले नाही. कैदेचा उल्लेख आहे व्लासोव्हने उभारलेल्या फौजेतील सैनिकांसंबंधी, व्लासोव्हसंबंधी नव्हे. उताऱ्यातील वाक्ये अशी आहेत. 'लासोव्हने आपल्या फौजांना चेक बंडखोरांच्या मदतीस जाण्याचा हुकूम दिला. जर्मनांच्या कैदेत तीन वर्षे रहावे लागल्याने या हल्ल्यात जर्मनांविरुद्ध त्यांचा सारा त्वेष व क्रोध उफाळून आला.'

माहिती अधिकाऱ्यांच्या पत्रात सोल्झेनित्सिन यांच्या इतर लेखनासंबंधी जे विवेचन आहे त्याचा माझ्या लेखातील विधानांशी काही संबंध नसल्याने त्याला उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

वा. दा. रानडे

# गुजराथ : मुखपृष्ठ २ वरून

संघाच्या सभासदांनी तोच कित्ता गिरवून जनमानसांत आपली प्रतिमा उजळली. आणि एकदा खुर्चीवरून खाली उतरल्यावर चिमणभाई पटेलांनाही चेव चढला. माझं शेपूट कापलं गेलं आहेच. सगळ्यांचीच कापा. विधानसभा बरखास्त झालीच पाहिजे. आता सत्तारुढ कांग्रेसनेही या मागणीचे हात बळकट करायला सुरुवात केली. आता प्रसंग उभा राहीला इंदिराबाई गांधींच्या प्रतिष्ठेचा. केंद्रसरकार किती शक्तीमान आहे याचे प्रदर्शन करण्याचा. 'मी हिंसेला बळी पडणार नाही' बाईंची घोषणा. केरळात जन-आंदोलन उभारणाऱ्या बाईंनी खुर्चीवर बसल्यावर खुर्चीशी इमान राखणे स्वाभाविक आहेच.

बाई संतापल्या. चिमणभाईंनी विधानसभेतील कांग्रेस पक्षाच्या नेतृत्वाची जागा खाली करावी. त्यांच्यावरचा सहकाऱ्यांचा विश्वास उडाला आहे. केंद्रीय कांग्रेसपक्षाच्या कानपिचक्या. उत्तर प्रदेश निवडणुका संपत आलेल्या. पैसे मिळाले होते. काम झाले होते. चिमणभाई मेल्या आईचे दूध प्यायले नव्हते. गुजराथमधील श्रीमंत शेतकऱ्यांच्या पाठिंब्यावर पोसलेले त्यांचे नेतृत्व. त्यांनी नकार दिला. आणि केंद्रीय कांग्रेस पक्षाने आपला सडेतोडपणा दाखविला. 'गेट आऊट' गुजराथच्या राजकारणाचे नाटक रंगत होते. चळवळीचे फळ पिकत चालले होते. १७ फेब्रुवारीला लष्कर काढून घेण्यात आले. राष्ट्रपती राजवट किती साळसूद आहे हे दाखविण्याचे प्रयत्न चालू होते. तुरुंगाबाहेर आलेल्या विद्यार्थी नेत्यांनी पुन्हा एकदा चळवळीची सूत्रे हाती घेतली. आमदारांचे राजीनामे मागणे हा मुख्य कार्यक्रम झाला यश येत होतं. त्यात काही वाईट प्रकारही झाले. भडोचमध्ये राजीनामा देऊन परतलेल्या आमदारांचा चमन-गोटा करून तोंडाला काळे फासून गाढवावर बसविण्याचा प्रयत्न झाला. विद्यार्थी चेकाळत होते. नेतेमंडळी रथाच्या घोड्यांना योग्य मार्गाने नेण्याचा प्रयत्न करीत होती.

आणि मग राष्ट्रपतींच्या कानावर गाऱ्हाणे घालण्यासाठी २१० विद्यार्थी प्रतिनिधी दिल्लीला पोचले. कोण्या कांग्रेस पुढाऱ्यांनीच या मुलांची दिल्लीला जाण्याची आणि उत्तमपैकी हॉटेलमध्ये राहण्याची सोय केली होती अशी अफवा उठली. विद्यार्थी नेत्यांनी तिचा निषेध केला. सर्व खर्च आम्हीच आमच्या पॉकेटमनीमधून चालवतो. त्यांनी ठासून सांगितले. ७ मार्चला मनीषी जानी व इतर नेते राष्ट्रपतींना भेटले. पण त्यांनी इतर केंद्रीय पुढाऱ्यांशी बोलणी करायला नकार दिला. 'विधानसभा बरखास्त करण्याचे जाहीर आश्वासन देत असाल तरच तुमच्याशी वाटाघाटी करू' त्यांनी ठणकावून सांगितले. दिल्लीला लोकसभेपुढे निदर्शने केली आणि त्या सर्वांना अटक झाली. ७ दिवसांचा तुरुंगवास. या बातमीने अहमदाबादचे वातावरण चिघळले. आंदोलन हिंसक मार्गावर नेण्याच्या गोष्टी सुरू झाल्या. जनसंघ वगैरे पक्ष मध्यंतरी थोडे गप्प बसले होते. त्यांना दम धरवेना. आगगाड्या, विमाने, एस्. टी. बसेस सर्व बंद करून संबंध राज्याच्या व्यवहारांना खीळ घालण्याचा निर्णय घेण्यात आला. राजीनामा न देणाऱ्या आमदारांना व त्यांच्या कुटुंबियांना जीवन असह्य करण्यात आले. १४ मार्चला राजभवनावर मोर्चा ठरला. राजभवन गांधीनगर-मध्ये हलविले जावे. 'गांधीनगर भ्रष्टाचारनगर' ही घोषणा होती. शाळा कॉलेजेस बंद होती. भावनांना उधान आले होते. २६ फेब्रुवारीला एका विद्यार्थ्याने समाधी घेण्याची घोषणा केली. आत्मयज्ञ. प्राणांची आहुती. मध्यंतरी नवनिर्माण युवक समितीमधून जनसंघाकडे झुकणाऱ्या काही सभासदांना हाकलण्यात आले. पुन्हा एकदा आम्ही कोणत्याही पक्षाला याचा फायदा मिळू देणार नाही ही घोषणा समितीने सिद्ध केली. मनीषी जानी मात्र वर्गविहीन समाज निर्माण करण्याचे आपले स्वप्न बोलून दाखवत होताच. सध्याची लोकशाही भ्रष्ट लोकशाही आहे हा नारा होता.

जयप्रकाश नारायण अहमदाबादला भेट देऊन गेले. आणि अहिंसेच्या या उपासकाने विद्यार्थी आंदोलनाला आशिर्वाद दिले. एक वर्ष बाहेर पडा. समाजपद्धती, शिक्षणपद्धती, राजकारणपद्धती आमूलाग्र बदल, असे त्यांचे आवाहन होते. विद्यार्थी-विद्यार्थिनी हजारोंच्या संख्येने भाषणाला हजर होत्या. अमेरिकेतील विद्यार्थ्यांचे उदाहरण देऊन जयप्रकाशांनी दाखवून दिले की जेव्हा जेव्हा प्रस्थापित सत्ता-स्वार्थाने बेभान होऊन कृती करते तेव्हा तेव्हा विद्यार्थी शक्तीने पुढे येऊन प्रस्थापिताला योग्य मार्गावर आणणे आवश्यक आहे. व्हिएतनाम-मधील युद्ध थांबविण्यासाठी अमेरिकेतील विद्यार्थी रस्त्यावर आला. उदाहरण ताजे होते.

आणि मग मोरारजीभाईंचे प्राणांतिक उपोषण. गांधीवादी पठडी-तील खास अस्त्र. गुजराथच्या जनतेचे ऋण मला फेडलेच पाहिजे असा ऋजुभाव. आणि मग रविशंकर महाराज. जनतेचे खरे सेवा-भावी नेते — त्यांनी उपोषणाचा घेतलेला निर्णय. दबाव वाढत होता. चळवळ उग्र होत होती. रेल्वेचे रूळ उखडले गेले. जनतेचा तोल सुटला. जनतेतील सर्व प्रवाह, डावे, उजवे, संधीसाधू सर्वच एकवटले. आणि इंदिराबाईंचा धीर सुटला. त्यांच्या कारकीर्दीतील एक काळे पर्व. इंदिराबाईंसारख्या मुत्सद्दीबाईला गुजराथची नाडी कळली नाही. १७ मार्चला विधानसभा बरखास्त झाली. रॉकेट चंद्रावर येऊन पोचले.

गुजराथची कॉलेजेस उघडली. नवनिर्माण समितीच्या नेत्यांना आता खऱ्या अर्थाने प्रश्नांच्या सरबत्तीला तोंड द्यावे लागेल. यापुढे काय? तुम्ही कोण? त्यांना आता तपासून पहावेच लागेल. नुकतीच बातमी ऐकली. त्यांच्यात मतभेद होते. एका गटाचे म्हणणे — भाव खाली आणणे हे आपले मुख्य उद्दिष्ट. बरखास्त हे साधन, तेव्हा भाव खाली आणल्याखेरीज शाळा-कॉलेजेस उघडणे चुकीचे ठरेल. मनीषी जानी गटाचे म्हणणे — हे आंदोलन दीर्घकाळ चालू राहील, व्यापाऱ्यां-बरोबर वाटाघाटी करता येतील.

एक सूर असाही ऐकला — 'परीक्षा नकोत.' महापूर येऊन गेला. गाळ खाली बसू दे. नवनिर्माण समितीने आपल्या मागण्या राज्य-पालांकडे पाठविल्या आहेत. पुढे जेव्हा निवडणुका होतील तेव्हा

मलपृष्ठ २ वर

## गुजराथ : मलपृष्ठ १ वरून

प्रत्येक उमेदवाराची माहिती समितीचे लोक तयार करतील व लोकांना आपला उमेदवार निवडायला मदत करतील अशी त्यांची योजना आहे. कोणत्या योजना अंमलात येताहेत कोणत्या कागदावर रहाताहेत प्रत्यक्ष दिसेलच. एक गोष्ट खरी या विद्यार्थ्यांनी चळवळीचे शास्त्र बऱ्याच लौकर आत्मसात केलं. सध्या जी हुकूमत त्यांना गाजवायला मिळाली, लोकांचे अमाप कौतुक, पाठिंबा, सत्ता या गोष्टी त्यांच्या डोक्यात किती शिरल्या आहेत कळायला मार्ग नाही. उत्तर प्रदेशात विद्यार्थी बऱ्याच दिवसापासून राजकारणात आहेत. पण गुजराथमधील अगदी तरुण, नुकती विशीला आलेली ही पोरं. यांनी सभा घेतल्या. गाजवल्या. तुरुंगात गेले. बोलणी केली. समाजापासून विद्यार्थ्याला तुटून रहाता येणार नाही हे सिद्ध केले.

या आंदोलनाचा फायदा उजव्या शक्तींना मिळणारच. कदाचित पुन्हा निवडणुका झाल्या तरी सत्तारूढ काँग्रेस पक्ष अजूनही बहुमत मिळवील. इंदिरा गांधींना ती युक्ती चांगली जमलीय्, नवे मोहरे निवडायचे. पाया तोच. माती तीच. फळे एकाच झाडाची. झाडच किडलेलं. संपत्तीच्या हितसंबंधांनी पोखरलेलं. वर्गशक्ती तीच. पण लोक फसतात. स्वतःचे सुख कशात आहे ते जनतेला कळण्यासाठी असे अनेक लढे द्यावे लागतील. आता नकारात्मक जाणीव तयार झाली आहे. आम्हाला भ्रष्टाचार नको. एवढंच कळतंय. आणि भ्रष्टाचार काही माणसे करतात. माणसं किडकी कुजकी असतात. ती फेकून दिली की आढीतील बाकीचे आंबे उत्तम. अशी तिची भोळी समजूत काँग्रेसने करून दिलेली. संघटना काँग्रेसने, जनसंघाने सांगितले, 'आम्ही अधिक शुद्ध आहोत.' खात्री काय? कुठच्या तर्कशास्त्राच्या नियमावर तुम्ही शुद्ध आहात हे सिद्ध होईल असे प्रश्न ती अजून विचारीत नाहीत. होकारात्मक पर्याय, पॉझिटिव्ह कॉन्शसनेस तिला माहीत नाही. कोणती आर्थिक धोरणे माझ्यासाठी सुखाचे दिवस आणतील हे तिला कळत नाही. ही समाजव्यवस्था बदलायला पाहिजे. हे तिच्या लक्षात येत नाही. गुजराथमध्ये हे फार प्रकर्षाने जाणवतं. ही चळवळ मध्यमवर्गाची चळवळ राहिली. विद्यार्थी मध्यमवर्गीय होता. आणि ज्या ज्या राज्यात डावे पक्ष अतिशय शक्तीहीन आहेत तेथील मध्यमवर्ग हा नेहमी उजवीकडे झुकलेला आढळतो. जेथे जेथे डाव्या पक्षाच्या संघटना थोड्याफार मुळे धरून आहेत तेथे तेथे मध्यमवर्गातील बराच मोठा भाग डावीकडे झुकतो. कामगारांबरोबर रहातो. त्यांच्या लढ्याशी त्यांचे नाते जुळते.

पुन्हा एकदा बऱ्याच लोकांनी, 'विद्यार्थी वर्गाची व मध्यमवर्गाची शक्ती ओळखायला पाहिजे. क्रांतीमध्ये त्यांचे स्थान निश्चित आघाडीचे राहील' असा आरडाओरडा केला. गुजराथच्या संदर्भात प्रश्न विचारावासा वाटतो, 'गुजराथमध्ये जे काही घडलं ती क्रांती होती का?' समाजव्यवस्थेला. उत्पादनव्यवस्थेला हात न लागता फक्त एक भ्रष्ट सरकार कोसळलं, त्याच्या जागी त्याच पद्धतीचे कमीअधिक भ्रष्ट सरकार येईल–या प्रक्रियेला क्रांती म्हणता येईल का? भाववाढीने सर्वांत जास्त मध्यमवर्ग गांजला. त्याच्या रहाणीच्या पद्धती, जेवणाखाण्याच्या सवयी त्याला एकदम सोडाव्या लागल्या. तो नुसताच सवयींचा गुलाम नसतो पण रूढींचा, प्रतिष्ठेचा, इभ्रतीचा गुलाम असतो. त्यावरच घाला बसला. मध्यमवर्गातील बेकारीचे प्रमाण एकदम बरेच वाढले. त्याला पुढे जायला रस्ताच सापडेना. आणि हे जगभर घडले आहे. मध्यमवर्गाचे उद्रेक हे नेहमीच विद्यार्थ्यांच्या असंतोषातून बाहेर पडले आहेत. सध्या संबंध देशात हाच बंडखोर सूर दिसतोय्. बिहारमध्ये तेच घडलं. विद्यार्थी बाहेर पडला. अजनपर्यंत मुळे न रुजलेला असा हा समाजाचा भाग. पण ही सगळी बंडखोरी आहे, क्रांतीकारकता नाही. क्रांतीला निश्चित दिशा, निश्चित तंत्र, निश्चित विचारसरणी, निश्चित अभ्यास अभिप्रेत असतो. निश्चित वर्गांची हातमिळवणी व्हावी लागते. सध्या देशात जे काही घडतंय् त्यामध्ये गोंधळ, अनागोंदी, भडका हेच प्रकार जास्त आहेत. आणि यामध्ये फक्त गोंधळात हात धुवून सत्ता काबीज करण्याचे प्रयत्न आहेत. ही मालमत्तादार वर्गातील वेगवेगळ्या गटांची व या वर्गाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या पक्षांची आपापसातील मारामारी आहे. सुंदोपसुंदी चालू आहे. सामान्य जनता मात्र यामध्ये वापरली जाणार आहे आणि शेवटी उपाशी रहाणार आहे. विद्यार्थी आंदोलनांनी एकच होणार आहे, आतापर्यंतच्या साचलेल्या पाण्याला गती मिळणार आहे. ते पाणी कोणती दिशा घेते ते पाह्यचे. राजकारण निदान वाहू लागले आहे. काँग्रेसचे सर्वसमावेशक रूप उघडे पडले आहे खरे शोषक स्वरूप बाहेर दिसू लागले आहे हा बुरखा फाडण्याचे श्रेय विद्यार्थी आंदोलनांना द्यावेच लागेल. ☐ ☐

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर